Received 29th January 190[illegible]
Register No 47 of 1904/5

ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत छापलेलें प्रकरण.

वेद.

हा निबंध

जगन्नाथ रावजी टुल्लू, बी. ए.

यांनीं

अनेक प्राच्यप्राश्चात्य ग्रंथांच्या आधारानें लिहिला,

तो

विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए.

यांनीं

कोल्हापूर--'श्रीसमर्थप्रसाद' छा० छा०.

इ० स० १९०२.

किंमत ८६.

वेड.

† ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥

भगवद्गीता, अध्याय २, श्लोक ६३-६४.

एखाद्या सुंदर बागेंत बसलें ह्मणजे वृक्षवल्लरींची शोभा दृष्टीस पडत असते; कारंजांचे तुषार अंगावर येत असतात; मंद सुगंधी वाऱ्याची झुळूक चित्तास आल्हाद देत असते; रमणीय पक्षिगण मधुर गात असतात; हरिणादि वनचर सुखें संचार करीत असतात. इतक्यांत एकाएकीं त्या वृक्षवल्लरी कडाकड जमिनीवर येऊन पडाव्यात, त्या कारंजांची धुळधाण व्हावी, त्या झुळुकेचा झंझावात व्हावा, ते पक्षिगण किलकिलाट करून उडून जावेत, ते वनचर ओरडत पळत सुटावेत, अशी स्थिति एखाद्या विद्युत्प्रहारानें घडून येते, तेव्हां आपण तीस 'ईश्वरी कोप' असें कारण लढवितों किंवा कल्पनातरंगांत सदा दंग असणारे कविवर 'सृष्टीस वेड' लागलें असें ह्मणतात! आतां सृष्टीस जो कायदा लागूं आहे, तो मनुष्यासही लागू आहे. मात्र मनुष्याइतकें सृष्टींत विचार-स्वातंत्र्य नाहीं. ह्मणून मनुष्यास वेड लागलें, ह्मणजे तें केवळ ईश्वरी कोपामुळेंच लागतें असें नाहीं, तर मनुष्याचे स्वाभाविक गुणांमुळेंही लागतें. स्वाभाविक गुणांमुळेंही लागतें असें ह्मणण्याचा मतलब

---

† "विषयांकडे मनुष्याचें ध्यान लागलें, ह्मणजे त्यास त्यांचा नाद लागतो. त्यामुळें कामवासना उत्पन्न होते. कामवासनेमुळें क्रोध उत्पन्न होतो. क्रोधामुळें मूर्च्छा येते. मूर्च्छेमुळें विसर पडूं लागतो. विसर पडूं लागला कीं वेड लागतें. वेड लागल्यावर मरण येतें."

इतकाच कीं, त्यास कोणत्याही भूतबाधेसारख्या अननुभूत किंवा दैविक प्रकारानें तें लागत नाहीं. त्याचीं कारणें व तें बरें करण्याचे इलाज, त्यामुळें घडणारे व्यक्तिविषयक व सामाजिक हक्कांचे फेरफार, हे सर्व अत्यंत विचारणीय आहेत. चाणक्यानें ह्मटलें आहे कीं,—

विद्याहीना न शोभन्ते निर्गंधा इव किंशुकाः ।

(विद्याहीन मनुष्यें गंधरहित किंशुक फुलाप्रमाणें भासतात!) पण घटकाभर विद्या नसली तरी पुरवली. पण अक्कल नसली, तर मात्र चालावयाचें नाहीं. कारण, आपल्यांत अशी एक अमोल ह्मण आहे कीं, 'अक्कल नाहीं, त्याची घरोंब्रर नक्कल!' इंग्रेजी महाकवि शेक्सपीयर पण असेंच ह्मणतो कीं,

"Without judgment, we are pictures or mere beasts!

(विचारशक्तिविना, आपण चित्रें किंवा केवळ पशू होत!)

अशी स्थिति केवळ करुणास्पद आहे एवढेंच नाहीं, तर ती प्राणनाशक आहे. असा मनुष्य आपला स्वताचा किंवा दुसऱ्याचा केव्हां घात करील याचा नेम नसतो. हिमालयावरून निघणारी गंगा जी घसरत चालली, ती खालीं खालीं जात सहस्रमुखांनीं सागरांत लुप्तप्राय झाली; तसा मानवी बुद्धीचा बुडता पाय असला ह्मणजे इथला सारा व्यवहार आटोपला ह्मणून समजावें; असें आपल्या श्रीशारदाप्रिय भर्तृहरि राजानें आपल्या पुढील उक्तींत व्यक्त केलें आहे:—

विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः ।

असो. तर, अशा महत्वाच्या विषयाचा विचार या निबंधांत करण्याचें योजिलें आहे. आतां त्यांत कोणकोणते प्रश्न येतात, त्यांचा क्रमवार विचार करूं. असले प्रश्न ह्मटले ह्मणजे हे होत.

(१) 'वेड' ह्मणजे काय?

(२) वेडाचे प्रकार कोणते?

(३) वेड कोणत्या वर्षीं लागतें?

(४) वेड कोणत्या कारणांनीं लागतें ?

(५) वेड किती दिवस टिकतें ?

(६) वेड कसें घालवितां येतें ?

(७) वेडाचीं चमत्कारिक उदाहरणें कोणतीं ?

(८) वेड ही सबब सांगतां येते काय ?

(९) वेड लागल्यावर वारसा सांगतां येतो काय ?

(१०) वेड गेल्यावर वारसा सांगतां येतो काय ?

(११) आपला धर्म वेडास प्रतिबंधक असा आहे काय ?

वरील प्रश्नांपैकीं पहिला मानसिक शास्त्रासंबंधीं आहे. पुढले पांच वैद्यकासंबंधीं आहेत. सातवा वाङ्मयासंबंधीं आहे, व अखेरचे तीन, धर्मशास्त्र किंवा कायदा यासंबंधीं आहेत. 'वेड' या विषयाचें असें पृथक्करण केलें, यावरून तो बहुतेक वैद्यकीचा विषय असून, मी त्यास कां हात घालीत आहें, मला तसें करण्यास काय अधिकार आहे, हे प्रश्न माझ्या प्रिय वाचकांच्या मनांत सहज येणार आहेत. तर त्यांचा अगोदर निकाल लावून, मग प्रस्तुत विषयाकडे वळूं. माझ्या तरुण पत्नीवरच, दुर्दैवानें घाला घालून, तिजवर 'चित्तभ्रम' रूपी फटका ओढला आहे. तेव्हां सहजच हा 'चित्तभ्रम' किंवा लौकिक भाषेंतील 'वेड' काय आहे याचा विचार मी शास्त्रीय दृष्टीनें करूं लागलों. या विषयासंबंधीं जे जे ग्रंथ मला उपलब्ध झाले, त्यांतील शंका मी आपल्या डॉक्टर मित्रांकडून, अनुभविक वैद्यांकडून व वयोवृद्ध आप्तइष्टांकडून फेडून घेऊन, मला जी कांहीं तयारी अवश्य दिसली, तेवढी करून हा विषय उचलला आहे. तरी यांत जें कांहीं उणें असेल, त्याबद्दल माझे उदार वाचक मला क्षमा करून, आपल्या संकटाचा फायदा जितका या लेखकास यथाशक्ति घेतां आला, तितक्याचे ते खुषीनें भागीदार होतील अशी पूर्ण आशा धरून, प्रस्तुत विषयाकडे आतां वळतों.

१. पहिला प्रश्न, वेड ह्मणजे काय हा होय. वेड ह्मणजे एखाद्या किंवा सर्व मानसिक शक्तीस कांहीं शारीरिक किंवा मानसिक विकारामुळें

जो ऊत येतो, तो. वेड्यांची विचारशक्ति नाहींशी झालेली असते असें नाहीं. उलट ते एखादी कल्पना दुसऱ्याशीं अशी जुळवूं पाहतात कीं, जणूं काय ते खोट्या तत्वांवरून खरीं तत्वें स्थापित करीत आहेत असें वाटतें. कारण, कल्पनाशक्तीच्या जोरावर, त्यांना खोट्या वस्तु खऱ्यासारख्या वाटतात, व त्यावरून ते बिनचुक तर्क बांधतात. ह्मणून आपल्या दृष्टोत्पत्तीस असें येतें कीं, एखादी वेडी बायको आपल्या नवऱ्याजवळ असें वचन मागते कीं, आपण माझे वर गेलेले सासूसासरे, आईबाप अशीं सारीं पूर्वींचीं माणसें आणून दाखवाल, तेव्हां मी त्या सर्वांबरोबर जेवायला बसेन! माझा विश्वास आपल्यावर आहे! आपण मी ह्मणतें तसें करालच! कधीं ती टेबलावर बसून, आपणास इंद्रपद प्राप्त झालें आहे असें समजून, स्वर्गांतील गंगेचें स्नान करीत, फुकट मिटक्या मारते! जॉन लॉक् या महान् इंग्रेजी तत्ववेत्त्यानें आपल्या नामांकित 'मानवीबुद्धीवरील निबंधां'त आणखी एक मजेचें चित्र दिलें आहे. एक वेडा आपण कांचेचे आहोंत; व कोणी टिचकी मारली, तर आपण फुटून आपला चक्काचूर उडून जाईल, ह्मणून आपल्या शरीरास फार जपत असे!

असें जरी अस्सल वेड नसलें, तरी कांहींजणांस अमुक एका विषयाचें इतकें वेड असतें कीं, तेवढ्यापुरते ते कुलाब्याचे रहिवासी बनण्यास लायक असतात. त्यांना आपण 'नादिष्ट' किंवा 'छंदिष्ट' असें ह्मणतों.

असो. वेडांत विशेषेंकरून कल्पनाशक्तीस ऊत येत असतो. प्रेमांतही कल्पनाशक्तीचाच प्रभाव बळवत्तर असतो, व कवित्वांतही कल्पनाशक्तीचेंच मोठें प्राबल्य असतें. तेव्हां, वेड, प्रेम व कवित्व या तीन प्रकारच्या मानसिक स्थितींत, एक सामान्य घटकावयव हजर असतो. तो कोणता तर तीव्र कल्पनाशक्ति हा होय. एवढ्यावरून, "श्वयुवमघोनामतद्धिते" या पाणिनीच्या सूत्रावर पंडितांना जसा असा विनोद करण्यास सांपडलें आहे कीं

काचं मणिं कांचनमेकसूत्रे
बध्नन्ति मूर्खा न हि चित्रमेतत्।
विचारवान् पाणिनिरेकसूत्रे
श्वानं युवानं मघवानमाह ॥

(" काचेचा मणि व सोनें एके सुतांत वेडे गोंवतांत यांत कांहीं विचित्र नाहीं! कारण, शहाण्या पाणिनीनेंदेखील ' कुत्र्या 'स ' तरुण ' पुरुषास, व ' इंद्रा 'स एकाच सूत्रांत गोंविलें आहे! ")

तसा विनोद आपणास कदाचित् एका विचारवान् महापुरुषाविषयीं प्रस्तुत विषयासंबंधीं करण्यास फावेल. पण विनोदाकडे दृष्टी न देतां, आपण तथ्यांशाकडेच दृष्टि पुरविणें बरें. आंग्ल महाकवी शेक्सपीयर यानें आपल्या Midsummer Night's Dream (ऐन उन्हाळ्याच्या रात्रींतील स्वप्न) नांवाच्या नाटकांत, राजा थीससारख्या मुख्य पात्राचे तोंडून वेडे, आषक व कवी एकासारखे एक कसे असतात हें वदविलें आहे. थीसस आपल्या भावी पत्नीस पांचवे अंकारंभीं असें ह्मणतो—

(गीति.)

आषक, वेडे यांचीं डोकीं इतकीं कि तापलीं असतीं,
त्यांच्या विचित्र गोष्टी, थंड विचारी जनांसि ना येती! १
वेडे, आषक, तैंसे कविजन पोहति सु–कल्पना–सरितीं
भूत–पिशाचें अ–गणित दिसती, त्यांना ' भ्रमिष्ट 'सें ह्मणती. २
उन्मत्त तसाचि आषक, देखी सौंदर्य माषुकामाजीं—
शूर्पनखाही ती जरि, भासे त्यासी खरीच रंभाजी! ३
वेड असें सुंदर कीं कविचें ऐसें सदा मला भासे
इह लोकांतुनि स्वर्गीं, स्वर्गांतुनि येथ तें फिरे खासें! ४
अज्ञात वस्तुसी कवि देई नाना स्वरूप सुंदर तो!
त्याची प्रतिमा उज्वल! तेणें विधिपरि जगांत गाजे तो!

२. दुसरा प्रश्न ह्मटला ह्मणजे वेडाचे प्रकार कोणते हा होय. आपल्या आर्यवैद्यकांत, वेडास ' उन्माद ' असें ह्मटलें असून, त्याचे सात प्रकार कल्पिले आहेत. ते येणेंप्रमाणें :—

(१) वातोन्माद. (२) पित्तोन्माद. (३) कफोन्माद. (४) सन्निपातोन्माद. (५) मानसिकदुःखोन्माद. (६) विषोन्माद. (७) भूतोन्माद.

आपले शरीरांत वात, पित्त, कफ हे कांहीं एक प्रमाणानें असतात, पण त्यांपैकीं कोणाचें प्रमाण बिघडलें किंवा त्याचा अतिरेक झाला ह्मणजे पहिले तीन प्रकारांपैकीं तो तो प्रकार घडतो, व सर्वांचाच प्रकोप झाला ह्मणजे चवथा प्रकार घडतो. अखेरचे तीन प्रकार स्पष्ट आहेत.

पाश्चात्य वैद्यकाप्रमाणें, वेडाचे पांच प्रकार आहेत. ते येणेंप्रमाणें:-

(१) अर्धमुर्धे वेड—प्राचीन लोक याचा चंद्रकलांशीं संबंध लावतात, व त्यावरूनच त्यास ' Lunacy ' असें नांव पडलें आहे.

(२) वेडानें उत्पन्न होणारा त्वेष. याला Madness ह्मणतात.

(३) वेडानें उत्पन्न होणारी भयंकर कायमची स्थिति. यास Delirium, Tremens, Mania, किंवा Frenzy असें ह्मणतात.

(४) मानसिक शक्तींचा एका विषयाकडेच ओढा किंवा नाद. यास Monomania ह्मणतात.

(५) मानसिक शक्तींचा लोप किंवा मुग्धावस्था. यास Domentia ह्मणतात.

असे प्राच्यपाश्चात्य वैद्यकाचे दृष्टीनें वेडाचे भिन्न भिन्न प्रकार गणले आहेत.

३. तिसरा प्रश्न असा कीं, वेड कोणत्या वर्षीं लागतें. जन्मतः कांहीं माणसें वेडीं असतात. कांहींना ऐन तारुण्यांत किंवा ' साठी बुद्धि नाठी ' या ह्मणीप्रमाणें उतारवयांत वेड लागतें. पण या दोन वर्गांच्या वेड्यांत फरक आहे. जॉन लॉक् या महशूर तत्ववेत्त्यानें आपल्या ' मानवी बुद्धीवरील निबंधांत ' असें ह्मटलें आहे कीं पहिल्यांना विचारशक्ति मुळींच नसते व दुसऱ्यांना विचारशक्ति असते. पण त्यांची कल्पनाशक्ति अनावर असल्यामुळें त्यांची विचारशक्ति

आपलें काम बिनचूक करीत नाहीं. पहिल्यांना फार थोडे सिद्धान्त बसवितां येतात किंवा मुळींच बसवितां येत नाहींत, व वाद-विवाद तर क्वचितच करतां येतो. पण दुसऱ्यांचें तसें नसतें. ते 'सूत्रधार' शब्दावर विनोद करणाऱ्या विदूषकाचे पात्राप्रमाणें नेमके तर्क लढवून, श्रोतृजनांस आपल्या अलौकिक कोटिक्रमानें हंसवून सोडतात! पहिल्यास idiot व दुसऱ्यास lunatic असें ह्मणण्याचा प्रघात आहे.

४. चौथा प्रश्न असा आहे कीं वेड कोणत्या कारणांनीं लागतें. याचा बराच उल्लेख दुसरा प्रश्न सोडवितांना आला आहे. वाग्भटांनीं वेड हें शारिरिक किंवा मानसिक कारणामुळें लागतें असें आपल्या 'अष्टांगहृदय' नामक प्रख्यात ग्रंथांत लिहिलें आहे. आतां तीं शारिरिक किंवा मानसिक कारणें त्यांच्या दृष्टीनें कोणतीं हें पाहणें आहे. वाग्भट ह्मणतात कीं, अहित (न पचणारें) अन्नपान, तसेंच विकृत, असात्म्य, मलयुक्त व विषम अन्न अशांचा उपयोग केल्यानें, दुःखी व कमी धैर्याच्या मनुष्यास एखाद्या रोगाच्या जोरानें, क्षीण मनुष्यास विषम चेष्टा केल्यानें, पूज्याच्या पूजेंत उलटापालट झाल्यास मानसिक व्याधी (उदाहरणार्थ, प्रियवस्तूंचा किंवा द्रव्याचा नाश, किंवा काम, क्रोध, भय, शोक, हर्ष, ईर्ष्या इत्यादि मनोविकारांचा क्षोभ) यांनीं, उग्र व उपविष यांनीं मन बिथरून गेल्यास; या सर्व कारणांनीं सत्वगुण (धैर्यादि) कमी होऊन, हृदयांत दोष (वातपित्तकफादि) दुष्ट होऊन, बुद्धीस कलुषित करून, मनोवह स्रोतांचे मार्ग बंद करून, बुद्धि, ज्ञान, व स्मरणशक्ति नाहींशी होऊन, मनुष्य सुखदुःखास मुकून व ज्याचा हांकणारा नाहींसा झाला आहे अशा रथाप्रमाणें मी करतों काय व केलें पाहिजे काय याचा विचार न करतां भटकतो. हा सर्व वायूचा खेळ आहे. वायूचा खालची गती बंद झाली ह्मणजे तो शरीरांतील धमन्यांत शिरून आचके उत्पन्न करतो. त्यामुळें जीव गुदमरतो. डोळे ताठ व गळल्यासारखे होतात. मूर्च्छा येते. (डॉ. गर्देकृत सार्थ वाग्भट, पृ. ९९१, १०४२ पहा.)

हें सारें ठीक, पण वाग्भटांनीं उन्मादांत भूतबाधा ह्मणून एक प्रकार धरला आहे, तो सध्यांच्या शास्त्रीय युगांत कितपत टिकेल याचा मात्र विचार आहे. रा० त्रिवेदी दळपतराम दयाराम यांनीं आपल्या प्रसिद्ध 'भूतनिबंधां' त, शास्त्रीबोवांनीं आपल्या 'लोकभ्रम' नामक निबंधमालेंतील प्रकरणांत, डॉ० सखाराम अर्जुन यांनीं आपल्या 'गृहिणी-कंठभूषण' नांवाच्या पुस्तकांत, फोर्ब्स साहेबांनीं आपल्या 'रासमाले' सारख्या ऐतिहासिक ग्रंथांत व कोल्हापूर गॅझेटियरसारख्या सरकारी इतिवृत्तांत असें चकचकित लिहिलें आहे कीं, सध्यांच्या शिक्षणप्रसाराबरोबर या जबरदस्त लोकभ्रमाचें निरसन सहज होत चाललें आहे. आतां रोग्याचे डोळे लालभडक किंवा कावरेबावरे झालेले असले किंवा त्यास आचके येऊन तो रडत तर रडतच सुटेल; किंवा बोलत तर बोलतच सुटेल; किंवा मुकाट्यांनें तर मुकाट्यानेंच बसेल; किंवा विचारलेल्या प्रश्नास शिव्या देत सुटेल किंवा भराभर उत्तरें देत सुटेल; किंवा कित्येक दिवस निराहार तर निराहारच करील; किंवा आपले केंस सोडून अंगास हेलकावे देईल; किंवा रक्ताच्या गुळण्या टाकील; किंवा अशाच एखाद्या अमानुष चेष्टा करील, तर त्याचें या जन्मींचे किंवा पूर्वजन्मींचें पातक उभें राहून, त्याचे अंगीं भूतसंचार झाला आहे, असें भोळेभाविक जन वाटेल तर समजोत; जो प्रथम अगदीं शांत असेल त्याचे डोक्यांत 'भूत! भूत' अशी कल्पना वरचेवर त्याच्या डोक्याशीं तशी टकटक करून भरवोत व त्यास बावचळवून पिसाळवोत! पण ज्यांनीं या गोष्टीचा बराच विचार केला आहे, ते मात्र असली समजूत व असलें रोग्याशीं वर्तन कधींहि मान्य करणार नाहींत.

असो. वेडाचें निदान पाश्चात्य डॉक्टर असेंहि सांगतात कीं, ही मानसिक व्यथा मुष्टिमैथुनासारख्या दुर्व्यसनांनींहि उत्पन्न होते. अमेरिकेंतील, मॅसच्युसेटस् या संस्थानांतील "मॅकलियन् वेड्यांच्या शाळें"त १८३८ त १२८ रोग्यांपैकीं, २४ जण या दुर्गुणामुळें वेडे झालेले होते; वुर्सेस्टर येथील इस्पितळांस १८३८ त १९९ वेडे पुरुषांपैकीं ४२ ह्मणजे

बहुतेक एकचतुर्थांश या वाईट संवयीचे होते; अशी बालफर साहेब आपल्या sexual science (लिंगशास्त्र) नामक पुस्तकांतील २७ व्या पृष्ठांत डॉक्टर ॲक्टनची साक्ष देतात, व डॉक्टर फूट हे स्त्रियांच्या वेडेचाळ्यांसही हाच नियम लागू करतात, असें त्याच पुस्तकाच्या पुढील पानांत दिलें आहे.

तसेंच, स्वप्नावस्था (Spermatorrhœa) हा रोग बळावत चालला कीं, मज्जातंतूंची कुवत कमी होते; अजीर्ण होऊं लागतें; शरीर कृश होत जातें; डोक्यास वेदना, पाठीस कळ व सर्व शरीरभरदेखील ठणका सुरू होतो. दिवसेंदिवस स्वभाव चिरचिरा बनतो, मानसिक व्यापार शिथिल होत जातात व एकाएकीं वेड लागतें, असें डॉक्टर फूट साहेबांचें मत आहे. (सदरहू पुस्तकाचें ४८ पृष्ठ पहा) प्रोफेसर बार्थोलो यांनीं आपल्या मानसिक वैद्यक (Manual of psychological Medicine) नामक छोटेखानी पुस्तकांतील १०३ पृष्ठांत, व न्यूयॉर्क संस्थानांतील ॲटिका येथील वेड्यांच्या शाळेवरील अध्यक्ष डॉ. ग्रे यांनीं आपल्या विसाव्या वार्षिक रिपोर्टांत असें ह्मटलें आहे कीं, सदरहू संस्थेच्या दप्तरावरून ९२१ जणांचें वेड स्वप्नावस्थेपासून लागलेलें होतें.

अत्यंत विषयसेवनानें देखीलविचारशक्ति व इच्छाशक्ति या चिरडून जाऊन वेड लागण्याचा संभव असतो, असें कर्लिंग साहेबांनीं आपल्या ‘ अंडरोग ’ (Diseases of the Testicls) नामक ग्रंथांत लिहिलें आहे.

डॉक्टर फूट हे असें ह्मणतात कीं, उपदंश (syphilis) यापासून दुसरे जे भयंकर रोग उद्भवतात, त्यांत वेड हें पण येतें. (बालफरकृत ‘ लिंगशास्त्र ’ पृष्ठ ७१ पहा).

कामोपभोगाचा अतिरेक केल्यानें जसें वेड लागतें, तसें कामोपभोगाचा त्याग केल्यानें ह्मणजे ब्रह्मचर्य पाळल्यानें पण वेड लागतें, असें बालफर साहेबांनीं आपल्या ‘ प्रजोत्पादनाचा कायदा ’ (Law of population) नामक पुस्तकांत सिद्ध केलें आहे. झोला या नामांकित फ्रेंच ग्रंथका-

रानेंही आपल्या ' बहुप्रजत्व ' (Fruitfulness) या ग्रंथांत आपल्या लोकांतील प्रजोत्पादनास प्रतिबंध करणाऱ्या सृष्टिक्रमाविरुद्ध वाईट खोडी-मुळें एकंदर फ्रान्सदेशाचा कसा नायनाट होत आहे याचें उत्तम चित्र वठविलें आहे; तें पाहणें जरी विषयांतर करण्यासारखें आहे, तरी जिज्ञासु वाचकांस तिकडे आडवी नजर करण्यास कांहीं हरकत नाहीं.

ब्रह्मचर्यानें पुरुषांस जसें वेड लागण्याचा संभव असतो, तसें स्त्रियांस ब्रह्मचर्यानें आर्तस्रावविघ्न (Menstrual Disorders), तदंगभूत रक्तशोष (The form of anamia known as Green sickness, or chlorosis) मलावरोध, पोटदुखी व अपतंत्रक (Hysteria) इत्यादि विकार होण्याचा संभव असतो. डॉक्टर सखाराम अर्जुन एल्. एम्. यांनीं आपल्या नामांकित ' गृहिणीकंठभूषण ' या पुस्तकांत असें ह्मटलें आहे कीं, " गर्भाशयाचा व मस्तकांतील मेंदूचा फारच चमत्का-रिक संबंध आहे, व गर्भाशयाच्या अव्यवस्थेमुळें स्त्रियांस कांहींएक प्रकारचा उन्माद होतो, ही गोष्ट प्रत्येक प्रसंगीं दृष्टीस पडण्यासारखी असते; पण अज्ञानामुळें उन्मादाचीं चिन्हें पिशाचादिकांच्या बाधेकडेस लाविलीं जातात. " (पृ. २७ पहा.) विद्यमान इंग्रेजी प्रख्यात तत्व-वेत्ते स्पेन्सरसाहेब हे आपल्या ' आत्मनीतीचीं तत्वें ' या ग्रंथांत असेंच ह्मणतात कीं, " कांहीं अविवाहित स्त्रियांच्या गर्भाशयास रोग जडून, त्यांस फेंपरें (A fit of Epilepsy) येऊं लागतें, त्या वरचेवर बेशुद्ध पडूं लागतात; त्यांचें तोंड म्लान होतें व छातींत धडकी सुरू होते. " (फडकेकृत भाषांतराचें १९ वें पृष्ठ पहा.)

आतां ही गर्भाशयाची अव्यवस्था किंवा त्याचा रोग काय असतो हें आपणास पाहिलें पाहिजे. ' हिंदुस्थानाकरितां कुटुंबवैद्यक ' (Family Medicine for India) या प्रख्यात ग्रंथाचे कर्ते, डॉक्टर मूर हे असें लिहितात कीं, स्त्रियांचें रक्त शुद्ध करणारा मासिक रजःस्राव महि-न्याचे महिन्यास न झाल्यानें, अति संभोगानें, किंवा अति शारीरिक श्रमामुळें गर्भाशय सुजतो; किंवा घट्ट नेसणें नेसल्यानें, जड वस्तू

उचलल्यानें, मूत्र कोंडल्यानें, मानसिक किंवा शारीरिक धक्क्यानें किंवा अशक्ततेमुळें तो ढासळतो [व त्यामुळें स्त्रीस वंध्यत्व प्राप्त होतें]; किंवा त्याचे तोंडास चोळ भरते; किंवा तेथें पुळी येते; त्यामुळें आंतडीं सुजतात; आंतडीं सुजलीं ह्मणजे मलावरोध होतो, भूक मरते, खाल्लेलें पचत नाहीं, करपट ढेंकरा येतात, घाटीशीं जळजळतें, तोंडाला चूळ सुटतात व तें अन्न ओकून पडतें; छातींत धडकी भरते; डोकें, हातपाय, व पाठ हीं ज्ञानतंतूचीं स्थलें दुखूं लागतात; शरीराचे अग्रभाग [बोटें] गार वाटतात; स्वभाव चिडखोर होतो; त्यांत स्वछंदीपणा किंवा एककल्लीपणा दिसूं लागतो; दिवसा झांपड येते; रात्री झोंप नाहींशी होते; अपतंत्रक किंवा वायुगोळा (Hysteria) उठतो व गर्भाशयांतून किंवा आंतड्यांतून वायूची कळ येते व त्याचे झटके एकाएकीं येऊं लागतात. त्यांचा क्रम तसाच चालू राहिला, तर वेड (Mania) लागतें. हे झटके येण्यापूर्वीं स्त्री स्फुंदून स्फुंदून रडूं लागते, जांभया देते, उचक्या काढते, घशांत वायुगोळा येऊन गुदमरल्यासारखा तिला भास होतो. ती शुद्धीवर असते. तिचा चेहरा नेहमींप्रमाणें असतो. जर तिचा झोंक गेला, तर तो चांगल्या सुरक्षित व सुखाच्या स्थळीं जातो व ती आपणास दुखापत न होण्याविषयीं जपत असते. तिचे हातपाय हालूं लागतात. तरी ते तिला नीट ठेवतां येतात. ती वारंवार रडत असते व हंसत असते. झटका गेल्यावर तिला लवकी साफ होते.

स्त्रीपुरुषांस वेड लागण्याची शास्त्रीय उपपत्ति एकंदरींत अशी आहे.

९. पांचवा प्रश्न ह्मटला ह्मणजे वेड किती दिवस टिकतें हा होय. या प्रश्नाचा दोन शास्त्रांच्या दृष्टीनें विचार कर्तव्य आहे. एक, मानसिक शास्त्र; व दुसरें वैद्यक शास्त्र.

आतां प्रथम मानसिक शास्त्राच्या दृष्टीनें वेड किती दिवस टिकतें तें पाहूं. वेड्याच्या डोक्यांतील असंबद्ध कल्पनांचा सांवळागोंधळ इतका जबरदस्त असतो कीं, जोंपर्यंत तो चालू असतो, तोंपर्यंत त्या वेड्याशीं

बुद्धिवाद करणें अरण्यरुदिताप्रमाणें आहे! पुढें कालावधीनेंच त्यास त्या असंबद्ध कल्पनांचा विसर पडणार आहे. जॉन् लॉक्नें असेंच ह्मटलें आहे कीं, " Time cures some disorders of the mind which reason cannot " [जे कांहीं मानसिक रोग बुद्धिवादानें बरे होत नाहींत, ते कालावधीनें बरे होतात.] मानवी बुद्धीवरील निबंध, पुस्तक २ रें पृष्ठ ३१८ पहा. तद्वत् शेकस्पीयरनेंहि एके ठिकाणीं उद्गार काढिले आहेत कीं, " Time is the healer of wounds " [काल हा जखमा भरून काढणारा आहे]! आपल्या मनांतील कल्पना आपापल्या स्वरूपाप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें तेथें वास करीत असतात; आणि यामुळेंच त्या कालावधीनें परस्परापासून दूर होतात. पण तसें बुद्धीच्या जोरावर मात्र होत नाहीं. यास एक नेहमींचें व्यवहारांतलें उदाहरण घेऊं. जें ' चिमुकलें छकुलें ' आपला आईचा जीव कीं प्राण असतें, तें एकाएकीं हा लोक सोडून गेलें कीं, तिला कोणा आप्तइष्टांनीं चार समजुतीच्या गोष्टी सांगून, तिच्या पुत्रशोकाचा विसर पाडण्याचा प्रयत्न केला तर तो बहुतेक फुकट जातो. तो विसर पडेल तेव्हां पडेल. त्या माऊलीचें शांतवन केव्हांही करूं गेलें तरी तें अकालींच होतें, व अकालीं शांतवन हें केवळ ' क्षते क्षारमिव ' असह्य आहे. गोल्डस्मिथनें आपल्या ' व्हिकार ऑफ् वेकफिल्ड ' नामक जगद्विख्यात कादंबरींत असेंच ह्मटलें आहे कीं, Premature consolation is but the remembrancer of sorrow!

आतां वैद्यकशास्त्रानें प्रस्तुत प्रश्नाचा कसा काय उलगडा केला आहे तो पाहूं. कांहीं विशेष परिस्थितींत वेड हें मुदतीचें असतें. इंग्रेजी वैद्यकाप्रमाणें, ज्या मुलीस वेड लागलें आहे, तिचा आर्तस्राव साफ होऊं लागला कीं तें जातें. ज्या तरुणीस वेड लागलें आहे, ती गरोदर असेल तर ती बाळंत झाली ह्मणजे बरी होते. ह्मणजे वेड हें दुसरें एखादें मोठें दुखणें आलें कीं त्याबरोबर जातें. हा जो नियम स्त्रियांच्या वेडास लागू आहे, तो पुरुषांच्या वेडास अपवादात्मक आहे

असें नाहीं. तसेंच वेड फार झपाट्यानें लागलें असेल, तर तें तितक्याच झपाट्यानें बरें होतें. कारण डॉक्टर लोकांत अशी ह्मण प्रचारांत आहे कीं, ‘ ज्याचा जोर जलद असतो, तो जलद उतरतो ’ (A sudden rise has a sudden fall)! पण याच्या उलट, जो रोग जुना झाला आहे अथवा मोठेपणीं झाला आहे, तो बहुतेक मरेपर्यंत राहतो. इतका तो हट्टवादी असतो!

६. सहावा प्रश्न हा आहे कीं, वेड कसें घालवितां येतें. भूतपिशाचांवर विश्वास ठेवणारे लोक देवर्षि, देवभक्त, मंन्त्री, पंचाक्षरी, वस्ताद इत्यादिकांच्या नादीं लागून, समंधाला खेळवून, ज्यास तें अमावास्या पौर्णिमेला, ग्रहणादि पर्वणीला क्षेत्रस्नानावेळीं किंवा वाटेंत एकटें जातांना झपाटतें, त्यास भारलेले उडीद किंवा अथर्वणवेदाप्रमाणें मंत्रवलेलें पाणी मारून किंवा झाडूनें किंवा पाल्यानें छाछू करून, किंवा अंगारेधुपारे, मिरचांच्या धुऱ्या वगैरे देऊन किंवा लिंबें, सुया इत्यादि डोक्यांत टोंचण्याची दहशत घालून, किंवा एकदोन श्रीमुखांत लकलकवून किंवा जमदग्नीच्या रागीट शब्दांनीं कोरडा दपटशा देऊन, किंवा हातापायावर छड्या ओढून, किंवा अन्नाचा किंवा उलट्या पिसांच्या लहानमोठ्या कोंबड्यांचा बळी देऊन, त्या खविसाच्या तावडींतून बिचाऱ्याची सुटका करतात असें ह्मणतात.

बायकांची कल्पनाशक्ति पुरुषांच्या कल्पनाशक्तीपेक्षां अधिक तीव्र असल्यामुळें; त्यांना पुरुषांपेक्षां भूतपरीक्षा अधिक असते. ह्मणजे बायकांना पुरुषांपेक्षां अपतंत्रक (Hysteria) किंवा त्यासारखे दुसरे ज्ञानतंतूंचे रोग लवकर जडण्यासारखे असतात.

जेव्हां साधारण मंत्र्यास रोगी बरा करतां येत नाहीं, तेव्हां ते त्यास करवीर सरकारच्या हद्दींतील नरसोबाचे वाडीस धाडतात. हें स्थान दत्ताचें आहे. येथून पेटा शिरोळ उत्तरेस ३ मैलांवर आहे. येथें रोगी रोज पवित्र कृष्णेच्या शुद्ध व थंडगार पाण्याचें स्नान करतो; श्रीची महापूजा, पालखी, अभिषेक, एकादशणी, प्रदक्षिणा, माधुकरीसेवन,

चंडीपाठ, गुरुचरित्रपाठ इत्यादि परोपरीची सेवा यथाशक्ति करूं लागतो. रोज धूपारतीचे वेळीं देवळांतील चार हेमाडपंती खांबांपैकीं कोणत्या तरी एकाशीं रोग्यास उभें करतात. मग त्यावेळचा तेथील तो झांजांचा झणझणाट, घाटांचा किणकिणाट, आरत्यांचा दणदणाट, भक्तांचा कलकलाट, दिव्यांचा लखलखाट व पालखीचा झकझकाट असा विस्मयकारक देखावा पाहून, श्रीच्या दरबारीं आलेल्या ' नवीन भूता ' चें धाबें दणाणून जाऊनच कीं काय तें डुलूं लागतें. मग तें एकसारखें तासाच्या तास उभें राहण्याच्या शिक्षेनें दमत असेल तर नकळे! किंवा तेथील बडवे त्याचे कानींकपाळीं जी ओरड चालवतात कीं, महाराज तुझ्या पाठींत सोटे मारतील किंवा तुला बाटलींत भरून कृष्णाबाईत बुडवतील, तेव्हां इथला इंगा समजेल; तीमुळें ते जसें सुचवितील, तसें तें बोलूं लागतें. नंतर आपली ज्यावर इच्छा राहिली असेल तें मागून घेतें व आपल्या हस्तकास सोडतें. मग तशी कबूली मिळाल्यावर रोग्यास कृष्णेचें स्नान घालतात. तेव्हां तेथें त्या भूतास मुक्ति मिळते. पण कांहींचीं भूतें त्यास बरेच दिवस अडवून धरतात. अशांना नरसोबाच्या वाडींत ' दत्तगुरू माझा । त्रिजगताचा राजा ' इत्यादि भजनांत दंग होऊन श्रीचा दृष्टान्त होईपर्यंत कालक्रमण करावी लागते.

जशी देशावर नरसोबाच्या वाडीची आख्या आहे, तशी कोंकणांत हरेश्वराची आख्या आहे. तिकडे पण असेच प्रकारांनीं भूतास गति मिळते. १८९८ सालीं तिकडे एका तरुण वेड लागलेल्या गतभर्तृकेस तिचे वयोवृद्ध पालक मुंबईहून नेतांना मला बोटींत भेटले होते. त्या वेड लागलेल्या बाईच्या मनावर वरील नरसोबाच्या वाडीची हकीकत इतकी कोणी भयंकर रीतीनें भरवून दिली होती कीं, तिला तिच्या पालकांनीं कितीही दाबलें, तरी ती तीच ती ह्मणत सुटे. तिची बसण्याची ऐट व पोषाखाचा प्रकार विलक्षण होता. तिनें आसनमांडी घालून डोक्यावरून बाळंतिणीसारखा आडवा पदर घेतला होता. व

खोखो हंसत हंसत ती तोंडानें असें असंबद्ध भाषण करीत होती कीं, ' दत्तदिगंबर मला मारून टाका! तरवारीनें मारून टाका! ह्मणजे लोकांना तरी हा तमाशा पहायाला नको! अहो, दत्तदिगंबर, तुह्मी कोठें आहा! मला कां नाहीं दर्शन देत? माझे दत्तदिगंबर! दत्तदिगंबर! दत्तदिगंबर!—मला कोणी बोलूं देत नाहींत! माझं कोणी एकत पण नाहींत!' येथें या बाईची हकीकत देण्याचा मतलब चाणाक्ष वाचकांच्या लक्ष्यांत आला असेलच. माझें ह्मणणें इतकेंच कीं, नसत्या भीतिकारक कल्पना सर्व प्रसंगीं कामीं पडतात असें नाहीं. ज्याच्या मनांत त्या भरून द्यावयाच्या आहेत, त्याच्या मनावर त्यांचा कसा-काय परिणाम होतो, हें पण बारकाईनें ताडलें पाहिजे. नाहीं तर, तें आगींत तेल ओतल्यासारखें होतें!

गुजराथेंतील लोक प्रभासपट्टण किंवा सोमेश्वर या बंदरीं आपले समंध लागलेले नातेवाइकांस धाडतात. उत्तर हिंदुस्थानांतील लोक त्यांस दतिया संस्थानांतील ' बरमजी ' नांवाच्या स्थानास नेतात.

मुसलमान लोक आपल्या रोग्यास शेरवाड किंवा कराड गांव येथील चांदसाहेबांचे कबर-दर्शनार्थ किंवा बंगालशाच्या कबर-भेटीस नेतात. तेथें मुसलमानी रिवाजाप्रमाणें सेवा झाली कीं दृष्टांत होऊन, रोग्यास आराम पडतो.

अशी एकंदरींत भूतबाधा बरी करण्याची प्रचारांत असलेली तऱ्हा आहे. तीमधील धमकावणीचे प्रकार, शुद्ध, स्वच्छ, थंडगार हवापाणी व साधें जेवण यांची योजना वाग्भटासारख्या विचारी शास्त्रज्ञासच नव्हे, तर अलीकडील सुधारलेल्या पाश्चात्य वैद्यकासही ती मान्य आहे. उन्मादासारख्या मेंदूच्या रोगावरील साधारण शास्त्रीय उपचार आपल्या मान्य पूर्वजांनीं शोधून काढिले एवढेंच नाहीं, तर ते सामान्यजनसमूहांत चिरस्थायी कसे राहतील याचीही त्यांनींच अजब तरकीब शोधून काढिली. आपलें धर्मशास्त्र ज्यास थोडें बहुत अवगत असेल, त्यास हें सांगावयास नकोच कीं तें आज हजारों वर्षें विधर्मी अंमलांतून वांचलें आहे,

व तसें वाचण्याचें कारण पण हेंच आहे कीं, शास्त्रकारांनीं जें जें कांहीं नवें शास्त्रांत घातलें, त्यास धर्माचें कुलंगडें लावून देऊन मग तें प्रचारांत आणण्याचे नियम घालून दिले आहेत व अखेर देशकालवर्तमानाकडे लक्ष्य ठेवून, त्यांत त्याच धोरणानें न कळत फेरफार केले आहेत. सामान्यजनसमूह ह्मणजे गतानुगतिक अतएव अज्ञ मुलासारखा असतो व अज्ञ मुलास कडू औषध सामोपचारानें देणें झाल्यास, तें गुळांत किंवा साखरेंत पाकवून किंवा मिसळून देतात. तसें, नवीन शास्त्रीय शोध सामान्यजनसमूहाच्या मनांत पक्का ठसण्यास, त्याबरोबर चित्तवेधक चमत्कारिक व त्यांच्या मूळच्या समजुतीस धरून असें कांहींतरी कल्पित पाठराखी असलें पाहिजे व उन्मादासारख्या शास्त्रीय विषयांत भूतोन्माद हें प्रकरणही तसेंच कांहींतरी गौडबंगाल असावें असें वाटतें.

असो. आतां इतर उपचाराकडे वळूं. आपल्या वैद्यकांत शारीरिक उन्मादावर, सौम्य वमन, रेचक, शिरोबस्ति* व शिरोविरेचन हीं करावींत. असे केल्यानें, शरीर शुद्ध होऊन मन प्रसन्न होतें. इतक्यावर न भागल्यास, तीक्ष्ण नस्य व अंजन करावें. ब्रह्मीच्या अर्काचे ४८ थेंबपर्यंत थोड्याशा पाण्यांत मिसळून ते दिवसांतून चारवेळां द्यावेत. डोक्यावर ब्रह्मीचाच ओला पाला चोळावा. यामुळें मेंदूचा दाह (Brain Fever) व भ्रम उतरतो. वाग्भटानें सांगितलेला स्वेदविधि (वाफारा किंवा वाफ देणें) पण गुणकारक आहे. त्याविषयीं त्यानें असें ह्मटलें आहे:—

स्नेहक्लिन्नाः कोष्ठगा धातुगा वा
स्रोतोलीना ये च शाखास्थिसंस्थाः ।

---

* डोक्यावर कातड्याची पाळ करून, त्यांत कोमट तेल सुमारें १५ मिनिटेंपर्यंत ठेवणें, ह्मणजे तोंड व नाक वाहूं लागतें. त्यांचा स्राव मेंदूपासून होत असतो. तो तसा सुरू न झाल्यास, वातापित्तकफांवर अनुक्रमें २॥, २, १॥ तासपर्यंत शिरोबस्ति धारण करावी. नंतर खांदे वगैरेचें मर्दन करावें. अशी शिरोबस्ति ३ पासून ७ दिवसपर्यंत सेवन करावी. (डॉ. गर्देकृत सार्थ वाग्भट, पृ. २५१.)

दोषाः स्वेदैस्ते द्रवीकृत्य कोष्ठं
नीताः सम्यक् शुद्धिभिर्निर्ह्रियन्ते ॥
सूत्रस्थानं, अध्यायः १७ श्लोक २९.

कोठ्यांतील, धातुसंबंधी, शरीरच्छिद्रासंबंधी, शाखा व हाडें यांसंबंधी जे दोष असतात, ते स्नेहाचेयोगानें पातळ होऊन, घामाचे रूपानें कातडींतून बाहेर पडतात. अमेरिकन डॉक्टर कुन्हे व अमेरिकेहून परत आलेले डॉक्टर श्रॉफ् (मुंबईतील Temperance and Buisson Bath चे चालक) यांना हा प्राचीन स्वेदविधि मान्य आहे एवढेंच नाहीं, तर ते सध्या सुधारलेल्या जनसमूहांत तो जारीनें प्रचारांत आणण्याची खटपट करीत आहेत.

डॉक्टर देशमुख एम्. डी., बी एस.सी. यासारख्या भिषग्वर्यांचे उपचार ह्मटले ह्मणजे प्रथम जमालगोट्याच्या तेला(Croton Oil)चे एक दोन थेंब साखरेंत किंवा इतर खाद्यपदार्थांत देऊन पुष्कळ जुलाब करवून पोट साफ करावें व मेंदूच्या मज्जातंतूवरील ताण हलका करावा ह्मणजे त्यास थंडाई व आराम पडतो. नंतर कोणतें तरी एखादें मस्तकास विश्रांतिदायक मिश्रण(Sedative Mixture) देतात तें पोटांत घेण्यास रोगी त्रास देईल तर क्लोरोफार्मनें त्यास बेशुद्ध पाडून, त्याचे दंडांत सूईनें अफूच्या अर्कांचें सेचन (Injection of morphia) करावें. त्यामुळें फार झालें तर रोगी एखाद दिवसपर्यंत शांत रहातो. पण तसला उपचार वारंवार करणें घातक आहे. झटका आलेला असतां अंगावरील वस्त्र ढिलें करावें; पुष्कळ मोकळी हवा येऊं द्यावी; पंख्यानें वारा घालावा; गुलाबपाणी, कोलनवॉटर, डोक्यावर शिंपडावें; बर्फाची पिशवी डोक्यावर ठेवावी; हातपाय खूप घांसावेत; रोगी अशक्त असेल, तर त्यास पेलाभर पाण्यांत, चमचाभर अमोनिया द्यावा; तो बळकट असेल, तर त्याचा जीव गुदमरेपर्यंत त्याचें नाकतोंड दाबून एकदम सोडून द्यावींत ह्मणजे झटका उतरेल. पण रोग जुनाट असेल, तर डोक्यावर थंडपाण्याच्या झारीची सतत धार धरावी. अशा

रोग्याशीं दांडगाई करूं नये. कारण त्यास दुसरेहि रोग असतात. तसेंच त्यास फारशी माया दाखवूं नये. झटका येत आहे हें समजण्याची त्यास अक्कल असते. म्हणून तो येण्या अगोदर चांगलें अन्नसेवन, चांगली हवा, व्यायाम, मानसिक उद्योग, शौचविधि, थंड-पाण्याचें स्नान इत्यादि प्रसंगानुसार त्यांजकडून करवावींत. ज्या स्त्रियांस गर्भाशयापासून हा विकार होतो, त्यांना क्विनीन नेहमीं द्यावें; कारण तें गर्भाशयास चांगलें करतें; व त्यास रोज सकाळीं थंड पाण्याचा बस्ति द्यावा.

कुलाब्यांतील सरकारी वेड्यांच्या शाळेंतही असेच कांहींतरी उपचार प्रथम करून पाहतात. वाडीसारख्या क्षेत्राचे स्थानीं उपाध्यायांच्या महा-पूजेची दक्षिणा जबर असते. पण या शाळेंतील डाक्टराची प्रथम परी-क्षणाची फी तीहूनही जबर म्हणजे ५९ रुपये असते. व रोजचा खर्च [औषधपाणी, खाणेंपिणें, घरभाडें इत्यादिकांचा] रोग्याचे किंवा त्याचे पालकाचे ऐपतीप्रमाणें ४ आण्यापासून ४ रुपयांपर्यंत असतो. अनाथ रोग्यास सरकार आपल्या अंगावर पोसतें. पण हिंदू [विशेषतः उच्चवर्णांतले हिंदू] रोग्यांच्या जेवणाखाण्याची सोय, त्यांच्या धर्माप्रमाणें नसते म्हणून या सुरेख सरकारी संस्थेचा आपणास व्हावा तसा फायदा होत नाहीं.

ही वेड्यांची शाळा मुंबईच्या अगदीं टोंकाला आहे. म्हणजे हिच्या दोन्ही तिन्ही बाजूंस समुद्राची शुद्ध, थंड हवा, सारखी खेळती असते. येथें शहराची गजबज मुळींच नाहीं. जिकडे तिकडे शांतता वास करीत असते. कांहीं गडबड ऐकूं येते, ती फक्त मधून मधून निघणाऱ्या एखाद दुसऱ्या उन्मत्त झालेल्या पिसाटाचें किंकाळणें होय! इमारतीच्या मोठ्या आवारांतील बागेंत कित्येक थंडावलेले वेडे मुकाट्यानें फेरफटका करीत असतात; कित्येक लतामंडपांत हवा खात बसलेले असतात; कित्येक वाचनालयांत छातीवर वर्तमानपत्र टाकून धूम्रपानाचे झुरक्यावर झुरके घेत चैनीनें पडलेले असतात; कित्येक बिलियर्ड्स नांवाचा गोट्यांचा खेळ

तर खेळच खेळत असतात; कित्येक कारागीर आपापला धंदा तर धंदाच करीत असतात; कोणी विणतात, कोणी रंगवतात, कोणी दोऱ्या वळतात, अशा नानाप्रकारच्या व्यवसायांत त्या त्या वेड्यांचें मन गुंतवून ठेविलेलें असतें. हे वेडे सकाळचा एकदां साताला चहा घेतात; मग दहाला जेवतात; त्यावर संध्याकाळीं चाराला पुन्हां जेवतात. पण जे मोठ्या दर्जाचे असतात, त्यांचा बेतबात 'देणावळ तशी धुणावळ' या म्हणीप्रमाणें अगदीं जेथल्या तेथें यथास्थित असतो. त्यांच्या तैनातीला एखादा सेवकदेखील असतो. चारानंतर रोग्यास आपापल्या ठिकाणीं जाऊन बसावें लागतें. पण जे थंडावलेले श्रीमंत रोगी असतात, त्यांच्याबरोबर सरकारी शिपाई देऊन, त्यास सहा वाजेपर्यंत बाहेरून हवा खाऊन येण्याची मोकळीक असते. जे दांडगाई करणारे असतात, त्यांना चोवीस तास आपापल्या कोठडींत काढावे लागतात; मात्र शौचास कायतें बाहेर निघतील तेवढेच. रात्रीं व दिवसां वेड्यांवर देखरेख ठेवणारे कामदार असतात. स्त्रियांकरितां अगदीं वेगळी सोय आहे. तेथें सारें स्त्रीराज्य आहे. अशा रीतीनें दोन मोठाले डॉक्टर यांच्या नजरेखालीं एवढी ३०२ उन्मत्त मंडळीची संस्था सुरळीत चालली आहे, हें एक इंग्रज सरकारच्या दयालुत्वाचें उत्तम द्योतक आहे!

यावरून, आपले प्राचीन व सध्यांचे सुधारलेले उपचार कसकसे जुळतात हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. अशा उपचारांनीं रोगी जरी बरा झाला, तरी त्यास तूं वेडांत अमुक केलेंस अशी वरचेवर आठवण देऊं नये. त्यास आवडणाऱ्या विषयांत त्याचें मन गुंतवून, त्याचे मानसिक क्लेश दूर करून, त्याची शक्ति वाढविली पाहिजे.

७. सातवा प्रश्न असा आहे कीं, वेडाचीं चमत्कारिक उदाहरणें कोणतीं, हीं शोधून काढावयाचीं म्हणजे वाङ्मयाकडे उडत उडत नजर फेंकण्यासारखें आहे.

रामायणांत, मत्सरानें कैकेयीचें डोकें कसें भणभणून गेलें होतें व भरतास गादी मिळण्याचा रंग जुळून येतांच तें कसें ताळ्यावर आलें, व

रावणास सीतेचें वेड कसें लागलें होतें व त्यांत त्याचा कसा अंत झाला; महाभारतांत, दुर्योधनास बंधुवैरानें किती वेडें करून सोडिलें होतें; कीचकास सैरंध्रीचा दास कसें बनावें लागलें होतें व त्यांत त्यास कशी खरपूस बक्षिसी मिळाली होती; इत्यादि वेडाचीं रेखाटलेलीं चित्रें आहेत. पण ज्यास तत्संबंधीं आपली हौस पुरवून घ्यावयाची असेल, त्यानें संस्कृत वाङ्मयाच्या नाट्यकलेच्या काळाकडे वळलें पाहिजे. नाट्यकलेचे आद्यगुरु भरतमुनि यांच्या नाटकाविषयीं सध्यां कोठें प्रख्याति नाहीं. तर त्या नामशेष आद्यगुरूस सोडून, ज्याचें नांव घेतलें असतां, 'अनामिका सार्थवती' होते, अशा कविकुलगुरु कालिदासाच्या कृतीकडे वळूं.

(अ) दुष्यंताचें वेड.

कालिदासानें मनुष्यास कोणत्या कारणांनीं वेड लागतें, तें कसकसें वाढत जातें, त्यावर कोणते रामबाण उपाय आहेत, हें आपल्या नाटकांत उत्तम व्यक्त केलें आहे. अभिज्ञानशाकुंतलांत, मनुष्यस्वभावांतील सुप्रसिद्ध तत्व 'धीरमपि जनं विप्रलंभरसो विकारयति' (धैर्यवान् मनुष्यासही विप्रलंभरस वेडा करून सोडतो) हें त्यास पूर्णपणें मान्य आहे; व दुष्यंतराजास 'शकुंतलाव्याधी'नें कसें जर्जर केलें आहे हें त्यानें सहाव्या अंकांत हुबेहूब वठविलें आहे. पहिला प्रसंग असा आहे कीं, राजास खुणेची अंगठी सांपडून, शकुंतलेशीं झालेला गांधर्वसंबंध आठवतो. हें मानसिक शास्त्रांतील कल्पनासंगतीच्या कायद्या (Laws of Association) प्रमाणें ठीक आहे. पण त्या अंगठीनें शकुंतलेच्या 'कोमलबंधुरांगुली'स सोडून शचीतीर्थांत कां बुडी मारली असें राजानें तिला विचारणें ह्मणजे वेडांत शिरण्यासारखें आहे. दुष्यंत जर दोनचार वर्षांचें बालक असता, तर त्यास तें शोभतें. कारण, आपण असें नेहमीं पाहतों कीं, विचारशक्ति अपरिपक्व असल्यामुळें, लहान मुलें ज्या जिन्यावरून गोलांट्या खात गडगडतात त्यास तीं शिव्या देतात किंवा जो काठीचा घोडा हळू चालतो, त्याचा तीं यथास्थित समाचार घेतात. पण मौज ही कीं, दुष्यंत लगेच शुद्धीवर येऊन, आपल्या वरील बालिश करणीस आपणच हंसतो व ह्मणतों कीं—

अचेतनं नाम गुणं न वीक्षते
मयैव कस्मादवधीरिता प्रिया?

'खरोखर, निर्जीव वस्तूंना गुणाची पारख नाहीं. मीच कशाला प्रियेची अवहेलना केली?'

दुसरा प्रसंग असा आहे कीं, शकुंतलेचा चित्रफलक पाहून, दुष्यंतास तिच्या लावण्याविषयीं कल्पना सुचतात व तिला टाकल्याबद्दल त्यास दुःख होतें; हें सारें यथास्थित आहे. पण, आपल्या प्रियेच्या वदन-कमलाचा अभिलाष करणारा कुसुमचोर मधुकर त्यास कमलाचे पोटीं बंदीवान् करूं पाहणारा राजा पुन्हा वेडाचे झटक्यांत सांपडला आहे असें कोण ह्मणणार नाहीं? तें त्याचें वेड त्याचा जिवलग मित्र माठव्य यानें त्याचे नजरेस आणिलें; तसा तो शुद्धीवर येऊन आपल्या अविश्रांत दुःखानें फिरून विव्हळ होतो.

तिसरा व अखेरचा प्रसंग ह्मटला ह्मणजे धनवृद्धि वाण्याची अनपत्यतेची हकीकत ऐकून, त्याच्याप्रमाणें आपल्या सांप्रतच्या अनपत्यतेची त्यास आठवण होते; त्यामुळें आपले पितर पिंडे पुढें मिळतील कीं नाहीं या संशयांत पडतील, ही कष्टद कल्पना राजाचे मनांत येते व तिचा परिणाम असा भयंकर होतो कीं, तो बेशुद्धच पडतो!

येथें दुष्यंतराजाच्या वेडाची परमावधि झाली असें कालिदासानें सुचविलें आहे. आतां तो त्यास शुद्धीवर आणण्याची खटपट पूर्वीपेक्षां अधिक जारीनें चालवितो. कारण रोग ज्या मानानें भयंकर होत असतो त्या मानानें उपचारहि भयंकरच पाहिजेत. आपला जीवश्च कंठश्च माठव्य 'अब्रह्मण्यं अब्रह्मण्यम्' असा भीतिभिन्न स्वर काढीत आहे, हें ऐकून राजा खाडदिशीं शुद्धीवर येतो; त्यास भूत बनून पछाडणाऱ्या मातलीचा समाचार घेण्यास लागतो; व पुढील सर्व कामें रीतीप्रमाणें करूं लागतो.

यावरून वेड तात्काळ घालविण्यास जर कांहीं एखादा उत्तम उपाय असेल, तर तो कालिदासास पूर्ण अवगत होता असें दिसतें. तो

ह्मणतो कीं मानसिक उन्मादावर रामबाण औषध ह्मटलें ह्मणजे 'संक्षोभ' हें होय. या अर्थाचा त्याचा श्लोक असा आहे:—

ज्वलति चलितेन्धनोऽग्निर्विप्रकृतः पन्नगः फणां कुरुते ।
तेजस्वी संक्षोभात्प्रायः प्रतिपद्यते तेजः ॥

'विस्तव लांकडें चाळविलीं कीं पेटूं लागतो, नागास चिडविलें कीं तो फणा काढितो, बुद्धिमान् पुरुष फार रागावला ह्मणजे बहुधा आपलें तेज पाडतो!'

(आ) विक्रमाचें वेड.

विक्रमाचें वेड दुष्यंताचे वेडाहून अधिक भयंकर आहे. त्यांतही दुष्यंतास स्थिरस्थावर करण्याकरतां त्याचा परम स्नेही माठव्य, हा बहुतेक सदा त्याचे बरोबर असे; पण विक्रम तर एकटाच फिरत आहे. शिवाय, दुष्यंताचे विनोदार्थ राजवाड्यानजीकची बाग हें स्थल योजिलें आहे; पण विक्रमास तर भडकवण्याकरतांच कीं काय कुमार वनाची योजना केली आहे. कारण, सृष्टीचें विराट् स्वरूप जेथें प्रगट असतें तेथें वेड्यांच्या कल्पनाशक्तीस फारच ऊत येतो, असें याच कथाभागावरून उत्तम व्यक्त होतें.

शकुंतलेची ओळख न पटल्यामुळें, दुष्यंतानें प्रथम तिला आपण होऊन आलेली परत घालविण्याची खटपट केली; व मागाहून खुणेची अंगठी हातीं आल्यावर, त्यास कृतकर्माचा पश्चात्ताप झाला. हें त्याच्या वेडाचें बीज होय. विक्रमाचे वेडाचें तरी असेंच विप्रलंभरसांत बीज आहे. मंदाकिनीच्या कांठीं, वाळूनें खेळणाऱ्या 'उदकवती' नावांच्या गंधर्वकन्येवर आपल्या प्रियानें नेत्रकटाक्ष फेंकिले ह्मणून सवतीमत्सरानें अति तापलेली उर्वशी विक्रमास सोडून, तडतडतड जी चालती झाली, ती कुमारवनांत दुर्दैवानें लता होऊन नाहींशी झाली व तिला त्या वनांत शोधतांना राजा उन्मत्त झाला.

असें वेड लागल्यावर, प्रथम 'कामार्ता ही प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु' (कामी जनास सजीव निर्जीव वस्तूंची स्वभावतःच परीक्षा होत नाहीं.) असें

प्रतिपादन करणाऱ्या 'मेघदूतां' तील यक्षाप्रमाणें, विक्रमराजा आकाशांतील काळ्या ढगास आपली प्रिया पळवून नेणारा चोर समजून, दगड घेऊन त्यास मारावयास धांवतो. दुष्यंत आपल्या प्रियेचा आषक जो भ्रमर त्याला बंदीवान् करण्याचा सौम्य उपाय तरी योजितो. यक्ष तर बोलून चालून आपल्या प्रियेस कुशलवृत्त कळविण्याकरतां 'मेघा' स दूत बनवितो. पण विक्रमास तर त्या काळ्या ढगाची दगडानें पूजा करावीशी वाटते. यावरून त्याचें वेड कोणत्या थरास येऊन पोंचलें होतें, हें स्पष्ट होतें. तरी मौज ही कीं, त्याची विचारशक्ति तात्काळ जागृत होते, व त्यास तो केवळ यःकश्चित् मेघ आहे असें वाटून आपला आशाजनक तर्क खोटा ठरला असें मनांत येऊन, एकाएकीं इतका खेद होतो कीं, तो लगेच मूर्च्छित पडतो. नंतर त्या मेघांतून जिकडे तिकडे जलवृष्टि होऊं लागते. तेव्हां ही स्वारी आपली प्रिया हातीं लागेपर्यंत तरी त्या मेघास तसा राग न करण्यास आज्ञा करिते; व अखेर आपण आपलें असें समाधान करून घेते कीं, 'राजा कालस्य कारणं' सबब त्या मेघास तरी शब्द लावणें फुकट आहे!

अशीच पुढील प्रत्येक प्रसंगीं विक्रमाची बुद्धि फांकलेली दिसते. जें जें त्यास भेटे, त्याशीं तो असाच वितंडवाद करीत सुटे. वनमार्ग, प्रियेचें स्तनांशुक, मयूर, कोकिळा, राजहंस, चक्रवाक, मधुकर, नागाधिप, पर्वत, नदी, लता इत्यादिकांना आपल्या उर्वशीचा शोध सांगण्याविषयीं तो घटकेंत हात जोडतो व घटकेंत शिव्याही हांसडतो! अखेर उर्वशी ज्या लतेंत रूपांतर पावली होती, तीस हात लागतांच त्याला आपल्या प्रियेच्या स्पर्शाचा खराच भास होतो. तरी तो त्यास मागील अनुभवावरून स्वप्नवत् वाटतो व त्यामुळें हर्षवायूनें मूर्च्छित पडल्यावर, आपणास आपली मनोरमा उर्वशी उठवीत आहे अशी सोन्याची घडी एकदाची आलेली पाहून त्याच्या मनाची घडी पूर्ववत् होऊन तो ह्मणतो--

त्वद्वियोगभवे, चण्डि! मया तमसि मज्जता।
दिष्ट्या प्रत्युपलब्धासि चेतनेव गतासुना ॥

" हे रागीट स्त्रिये! तुझ्या वियोगापासून उद्भवणाऱ्या अंधकारांत चांचपडत असतां, मृत मनुष्यास पुन्हा जीव यावा त्याप्रमाणें तूं मला (माझ्या) भाग्यानें फिरून प्राप्त झालीस! "

(इ) श्रीरामाचें वेड.

' उत्तरे रामचरिते भवभूतिर्विशिष्यते ' (' उत्तररामचरित्रां ' त भवभूति वरचढ आहे) असा ज्याचा महिमा आजपर्यंत चालत आला आहे, त्या भवभूतीनें आपल्या ' उत्तररामचरितां ' त रामाचें वेड कसें वर्णिलें आहे तें आतां आपण पाहूं. लोकापवादास्तव सीतेचा त्याग केल्या दिवसापासून रामचंद्रासही होणारें प्रियावियोगदुःख अंतर्गूढ असें भासत आहे; ह्मणजे त्याच्या धीरोदात्तत्वांत अंतर पडलें आहे. शंबूकास मारण्यास ह्मणून तो जनस्थानास आला आहे. येथें त्यास पंचवटीदर्शन होऊन पूर्वीच्या वधुसहवाससुखाची आठवण होते व पदोपदीं भ्रम होतो. त्यावर भवभूतीनें एक दोन उपाय योजून आपला कार्यभाग साधून घेतला आहे. ' तिरस्करिणी ' विद्येच्या बलानें सीतेला राम दिसावा, पण रामाला मात्र सीता दिसूं नये असा एक चमत्कारिक योगायोग घडवून आणिला आहे व असें असतांही सीतेच्या स्पर्शानें राम शुद्धीवर येतो. ज्यास ज्याचें वेड लागतें, तें देऊन त्याचें मन ठिकाणावर आणणें हा तर सर्वसाधारण उपाय झाला खरा, पण पुढें भवभूतीनें जो दुसरा उपाय योजिला आहे तो जरा कठोर आहे. तो असाः—

पूरोत्पीडे तडागस्य परीवाहः प्रतिक्रिया ।
शोकक्षोभे च हृदयं प्रलापैरेव धार्यते ॥

" तळें तुडुंब भरलें तर त्यांतून पाट काढिले ह्मणजे तें बेतावर येतें व दुःखानें भडकलेलें मन रडण्यानेंच स्थिरस्थावर होतें. "

या नियमास अनुसरून वनदेवता वासंती ही मुद्दाम रामास कधीं टोंचून तर कधीं सहज सीताचरित्र व सीतात्याग या विषयांवर उलटसुलट सवाल करून त्याच्या दुःखित मनास चाळवून भडकवीत आहे.

यांत तिचा उद्देश हा कीं, रामास मनमुराद चित्तक्षोभ होऊन, तो वाटेवर यावा. हा तिचा सद्धेतु मनांत न उतरल्यामुळेंच कीं काय साध्वी सीता वासंतीसच उलट असें दूषण देते कीं,

' त्वमेव, सखि वासन्ति, दारुणा कठोरा च, या एवं आर्यपुत्रं प्रदीप्तं प्रदीपयसि! '

(ई) लीयर राजाचें वेड.

संस्कृतांतील वेडाचे कांहीं मासले झाले. इंग्रेजींत, नाट्याचार्य शेक्सपीयर यानें आपल्या नामांकित King Lear (लीयर राजा) नाटकांत वेडाचें सुंदर चित्र काढिलें आहे. गॉनरिल व रिगॅन या दोघा मोठ्या मुलींच्या कृतघ्नतेमुळें तापट पण मायाळु असा साठी उलटलेला लीयर राजा यास संताप होऊन, एकाएकीं वेड लागलें आहे. त्या ह्मातार्‍या राजास जळीं, काष्ठीं, पाषाणीं गॉनरिल व रिगॅन या दिसत आहेत. मोठ्या त्वेषानें त्यांचा त्याग करून, तो एका वादळाचे रात्रीं घराबाहेर पडला आहे व त्याचे बरोबर त्याचा इमानी खुशमस्कर्‍या व केंट नामक खरा सरदार हेच कायते त्यास सांवरण्याकरितां येत आहेत. खवळलेल्या समुद्राप्रमाणें, राजा जोर-जोरानें ओरडून असें ह्मणत आहे कीं—

(शिखरिणी.)

" वहा, वायो! वायो, प्रबल दिसुं दे शक्ति सकलां!
पडा धोध्यांनो हो! खचित भिजवा याचि क्षितिला!
अरे अग्ने, तूंही प्रळय उडवी आजि अमुचा!
कशाला ही हावी मजसि तरि ही जीर्णचि त्वचा? "

(हरिणी.)

प्रबळ असुं दे, देवा, सृष्टी! नसे मम ती सुता!
तिज न दिधलीं राज्यें कांहीं, तशी सुखसंपदा!
मजवरि तिचा होवो ऐसा प्रकोप! अतां बरा!
गरिब दुबळा आहें मी हा! करा मम कीं चुरा!

(स्रग्धरा.)

ऐकी हे सृष्टिदेवी! कर, तर, मम त्या त्या सुता आज वंध्या!
त्यांना दे दुःख सारें! जळफळ करुं दे! जीर्ण दे त्यासि कंथा!
त्यांच्या तारुण्यकालीं ढळ ढळ गळुं दे अश्रुच्या पूर्ण गंगा!
जीं जीं पोरें कृतघ्ना छळ छळ करिती, होऊ त्यांचाचि दंगा!"

पुढें केंट हा विश्वासु सरदार लीयर राजास कॉर्डेलियाच्या ह्मणजे त्याच्या धाकट्या व धिक्कार केलेल्या मुलीच्या छावणींत औषधपाण्याकरितां घेऊन जातो. तेव्हां तेथील राजवैद्य लीयर राजास निद्रा येईल, अशी तजवीज करितात. कारण, शेक्सपीयरास हें वैद्यकींतलें तत्व मान्य दिसतें कीं, Our foster-nurse of nature is repose (निद्रा ही आपली स्वाभाविक दायी होय.)

अशा औषधोपचारानें लीयर राजास गाढ झोंप लागल्यावर, त्याचे अंगांत कपडे घालतात. त्यांस जागें करतेवेळीं कॉर्डेलिया हिला जवळ असूं देतात. मंजुळ वाद्यें वाजविण्यास सुरवात करतात. इकडे, कॉर्डेलिया आपल्या इंग्रेजी चालीप्रमाणें आपला बाप जो लीयर राजा त्याचें चुंबन घेऊन असें ह्मणत ह्मणत त्यास उठवूं लागते—

(हरिणी.)

उठ लवकरी माझे ताता! तुला गुण कीं पडो!
कितिक घडली आपत्ती ती! कुणावरि ना पडो!
बहिणि करिती जी ही लेधा, तयांतुनि हा उठो!
कितिक शिणली काया याची!—प्रभो, तरि हा उठो!

हें ऐकून राजा किंचित् जागा होऊन कॉर्डेलियाकडे पहातो. तेव्हां त्यास इतकें आश्चर्य वाटतें कीं, आपण आपल्या कॉर्डेलियाला पाहत आहों कीं तें तिचें भूत आहे कीं आपण तिला घालवून दिलेल्या तिच्या नवऱ्याचे घरीं ह्मणजे फ्रान्स देशांत आहों. इतक्यांत कॉर्डेलिया उठून त्यास नमस्कार करिते व त्याजवळ आशीर्वाद मागते. तेव्हां राजास आपल्या मोठ्या मुली गॉनरिल् व रिगॅन् यांच्या अमानुष वर्तनाची

आठवण होते व त्याबरोबर त्यास त्वेष चढतो. पण आपल्या अंगावर हा पोषाख कोणी घातला, आपण काल रात्रीं कोठें होतों व आज कोठें आहों, याची त्यास भ्रांति पडते. तेवढ्यावरून तो ह्मणतो, ' मला हंसूं नका! मी तरी मनुष्यच आहें! व मला वाटतें ही मुलगी माझी कॉर्डेलिया असावी!' हे आपल्या शुद्धीवर येणाऱ्या बापाचे शब्द कानीं पडतांच, कॉर्डेलियाला रडूं कोसळतें. तें पाहून लीयर राजा ह्मणतो, ' तूं मला विष घेऊन ये. कारण तूं तर माझ्यावर प्रीति करीत नाहींस. तुझ्या वडील बहिणींनीं माझा विनाकारण छळ केला. तुला माझा छळ करण्याला कारण तरी आहे!' हें ऐकून कॉर्डेलिया ह्मणाली, ' तसें कांहीं नाहीं!' नंतर राजवैद्यानें, त्या सुशील कन्येचें शांतवन करून, तिला असें सांगितलें कीं, ' राजाचा राग शांत होत चालला आहे. त्यास गतगोष्टीवरून क्षोभ होण्याचा संभव आहे व तें तर आतां जपलें पाहिजे. त्याचें डोकें आणखी थंड होईपर्यंत, त्यास अधिक चाळविणें हें बरें नव्हे!' राजवैद्याच्या सांगण्याप्रमाणें लीयर राजास एका खोलींत निवांतपणें पडूं दिलें, तसा तो लवकर बरा झाला.

(उ) हॅमलेट राजपुत्राचें वेड.

आपली आई आपल्या दीराशीं लागू असून, आपल्या बापाचा घात करून, त्या दुःखद गोष्टीस एक महिना देखील लोटला नाहीं तोंच, जनलज्जा मनलज्जा यांना धुडकावून देऊन, ' विषयिणः कस्यापदोऽस्तंगताः ' (कोणा विषयलंपट मनुष्याच्या आपत्ती संपल्या आहेत?) या कविवचनाची प्रतीति घेण्याकरतांच कीं काय ती आपल्या जाराशीं राजरोस रीतीनें लग्न लावून घेते व आपण आपल्या द्वितीय पतीसह सिंहासनारूढ होते. ही घरांतील राक्षसी गोष्ट पाहून हॅमलेट या राजपुत्रास अत्यंत खेद होतो. यावरून तो आपल्या मनांत अशी गांठ बांधितो कीं, जग हें मोठें भयंकर आहे. यांत अब्रूनें दिवस काढणें हें काम मोठें कठीण आहे. केव्हां कोण कोणाचा कसा घात करून आपला डाव साधून घेईल याचा नेम नाहीं. इत्यादि नैराश्यवादि तत्व-

ज्ञानानें हॅमलेटचें डोकें इतकें भणभणून गेलें कीं, त्यास हा संसार नकोसा वाटूं लागतो व आपल्या बापाचा सूड उगविल्याखेरीज आपलें जिणें व्यर्थ आहे, ही गोष्ट त्याचे मनांत रात्रंदिवस इतकी घोळते कीं, तशानें त्यास वेड लागतें.

पुढें जेव्हां हॅमलेटच्या प्रत्ययास असें येतें कीं, आपल्या मातेनें जाराच्या नादीं लागून आपल्या बापाचा वध केला व हें घनघोर दुहेरी पातक त्या दोघांचे मनास खात आहे, तेव्हां त्याचें वेड अर्धेअधिक उतरतें व त्याचा इष्ट हेतु साध्य होऊन तो पूर्ण होणार, तोंच त्यास त्याचा शत्रू ठार करितो. असें हें ‘ विकारविलसित ’ आहे!

(ऊ) ऑफेलियेचें वेड :—

सदरहू हॅमलेटनें आपल्या वेडाचे झटक्यांत, ज्या ऑफेलिया नामक सरदारकन्येच्या प्रेमपाशांचा धुव्वा उडविला होता, तिला तिचा बाप ‘ पोलोनियस ’ हा आपल्याबरोबर लग्न करूं देत नाहीं, ह्मणून हॅमलेटनें तिला जोगीण बनून संसारत्याग करण्यास बेलाशक सांगितलें व ज्यानें आपल्या त्या प्रीतिपात्र ऑफेलियास तसा पैतृक अधिकारबलावर प्रतिबंध केला होता, त्या पोलोनियसास त्यानें एकदम यमसदनास पाठविलें. या कारणांनीं, अखंड पुण्याचे फलाप्रमाणें सुंदर अशा त्या ऑफेलियास असें वाटलें कीं,

वैखानसं किमनया व्रतमाप्रदानाद्
व्यापाररोधि मदनस्य निषेवितव्यम्? ।
अत्यन्तमेव सदृशेक्षणवल्लभाभिर्
आहो निवत्स्यति समं हरिणाङ्गनाभिः ॥

(शाकुन्तलम्)

[काय हिनें मदनव्यापारास प्रतिबंध करणारें तपस्विजनाचें व्रत पाळावें? किंवा ज्यांचे डोळे आपल्यासारखे आहेत अशा हरिणी बरोबर निरंतर रहावें?]

व ज्यावर आपलें मन गेलें आहे, त्यानें तर आपल्या प्रिय पित्याचा सूड उगविला आहे. इकडे आड, तिकडे विहीर. असें ऑफेलियाचें कोमल मन द्विधा झालें व त्यामुळें ती कालिदासोक्तीप्रमाणें– 'आसीत्स दोलाचलचित्तवृत्ति' (त्याचें मन हिंदोळ्याप्रमाणें मागेंपुढें असें चलबिचल झालें) ह्मणजे तिला वेड लागलें.

ऑफेलियेचें मन जात्या कोमल, तशांतून तिजवर आलेल्या दोन आपत्ती जबर, यामुळेंच तिला वेड लागलें असें वर आलेंच आहे. तर तिच्या वेडाचें वर्णन करण्यापूर्वीं, तिचें मन कोमल कसें होतें तें आपण पाहूं. मिसेस् जेमिसन या विदुषी स्त्रीनें Characterestics of Women (स्त्रीस्वभावाचीं लक्षणें.) नामक नामांकित इंग्रेजी ग्रंथांतील १९९ वे पृष्ठांत ऑफेलिया किती सुंदर व नाजूक होती याविषयीं मोठ्या बहारीचें वर्णन केलें आहे. खरोखर ती दुर्दैवीच! तिला या जगांतील टक्केटोणपे व धरमधक्के खाण्याकरितांच जन्मास घातल्यानें, विधात्यानें आपलें 'वेदाभ्यासजडत्व' उत्तम प्रगट केलें आहे! नुसत्या कर्णमधुर नव्हे तर मनोहर अशा दुरून येणाऱ्या रात्रीच्या गाण्याच्या आलापाप्रमाणें, धुळींत येऊन पडण्यापूर्वीं हवेंतून निघणाऱ्या हिमतुषाराप्रमाणें, मोठ्या लाटेपासून फुकरेनें उसळणाऱ्या लहान लहरीप्रमाणें ऑफेलिया ही होय. इतकी नाजूक कीं, विडा खाल्ला तर तो कंठांतून दिसावा! इतकी पवित्र कीं, तिच्या दुःखांतील वर्तनाचा जितका विचार करावा तितका थोडाच! तिचें प्रेम ह्मणजे सात पडद्याआड ठेवलेलें माणिकच! तिचा शोक ह्मणजे पाषाणाला पाझरच पाडणारा! अशा युवतीस आपल्या प्रिय हॅमलेटच्या वेडांतील पोलोनियसाचे वधानें एकाएकीं वेड लागणें किती साहजिक आहे. कालिदासानें तर 'पुरंध्रीणां चेतः कुसुमसुकुमारं हीं भवति' (प्रौढ स्त्रीचें मन फुलासारखें कोमल असतें) असें ह्मटलेलें आहे. ह्मणून ऑफेलियासारख्या स्त्रीरत्नास जुई, बकुली किंवा गुलाबकळी कल्पून, शेक्सपीयरनें तिच्या तोंडून आपल्या वेडाविषयीं कोमलोद्गार काढिले आहेत; त्यांत कांहीं वावगें नाहीं. ते असे—

(शिखरिणी.)

अरे अग्ने, तूं ना करि तरि असें मस्तक सुकें!
अहा अश्रूनीं ही कितिक तरि दृष्टी मम झुके!
अहा गेली बुद्धी! खचित विलया आलिच दशा!
जशी साठी नाशी, तशिच वय हें आणिही दशा!

(द्रुतविलंबित.)

फुलत जें असतें, फुल तें दिसे
कितिक सुंदर उज्वल छानसें!
तरुण वस्तु जगीं अति सुंदर
परि दशा मम हीच भयंकर!

एके दिवशीं असें वेडांत गात गात ऑफेलिया एका प्रवाहांत नेमकी पडली. नाकातोंडांत पाणी जाऊन तिचें देहावसान होईपर्यंत, ती आपलें मंजुळ गायन गात होती व अखेर मूर्तिमंत करुणरसाची पुतळी भासून, ती हा लोक सोडून, तो प्रवाह नेईल तिकडे तरंगत गेली!

(ऋ) पॉलचें वेड.

बर्नार्डिन सेंट पायर नामक फ्रेंच कादंबरीकारानें आपल्या ‘पॉल अँड व्हर्जिनिया’ नांवाच्या सुंदर कादंबरींत, बालपणीं बहिणीप्रमाणें वागविलेल्या व तरुणपणीं बायको ह्मणून निश्चित झालेल्या व्हर्जिनिया हिचा दीर्घवियोग व अकालिक मरण यामुळें पॉल याला वेड लागलें आहे असें सांगून त्याच्या त्यावेळच्या मानसिक स्थितीचें वर्णन सदरहू ग्रंथकारानें अत्यंत मोहक रीतीनें केलें आहे. मित्राच्या संगतींत दुःख नाहींसें होत नाहीं तरी तें सोसण्यास किंचित् सोपें जातें. ह्मणून अशा स्थितींत पॉलच्या जवळ त्याच्या आजोबाप्रमाणें शोभणाऱ्या स्नेह्यास ठेविलें आहे. व्हर्जिनियाचे मृत्यूनंतर पाऊण महिन्यानें पॉल यास पाऊल टाकण्याची शक्ति आली आहे. परंतु त्या मानानें त्याचें मन खचत चाललें आहे. त्याला कांहीं कळेनासें झालें आहे. त्याचे डोळे वेड्यासारखे दिसूं लागले आहेत. कोणी त्याशीं बोललें तर तो उत्तर करीनासा झाला आहे. पण व्हर्जि-

निघाचें नांव घेतांच, तो थरथर कांपत असतो व झटकन् दूर पळून बागेंत इकडे तिकडे भटकून, तिनें लाविलेल्या नारळीचे झाडाजवळील झऱ्याकडे पहात स्तब्ध बसत असतो.

यावर तेथील सरकारी वैद्य त्याचे आप्तइष्टांस असा सल्ला देतात कीं, पॉलला जें लागेल तें करूं देत ना. त्याच्या उलट कोणी बोलूं नका. ह्मणजे त्याच्या मनास आलेली भयंकर खिन्नता नाहींशी होऊन, तो निमुटपणें न बसतां बोलूं लागेल.

त्याप्रमाणें त्याच्या स्नेह्यानें त्याचा बेत ठेविला. तसा आठ दिवस पॉल आपल्या बाळपणच्या मैत्रिणीबरोबर जेथें जेथें ह्मणून गेला होता, त्या सर्व ठिकाणीं फिरला. त्याबरोबर त्याचा वृद्ध स्नेही सदां असे. तीं तीं रम्य स्थळें पाहून पॉल यास पूर्वसुख आठवे, व 'व्हर्जिनिया! अगे माझे लाडके व्हर्जिनिया!' असा तो आक्रोश करी!

एकांत स्थळीं मनोविकारांस फारच जोर येतो. ह्मणून त्याच्या वृद्ध मित्रानें त्यास भरवस्तीच्या दूरच्या एका ठिकाणींहि नेऊन पाहिलें. तेथें कांहीं तरी उद्योग काढून त्यानें त्यास स्वस्थ बसूं दिलें नाहीं. पुष्कळ चालण्याच्या नुसत्या शारीरिक श्रमानें मनांतल्या विकारांचा विसर पडावा, पण छे! अतिशय प्रीति असल्यामुळें, कांहीं पदार्थ पाहिला ह्मणजे आवडत्या माणसाची आठवण होते असा साधारण मनुष्यस्वभाव आहे. दिवस, रात्र, एकांतांतील स्तब्धता, भरवस्तीचा कलकलाट किंवा सर्वभक्षक काळ यांपैकीं कोणाच्यानेंही कोमल अंतःकरणांतील प्रीतीचें स्मरण नाहींसें करवत नाहीं. जसा होकायंत्रांतील कांटा कोणीकडे फिरविला तरी पुन्हा तो दक्षिणोत्तरच होतो, तसा आषकाचा ळळा माषुकाकडेसच सदा राहतो.

अखेर त्याच्या स्नेह्यानें पॉलशीं बुद्धिवाद करून त्याचें वेड घालविण्याचा प्रयत्न केला. तो त्यास ह्मणाला, 'मुला, जो तुझा व व्हर्जिनिया हिचा मित्र आहे व जो मनोराज्यांत तुझें अंतःकरण गर्क झालें असतां, पुढें कांहीं अनर्थ झाल्यास सोशितां यावा ह्मणून तुझ्या

अंतःकरणास धैर्य देत होता, त्याचे दोन शब्द ऐकशील तर बरें. तुला इतका मोठा शोक कशाकरितां होतो? तूं मोठा हतभाग्य आहेस हें खरें; कारण, जिनें तुझ्या सुखाकरितां आपलें सुख सोडून दिलें, संपूर्ण ऐश्वर्यसुखापेक्षां जी तुला अधिक मानीत होती व तुझ्याशीं लग्न व्हावें हेंच काय तें आपल्या सद्गुणांचें फळ असें जिला वाटत होतें, अशी सुंदर प्रियकर ललना आज तुझी नाहींशी झाली. ही मोठीच हानि होय. तथापि, ज्या वस्तूस तूं केवळ शुद्धसुखाचें साधन असें मानीत होतास, तीच मोठ्या भयंकर दुःखास कारण कशावरून झाली नसती? ऐश्वर्याचे आशेनें ती फ्रान्सांत जाऊन निराश होऊन पुन्हा या मॉरिशस बेटांत जशीची तशीच परत आली होती. पुढें जें तिजबरोबर तुला सुख भोगावयाचें होतें, तें केवळ तिच्याबरोबर श्रम करण्याशिवाय दुसरें कांहीं नव्हतें. ती आधीच नाजूक, त्यांत फ्रान्सांत तिच्या आतेनें छळल्यामुळें अशक्त झालेली आणि तुझे श्रम कमी करण्याकरितां अधिक मेहनत करती तर दररोज क्षीण होत चालली आहे असें तुला कळलें असतें. तुजपासून तिला मुलें झालीं असतीं तरी मोठी पंचाईत. वडिलांचें आणि मुलांचें पालन करण्याच्या दुहेरी काळजींत तुम्हीं पडला असता. तूं ह्मणशील कीं, सुख होण्यास संपत्ति कशास पाहिजे? स्त्री जितकी जितकी निराश्रित असेल, तितकी तितकी ती आपल्या पतीवर अधिकच प्रीति करिते व अशा प्रियकर मनुष्याचें संरक्षण करण्यापासून आपणांसहि अतिशय सुख होतें. व दोघेहि दुःखी असल्यामुळें एकमेकांस अधिकच आवडलों असतों; तारुण्यामुळें एकमेकांस धैर्य देण्यास अधिकच समर्थ झालों असतों. गोष्ट खरी आहे. स्त्रीपुरुष सद्गुणी असून एकमेकांवर परमप्रीति करणारीं असलीं, ह्मणजे कोणतेंही दुःख प्राप्त झालें तरी त्यांस एकमेकांपासून सुख होत असतेंच. परंतु व्हर्जिनिया तर आतां नाहींच. तुझ्या खालोखाल ज्यांवर तिची प्रीति असे तीं माणसें ह्मणजे तिची व तुझी आई ह्या उरल्या आहेत. त्या तुझ्या अनिवार्य दुःखानें मृत्युपंथास लागल्या आहेत. त्यांस सुख देणें यांतच ती सुख मानीत

असे असें तूंच मान. तुला इतकें व्हर्जिनियाविषयीं कां वाईट वाटतें? ती अजून आहे. तुला खचित सांगतों कीं, सद्गुणाचें फळ जेथें प्राप्त होतें, असें स्थळ आहे. तिचें गलबत बुडतेवेळीं जसा तिनें तुला सलाम केला, तसें स्वर्गांतून तिला बोलतां येतें तर ती ह्मणाली असती, 'पॉल, अरे, आयुष्य हें क्षणभंगुर आहे. एवढ्यांतच ईश्वर आपली परीक्षा पाहतो. मी सृष्टिनियमाप्रमाणें प्रीतीनें व सद्गुणानें वागलें; आपलें कर्तव्यकर्म योग्यरीतीनें बजावलें असें पाहून, स्वतः दुःख भोगणें अथवा दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी होणें या सर्व यातनेपासून सोडवून, मला ईश्वरानें येथें आणिलें. आतां, मला मानवी दुःखाचा वारासुद्धां लागणार नाहीं. असें असून तूं मजकरतां हळहळतोस! मी आतां पवित्र, अक्षय, ज्ञानप्रकाशित झालें आणि तूं मला संसारांधकारांतून हाका मारितोस! प्रिय मित्रा, हें पहा, सकाळच्या प्रहरीं उठून आनंददायक सृष्टीचे चमत्कार पाहून आपणास किती मौज वाटत असे! उन्हें पडलेलीं पर्वताचीं शिखरें व रानांतून डोकावणारें सूर्यकिरण पाहून आपणास किती संतोष होत असे! प्रातःकाळचें चकचकित ऊन, वनस्पतींचे सुवास व पक्ष्यांचे गुंजारव यांनीं आपण किती रममाण होत असूं! भूलोकीं आनंददायक सौंदर्याचा उपभोग अशक्त इंद्रियांच्या योगानें आपण घेत असूं. मी आतां अंतर्ज्ञानी होऊन या सौंदर्याच्या मूळस्थानापासून, शब्दस्पर्शरूपरसगंधांचें सुख अनुभवित आहे. ज्या अक्षय, अनंत, आनंदमय, समुद्राच्या तीरीं मी आहें, तेथील सुख शब्दांनीं काय वर्णावें? समानशील, समानसुखी, अशा असंख्य प्राण्यांच्या मित्रत्वापासून जें सुख होतें, तें मला येथें प्राप्त होत आहे. फार काय! पण अमानुषऔदार्ययुक्त अनंतशक्ति परमेश्वर जेथें दाता आहे तेथें कोणत्या गोष्टीची उणीव असणार आहे? येथें आह्मीं शुद्ध सुख भोगितों. याकरतां तूंहि या परीक्षेच्या वेळीं धैर्यानें वागून अशा सुखास योग्य आहेस, असें परमेश्वरास दाखीव ह्मणजे आपला जोडा निरंतर राहील. मग आपली प्रीति अक्षय्य होईल. मग तुझी व्हर्जिनिया हिचें सुख अतिशयित वृद्धिंगत होईल. आणि आपण

विवाहोत्सवाच्या आनंदांत सतत निमग्न असूं. येथें मी तुझे डोळे पुसून सांत्वन करीन. हे प्राणनाथा, अक्षय्य सुखाकडे लक्ष दे; आणि क्षणिक दुःख धैर्यानें सहन कर!'

हें बोलणें संपेपर्यंत पॉल एकसारखा आपल्या मित्राकडे पहात होता. तो ह्मणाला, 'ती आतां नाहीं! ती आतां नाहीं!' असें बोलून मूर्च्छित होऊन मोठ्यानें बराच वेळ शोक करीत होता. मग शुद्धीवर आल्यानंतर तो ह्मणाला, 'ज्या अर्थी मृत्यु चांगला आहे आणि व्हर्जिनिया सुखी आहे तर मीहि मरेन आणि तिला जाऊन भेटेन.'

याप्रमाणें, पॉल याला सांत्वन करण्याचा त्याच्या वृद्ध स्नेहाचा हेतु फुकट गेला व पुढें व्हर्जिनियाच्या मरणापासून तीन महिन्याचें आंत, पॉल याचा त्या वेडांतच अंत झाला. एखादा पूरांत वहात चालला असतां त्यास त्याच्या मित्रानें जरी साहाय्य दिलें, तरी ज्याचे त्यानें थोडेबहुत हातपाय हालविले पाहिजेत, तर कांहीं त्यास साहाय्य करणाराचे श्रमाचें चीज होतें. पॉलचें अंतःकरण दुःखानें ग्रासून टाकिलें होतें. लहानपणीं हाल झालेले असले ह्मणजे मोठेपणीं मनुष्य संसारांतील दुःखें सहज सोशितो. परंतु पॉल यास पूर्वीं दुःख कसें असतें, याची बहुतेक ओळख नव्हती. ह्मणून त्याच्या वृद्ध मित्राच्या उपदेशाप्रमाणें त्यास आपल्या कोंवळ्या अंतःकरणास धीर देववेना, आपल्या दुःखाचा पाय मागें सारवेन आलेल्या भोगास सादर होतां येईना व आपला अमोल जीव वांचवितां येईना!

(ऋ) एका सुराभक्ताचें वेड.

येथपर्यंत जीं वेडाचीं उदाहरणें दिलीं, तीं बहुतेक मनुष्यस्वभावास धरून ग्रंथकारांनीं आपल्या कल्पनालाघवावर उभारलेलीं आहेत. आतां यापुढें जीं दोन उदाहरणें मी देणार आहे, ती माझ्या मित्रांच्या ऐकिवांतलीं किंवा अनुभवाचीं आहेत.

प्रस्तुत उदाहरण एका तरुण गृहस्थाचें आहे. त्यास सुरापानाचा जबरदस्त नाद होता. सुरेचा मेंदूवर काय परिणाम होतो हें प्रत्येकास

माहीत आहेच. तिनें तितक्यापुरतें माणसास वेड लागतें. मग जो तिची रोज उपासना करतो, त्यावर ती शाक्तदेवता प्रसन्न होऊन त्यास निरंतर वेडें करून सोडते. त्याचा मेंदू व ज्ञानतंतू फुकट जातात, व तो मनुष्यकोटींतून खालच्या वर्गांत जाण्यालायक होतो. सदरहू गृहस्थाचें वेड कशामुळें त्यास लागलें आहे, हें डॉक्टरास समजतांच त्यानें तें बीज समूळ काढून टाकिलें तसा, चार महिन्यांत रोगी बरा झाला व आपल्या कामावर रुजू झाला.

(ऌ) एका गर्भाशयविकृत तरुणीचें वेड.

माझे स्नेही डॉक्टर लखानी एम्. डी. यांनीं आपण बरी केलेल्या एका तरुणीची हकीकत अशी सांगितली. सदरहू मुलगी पंधरा सोळा वर्षांची होती. तिला एकाएकीं वेड लागलें. तिच्या सासरच्या माणसांनीं मुंबईंत एक महिनापर्यंत सर्व तऱ्हेचे जुने उपचार करून पाहिले. पुढें तिच्या समजूतदार वडिलांनीं तिला आपल्या देखरेखीखालीं चार महिने ठेविली. पहिले तीन महिनेपर्यंत, ती मुलगी आपल्या आईबहिणीच्या संगतींत एका खोलींत असे व रोज डॉक्टरास तिची शारीरिक विकृति तपासून औषधयोजना करावी लागत असे. तिसरा महिना सरल्यावर, सदरहू मुलीस आपलें शरीर डॉक्टरास उघडें करून दाखविण्याची लाज वाटूं लागली. तेव्हां डॉक्टरासही धीर आला कीं, आतां दुखणें हातांत आलें. त्याप्रमाणें, दिवसेंदिवस तिची तिला शुद्धि येत जाऊन, चवथे महिन्यानंतर ती मनुष्यांत आली.

(ॡ) राली ब्रदर्स कंपनीमधील एका मोठ्या कारकुनाचें वेड.

माझे व्यवसायबंधु रा. माधव नारायण धामणकर यांनीं या गृहस्थाची हकीकत मला सांगितली. सदरहू गृहस्थ तीस वर्षांचे उमरीचे असतां, त्यांस एकाएकीं वेड लागलें. त्यांस जुने सर्व उपचार करून पाहिले व एक वर्षपर्यंत त्यांस खोड्यांत घालून रोज एवढ्याशा पेजेवर दिवस काढावे लागले. त्यांचें वेड इतकें बेसुमार होतें कीं, जर चुकून ते सुटून बाहेर पडले, तर भेटतील त्याचे डोईंत धोंडा घालण्यास चुक-

णार नाहींत. अशापैकीं ती मूर्ति होती. पण पुढें तीच एका साध्या उपायानें ठिकाणावर आली. एकसारखे शंभर घडे पाणी रोज त्यांस बांधून त्यांचे डोक्यावर घालण्याचा क्रम चालू ठेविला. तेव्हां डोक्यांतील कडकी डोळ्यावाटें व नाकावाटें उतरून सहा महिन्यांत ते बरे झाले.

(ए) रा. रा. विष्णु सखाराम टुल्लू, या वयोवृद्ध संभावित आप्त गृहस्थानीं आपल्या अनुभवांतील अशी एक गोष्ट सांगितली आहे कीं, सुमारें ९० वर्षें झालीं मुंबईंत एका विशींतल्या तरुणीस उन्मादवायु झाला होता. तेव्हां कोणा वैद्यानें तिच्या पतीस असें सुचविलें कीं, स्त्रीची कामवासना प्रबल असल्यास ती पुरुषानें पूर्ण केली ह्मणजे स्त्रीच्या मस्तकापर्यंत भडकलेला वायु खाडदिशीं ठिकाणावर येऊन, ती ताळ्यावर येते. त्याप्रमाणें नवऱ्यानें इलाज करून पाहतांच, बायको पंधरा दिवसांत बरी झाली.

(ऐ) सदरहू गृहस्थांच्याच अनुभवांतली आणखी एक गोष्ट ऐकावयास सांपडली आहे ती अशी कीं, सुमारें २९ वर्षांपूर्वीं, नाशिकच्या एका ओळखीच्या जहागिरदाराची मुलगी वयांत आली होती व त्याच समयास तिच्या नवऱ्यास संन्यास घेण्याची बुद्धि होऊन तो फरारी झाला. तेव्हां त्या मुलीस उन्माद झाला, त्यावर कोणाची अक्कल चालेना. ह्मणून तिच्या बापानें तिला मुंबईंतील इस्पितळांत नेली. तेव्हां तेथील मोठ्या डॉक्टरानें एक चमत्कारिक उपाय त्यास सुचविला. तो ह्मणाला ‘ हिला पुरुष द्या! ’ तिच्या बापाच्या तें जिवावर आलें. पण करतो काय? आतां तसें न केलें तर मुलगी वेडीच्या वेडीच राहणार, वेळेनुसार मरणारही; बरें तसें केलें तर आपली अब्रू व धर्म बुडणार! ‘ इकडे आड तिकडे विहीर ’ असें त्यास झालें. तो बापडा मोठ्या पेंचांत सांपडला. अखेर, पितृभर्तृवधांबद्दल संभाजीचा सूड उगविण्याचे वेडानें माथें भणभणून गेलेली आपली तरुण प्रियभगिनी, तुळशी, हिला एसाजी फर्जंद यानें संभाजीशीं जारकर्म करीत राहून

आपलें डोकें ताळ्यावर आणण्याचा सल्ला इतिहासांतरीं दिलेला आठवून त्यानें त्या डॉक्टरास रुकार दिला व ती मुलगी त्याचे हवालीं करून त्यास कष्टानें ह्मटलें कीं, 'आतां, हिचें हवें तें करा. ही मुलगी माझी नाहीं; तर आपली मुलगी आहे. असें समजा व हिला शुद्धीवर आणा ह्मणजे झालें!' नंतर त्या डॉक्टरानें लागोपाठ तीन दिवस तिला पुरुष दिला. तशी चौथे दिवशीं तिची तिलाच शुद्धि आली. ही गोष्ट ऐकून, तिच्या बापास जसें बरें वाटलें तसें वाईटही वाटलें. ती भ्रष्ट झालेली आहे असें जाणून त्यानें तिला सांगून पाठविलें कीं, 'तूं मुंबईतच रहा. हवी तशी वाग; पण प्रकृति संभाळ. मी आपला तुला तुझा पोटखर्च दरमहा नाशिकाहून धाडीत जाईन.' त्यास ती कबूल होऊन आज पंचवीस तीस वर्षें मुंबईंत होती. गेल्या सात वर्षांपूर्वीं वरील आप्त गृहस्थांस ती ठाकुरद्वारीं भिक्षा मागत बसलेली दृष्टीस पडली होती. तेव्हां त्यांनीं तिची विचारपूस केली. त्यावरून असें समजलें कीं, तिच्या बापाप्रमाणें तिचे भाऊ वेळच्या वेळीं तिचा समाचार नीट घेत नाहींत; त्यामुळें त्या बिचारीला तशी भिक्षावृत्ति पतकरावी लागत होती!

(ए) पोर्ट ट्रस्टमधील एका कॅशियराचें वेड.

हे कॅशियर माझ्या पूर्ण परिचयांतले होते. यांचा स्वभाव जितका तापट तितका मायाळू होता. यांची बायकोवर जितकी करडी नजर होती तितकी तिच्यावर मायाहीपण असे. यांस संतान झालें होतें पण तें जगलें नाहीं. संतति होऊन ती आपल्या देखत सुखासमाधानानें नांदत आहे असें पाहून मनुष्याची चित्तवृत्ति शांत होते. पण सदरहू सद्गृहस्थास संततीचें सुख नसल्यामुळें, त्याचा मनोविकार, विशेषतःक्रोध, अधिक वाढत चालला. व Anger is brief madness (राग हें लहानसें वेड होय) या ह्मणीप्रमाणें त्यांचा आपल्या पत्नीशीं बेबनाव होत चालला. अखेर एके दिवशीं ते आफिसांतून पेन्शनचे दिवस भरत आले ह्मणून आपल्या गांवीं जाण्यास अत्युत्सुक होऊन, एक रजेचा

अर्ज खरडून जे निघाले, ते थेट तरी-बंदरावर येऊन दाखल झाले. कर्मधर्मसंयोगानें इतकें बरें झालें कीं, त्याबरोबर त्यांचा जिवलग भाचा होता. त्यानें त्यास आपल्या गांवीं पोंचविण्याची तजवीज केली. पण ही गोष्ट घरीं त्यांचे कुटुंबास कळविण्यास सवड झाली नाहीं.

आपल्या गांवीं पोंचल्यावर ह्या उन्मत्त झालेल्या गृहस्थास गांवच्या हवापाण्यानें बरें वाटूं लागलें. पण कुटुंबास ही खबर लागतांच त्या बाईचा असा गैरसमज झाला कीं, आपल्या यजमानास जें भाच्यानें घरीं पळवून नेलें, तें केवळ त्यांनीं आपल्या नांवें सर्व इस्टेटीचें मृत्युपत्र करून द्यावें ह्मणून. या दुष्ट कल्पनेनें तिला इतकें घेरलें कीं, ती जी मुंबईहून एकदम निघाली तीं थेट त्या गांवीं आली व आपल्या पतीस जुलमानें घेऊन परत मुंबईस गेली!

हा प्रकार घडून आल्यावर, त्या बिचाऱ्या गृहस्थाच्या वेडानें माघार घेतली व त्यांतच त्याचा लवकर अंत झाला!

(ऐ) एका तरुण चण्डिकेचें वेड.

खाण तशी माती, अशी आपल्यांत एक ह्मण आहे. हींत असें सुचविलें आहे कीं, आईबाप व इतर वाडवडील यांचा स्वभाव त्यांचे मुलांत उतरतो. सदरहू बालेच्या आजोळच्या घराण्यांत एका मावशीस व एका मामास वेड लागलेलें होतें; व तिच्या तिघी वडील बहिणींप्रमाणें तिचा स्वभावही कांहींसा तापट आहे. तेव्हां मूळचें तप्त रक्त हें एक कारण झालें. दुसरें कारण ह्मणजे गृहकलह. तिसरें असें कीं, तिच्या पतीस एक दोन महिन्याच्या भयंकर हिंवतापानें विषाद (Hypochondriasis) हा विकार झाला होता. तो घालविण्याकरितां, डॉक्टरांच्या सांगण्यावरून त्यानें हवा पालटण्याकरितां क्षेत्रराजाचा रस्ता धरला होता व बरोबर आपल्या कुटुंबासही नेलें होतें. वाटेंतील ठिकठिकाणच्या सुंदर ऐतिहासिक स्थलांस चालत जाऊन येण्याच्या श्रमांचें भान त्या तरुण दंपत्यापैकीं कोणाच्याही लक्षांत आलें नाहीं. पण त्याचा परिणाम त्या तरुण मुलीवर असा झाला कीं,

त्यामुळें तिला रक्तशोष (Anaemia) झाला; त्या रक्तशोषामुळें तिला आठ दहा दिवस निद्राभाव (Insomnia), मलावरोध (Constipation), इत्यादि विकार जडले; व त्या सर्वांचें पर्यवसान अपतंत्रकां (Hysteria) त झालें. अपतंत्रकाचे झटके पहिल्या आठ दहा दिवसपर्यंत अति अनिवार असत. रोग्यास कितीही कसलेंही व कोणीही औषधपाणी केलेलें खपेना. झटका निघून गेल्यावर मग तो कोणा मर्जींतल्या माणसाजवळ शुद्धीवर येऊन बोलत बसे.

तिचा झटका चोवीस तासांतून दुपारीं किंवा रात्रीं येत असे. तो चार पांच तास रहात असे. त्यांत ती बहुतेक गाणीं ह्मणत असे. तीं इतकीं स्पष्ट व रसपूर्ण असत कीं, ऐकणाराचे मनांत तो तो रस वठल्या शिवाय रहात नसे. तिला तीं पदें सर्व येत नव्हतीं किंवा येत असल्यास आठवत नव्हतीं असें तिच्या वेंच्यांवरून वाटे. त्यापैकीं कांहीं ठराविक येणेंप्रमाणें :—

(१) नाटक झालें जन्माचें या! कुणि इकडे पाहिना!
अजुनि कसा हा नाद खुळा हो त्यासि सोडिना?
(२) प्रभो, दैन्य तें हरा! सांभ शंकरा! प्रभो, दैन्य तें हरा!
(३) पतिसुख नलगे काय? स्त्रियांसी पतिसुख नलगे काय?
(४) सुमनानें वेणी बरी! सुमनानें वेणी बरी!
(५) नाथा बहुत छळियलें! म्यां बहुत छळियलें!
(६) जा, जा, जा, जा साजणी! झाली हिची धुळधाणी!
जा, जा, जा.

यांवरून व पुढें तिच्याच सांगण्यावरून तिच्या उन्मादाची उपपत्ति बरोबर कळते. तदनुरूप, जुने व नवे बारीकसारीक उपचार तिला न मानवल्यामुळें तिला हवा पालटण्याकरितां एकएकांत शांत पवित्र क्षेत्रीं नेऊन एक महिना दीड महिना ठेविलें. तसें तिचा तप्त मेंदू दिवसेंदिवस थंडावत चालला. त्यांतील कडकी डोळ्यावाटे बाहेर येऊं लागली. पोटांत थोडथोडें दुधासारखें हलकें अन्न ठरूं लागलें. झोंप येऊं लागली.

कळानें घेतल्यास ती नीट बोलूं बसूं लागली व आपलें नेहमींचें घरांतलें काम आपल्या हातानें करूं लागली.

अगदीं ताजें उदाहरण परवां येथील इंग्रेजी शाळेंत द्दष्टीस पडलें. सहाव्या इयत्तेंतील १६ वर्षांच्या तरुण व अशक्त विद्यार्थ्यास नुकतें एक महिन्यापासून वेड लागलें आहे. त्याची हकीकत खरोखर चमत्कारिक आहे. सदरहू विद्यार्थ्याचा वडील भाऊ दक्षिणआफ्रिकेंत उद्योगधंद्या-करितां गेलेला होता. त्याचा धंदा बरा चालत असे. तो एकाएकीं वारल्याची कुणकुण त्याचे इकडील कुटुंबास उडत उडत कळली असल्यामुळें, त्या घरांतील प्रत्येक जाणत्या इसमास धक्का बसल्यासारखें झालें आहे. याचा परिणाम वरील उमेद्‌वार पण अशक्त अशा मुलावर बराच झालेला असावा. तशांत दुसरी गोष्ट अशी कीं, हा मुलगा सहाव्या इयत्तेंत असून याचा दोन वर्षांहून वडील भाऊ खालीं चवथ्या इयत्तेंत रखडत आहे. ही गोष्ट पाहून घरांतील वडील माणसें सहजच या धाकट्या भावाचें कौतुक करीत असत; पण त्यामुळें त्यास जितकें उत्तेजन यावें त्यापेक्षां त्यास अधिक गर्वच चढत चालला होता; असें त्याचे मागें राहिलेल्या वर्गबंधूंशीं झालेल्या भाषणांवरून व्यक्त होतें. ज्या शिक्षकांच्या हाताखालीं तो आज सारखा दोन वर्षें होता, ते ह्मणतात कीं, ‘ माझ्या वरचेवर असे पाहण्यांत येत असें कीं, याच्या मेंदूंत कांहीं तरी फरक झालेला असावा. जरी हा मेहनती मुलगा असे, तरी हा मधून मधून जीं हेकेखोरपणाचीं व हट्टीपणाचीं उत्तरें देई, त्यामुळें यांस बेमालूमपणें वेड लागत आहे ! ’ त्याच्या वर्गावरील मास्तर ह्मणतात कीं, ‘ याचें वेड आनुवंशिक असावें. याचें कारण ते असें सांगतात कीं, एकदा यानें आपल्या वडिलाजवळ असे गाऱ्हाणें केलें कीं, वर्गावरील मास्तर माझ्याशीं बोलत नाहींत. हें त्या गृहस्थानें मनावर घेऊन, मजकडे ती तक्रार आणली. त्यावर मी त्यांस उत्तर दिलें कीं, मी कोणाच मुलाजवळ बोलत नसतों. तशी ती स्वारी निरुत्तर होऊन आल्या वाटेनें निघून गेली ! ’ असो. हेड्मास्तरनीं त्या मुलास मुलांच्या

चेष्टांनीं चेव येऊं नये ह्मणून शाळेंत न येऊं देण्याविषयीं त्याचे घरांतील माणसांस सूचना केली व त्यानें तूर्त अभ्यास बंद ठेवून आपल्या बेताल डोक्यास आराम द्यावा असें कळविलें. घरची मंडळी त्यास वैद्याचा उपचार करीत असतात. त्यास कफक्षयाची भावना असून त्यास जो कफ पडतो त्यास अत्यंत दुर्गंधी येते; यावरून वैद्यराजाची अशी समजूत झालेली दिसते कीं, या मुलाचा नासलेला मेंदू कफावाटे बाहेर पडत आहे. यासंबंधीं जो उपाय मी स्वतः अजमावून पाहिला आहे तो मी त्याचे [खालीं राहिलेल्या] वडील भावास कळविला आहे. हेडमास्तरांनीं शाळा सोडण्यास त्यास जें कारण दर्शविलें आहे, तेंच कारण लढवून—घरचींदारचीं माणसें त्याजवळ जमून विचारपूस करून त्यास सतावतील ह्मणून—त्यास स्थलांतर व हवापालट कराल तर बरें; तसेंच त्याचा अभ्यास बंद ठेवणें जरी बरोबर आहे, तरी हलकेंसलकें मनोरंजनार्थ वाचणें किंवा ऐकणें वाईट नाहीं; कारण मानसिक व्यापारास एकदम कोणतेंच वळण देणें कठीण जातें. कलाकलानें घेतलें तर बरीक सर्व ठीक जमतें. अशी या दुर्दैवी विद्यार्थ्याचे वेडाची थोडक्यांत, हकीकत आहे.

(८) वेड ही सबब सांगतां येते काय? हा व यापुढील दोन प्रश्न हे कायद्याचे आहेत असें पूर्वीं आलेंच आहे. कायद्याचें धोरण ह्मटलें ह्मणजे समाजाचे व त्यांतील व्यक्तिमात्रांचे हक्क काय आहेत ते ठरवून त्यांचें संरक्षण करणें व त्यांचें उल्लंघन करणाऱ्यास शासन करणें हें सुज्ञ वाचकांस माहीत आहेच. प्रोफेसर सेजविक् या आधुनिक महान् नीतिकाराचें असें मत आहे कीं, वेड्यांची अक्कल ठिकाणावर नसल्यामुळें त्यांनीं केलेल्या अपकृतींबद्दल त्यांस कोणी दोष देऊं नये व शिक्षाही करूं नये व ह्मणून प्रोफेसर हॉलंडसारख्या विद्वानांनीं आपल्या धर्मशास्त्रां (Jurisprudence)त वेड्यास 'असाधारण मनुष्य' (Abnormal person) या कोटींत ओढिलें आहे. (आवृत्ति ७ वी, पृ. १२३ पहा). मन्वादि स्मृतिकारांनीं तर वेड्यास संन्याशा-

प्रमाणें व्यवहारदृष्ट्या ' मृतवत् ' मानिलें आहे. तद्वत् हिंदीदंडनीतीचे पुरस्कर्ते लॉर्ड मेकाले यांचेंही असेंच ह्मणणें आहे कीं, जसें एखाद्या अज्ञ बालकानें किंवा दारू पाजलेल्या इसमानें निशेंत केलेलें कृत्य गुन्हा होत नाहीं, तसें वेड्यानें आपल्या वेडाचे भरांत केलेलें कृत्य गुन्हा होत नाहीं [८२–८६ कलमें पहा]; व तत्संबंधीं इन्साफ आरोपी शुद्धीवर येई-पर्यंत तहकूब राहतो असें फौजदारी कामाचे कायद्यांत सांगितलें आहे [४६४–४७५ कलमें पहा]. पण तसें कृत्य कोणाच्या चिथावणी-वरून घडलें असेल, तर तो चिथावणी देणारा मात्र गुन्हेगार होतो [हिं. दं. नी. १०८ कलम पहा].

जशी फौजदारी बाबतींत वेड्यास मुभा आहे, तशी त्यास दिवाणी बाबतींतही आहे असें दिसतें. हिंदी कराराचे कायद्यांत, वेड्यानें शुद्धी-वर नसतांना केलेले करार रद्द होत, असें ह्मटलें आहे [क. १२ पहा]. तरी सदरहू करार करणारा शुद्धीवर आहे असें कोर्ट धरून चालतें व त्या इसमास करार करतेवेळीं आपण शुद्धीवर नव्हतों असें कोर्टाच्या नजरेस आणणें झाल्यास त्यानें तसें सिद्ध केलें पाहिजे, [हिंदी पुराव्याचा कायदा क० १०१ पहा]. ह्मणजे मग कबुलायत कोर्ट रद्द करील व तीवरून दुसऱ्यानें पहिल्याजवळून [वेड्याजवळून] कांहीं घेतलें असेल, तर तें त्यांकडून कोर्ट त्यास देववील किंवा तें तसें देववितां येत नसेल तर त्याबद्दल मोबदला देववील व ज्याअर्थी ' हनुमंत वि० जयराव या मुकद्दम्यांत मुंबई हायकोर्टानें अज्ञानास आपला करार मोडण्याची मुभा दिली आहे, त्याअर्थी निशेंत किंवा वेडांत केलेला करार मोडण्याची मुभा त्या त्या इसमास असावी व निशेबाजास इंग्लंदांत तशी मोकळीक आहे [कूक वि० क्लेवर्थ पहा].

वेड्यास किंवा त्याचे कुटुंबास त्याचे वेडांत त्याचे ऐपतीप्रमाणें कोणी पोशिलें किंवा त्यास कोणी औषधपाणी केलें तर त्या इसमा-(Negotiorum Gestor)स त्या वेड्याचे जिनगींतून त्याबद्दल झालेला खर्च घेतां येतो. याचा अर्थ असा दिसतो कीं, या बाबतींत मात्र त्यानें कांहीं

एक चकार शब्द काढिलेला नसला, तरी सदरहू व्यवहार ह्मणजे सशास्त्र करार केलेला आहे असें धरिलें जातें (हिंदी कराराचा कायदा, ६८ क. पहा.). वेड्यास कपटानें, धमकी दाखवून, ओली थाप मारून, किंवा अशाच एखाद्या गैरशिस्त रीतीनें, एखादी कबुलायत करावयास कोणी लाविली तर ती जिवलग स्नेही किंवा तात्पुरता पालक (Next Friend or Guardian *ad litem*) याच्यामार्फत रद्द करवितां येते. (दिवाणी कामाचा कायदा, क. ४४०–४६३.)

(९) नववा प्रश्न असा आहे कीं, वेड लागल्यावर वारसा सांगतां येतो काय? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, ज्यास व्यवहार करण्यापुरती अक्कल नसते त्याचे हातीं मृताची जिनगी देऊन तिचे पायीं त्यास खाड्यांत घालण्याची युक्ति कोणाही समंजस मनुष्यास रुचणार नाहीं. मग आपल्या दूरदर्शी शास्त्रकारांची तर गोष्ट कशाला पाहिजे? याज्ञवल्क्यानें आपल्या स्मृतींत असें ह्मटलें आहे कीं,

क्लीबोऽथ पतितस्तज्जः पंगुरुन्मत्तको जडः ।
अंधोऽचिकित्सरोगाद्या भर्तव्याः स्युर्निरंशकाः ॥

" नपुंसक, धर्मभ्रष्ट, त्याचा पुत्र, पांगळा, वेड लागलेला, जडबुद्धि, अंधळा, असाध्य रोगी यांना मुळींच वारसा नसतो. ते अन्नवस्त्राचे अधिकारी असतात. "

रोमन धर्मशास्त्राप्रमाणें अविवाहित व निपुत्रिक यांची जिनगी जप्त होत असे; पण वेड्यास जिनगीवर वारसा व स्वामित्व सांगतां येत असे; पण त्या जिनगीची व्यवस्था किंवा तत्संबंधीं कायदेशीर व्यवहार पाहणारा राजा [Parens patria] असे. तो आपल्या वतीनें कोणास तरी तिचा पालक [Curatorœ] नेमीत असे. इंग्लंदमध्यें दुसऱ्या एडवर्ड राजाचे कारकीर्दीत असा एक कायदा झाला कीं, जे जन्मतःच वेडे असतात त्यांची रखवालीच केवळ राजाकडे नसे, तर त्यांच्या हयातींत त्यांच्या जिनगीचें उत्पन्नही राजा खात असे; पण ज्यांना पुढें वेड लागलें असेल त्यांच्या जिनगीची देखरेख मात्र राजाकडे असे.

ह्मणजे तो तिचा पंच असे; पण राजाच्या हक्कास फांटा देण्याकरितां कोणीही इसम जन्मतः वेडा आहे असें सध्यां ठरवीत नाहींत, असें फिलिप साहेबांनीं आपल्या ‘ वेड ’ [Lunacy] या ग्रंथांतील २२४ पृष्ठांत सुचविलें आहे.

या तत्वास अनुसरून माजिस्ट्रेटानें स्थानिक सरकारचे संमतीनें पाठवून दिलेल्या अनाथ वेड्या प्रजेचें पालनपोषण सध्यांचे दयाळु इंग्रज सरकार करीत आहेत. मात्र त्यांनीं धर्माकडे लक्ष्य देऊन, त्या त्या धर्माचे स्वयंपाक सिद्ध करणारे आचारी वेड्यांच्या शाळेंत ठेवावेत. त्यांस सरसकट एका विधर्मी आचाऱ्याचे हातचें खाऊं घालूं नये. कारण, सध्यांच्या सबगोलंकार पद्धतीनें पुढेंमागें समाजांत फिरून शिरूं पाहणाऱ्या त्या बिचाऱ्या व्यक्तीवर बहिष्काराची घोरपड किंवा प्रायश्चित्ताची मोठी खर्चाची बाब येऊन पडते. तर वेड्यांचे शाळेंत सधर्मी स्वयंपाकी ठेवावेत अशी लेखकाची आमच्या सुशिक्षित सरकारास सविनय विनंति आहे. तसेंच ग्रँट रोडवरील बहिरे, मुके, आंधळे यांच्या शाळेसंबंधींही अशीच तक्रार डॉ० लखानी एम्. डी. यासारख्या विद्वान् स्नेह्यांचे तोंडून मी ऐकिली आहे; तर तीहि अडचण दूर करून दुर्बल रयतेच्या धर्मास बाध न येईल अशी पूर्वापार सरकारची राजनीति तेथें पण प्रगट व्हावी. अशी माझी अल्प सूचना आहे.

[१०] दहावा व बहुधा अखेरचा प्रश्न ह्मटला ह्मणजे वेड गेल्यावर वारसा सांगतां येतो काय! हा होय. वेड गेल्यावर वारसा सांगतां येत नाहीं. कारण, एकदां दुसऱ्याचे हातांत जिनगीचें स्वामित्व गेलें ह्मणजे तो तिचा पूर्ण मालक होतो. मग पाठीमागून त्या वेड्याचें वेड बरें झालें, तरी त्या मालकास आपली मालकी त्याकडे जाण्याची धास्ती नसते. यावर मेनसाहेब आपल्या लोकमान्य ‘ हिंदुधर्मशास्त्रां ’त असें सुचवितात कीं, ज्याप्रमाणें मुलगा मांडीवर घेणाऱ्यास, दत्तविधानानंतर औरस पुत्र झाला तर तो औरस दत्तकास हटवितो; तद्वत् वेड्याचें वेड गेल्यावर त्याला आपली जिनगी परत घेतां आली पाहिजे. पण ही विचारसरणी

चुकीची आहे व सदरहू दोन गोष्टींतील साम्य किंवा अतिदेशवाक्यता अयोग्य आहे असें ह्मणतात.

(११) अकरावा प्रश्न असा आहे कीं, आपला धर्म वेडास प्रतिबंधक असा आहे काय? हिंदुधर्माचीं जीं अनेक विशिष्ट लक्षणें आहेत व ज्यामुळें तो आज हजारों शतकांतील परचक्रांच्या तडाख्यांतून वांचला आहे त्यांपैकींच 'वेडास प्रतिबंधक' असें एक अद्भुत लक्षण आहे. गेल्या वीस सप्टेंबरच्या 'अमृतबजार पत्रिकें' त एका लंदनच्या बातमीदारानें असें लिहिलें आहे कीं, 'हिंदू लोकांना वेड कां लागत नाहीं? असा विलायतेंतील एका विख्यात साप्ताहिकांत त्रोटक लेख आला आहे. दोन्ही देशांची तुलना केली असतां, विलायतेपेक्षां हिंदुस्थानांत वेड्यांच्या शाळा फार थोड्या आहेत. या गोष्टीची फोड निरनिराळ्या तऱ्हेनें केलेली दिसून येते. ज्या उष्णतेमुळें व भिकार अन्नामुळें पाश्चात्य देशांत वेड लागतें, तशा उष्णतेंत व तशा भिकार अन्नावर राहूनहि हिंदू लोकांना बहुधा वेड लागत नाहीं हें मोठें आश्चर्य आहे. यास असें एक कारण सांगतात कीं, त्यांचा जीवितक्रम त्यांच्या धर्माप्रमाणें बसविलेला आहे व जे नियम २,००० वर्षांपूर्वी प्रचारांत असत तेच आजहि प्रचारांत आहेत. हिंदू लोक कर्ममतवादी आहेत. त्यामुळें 'आलिया भोगासी असावें सादर' ही उक्ति त्यांच्या रोजच्या आचरणांत दिसून येते; त्यामुळें ज्या चिंतेनें पाश्चात्य राष्ट्रांतील लोकांस वेड्यांच्या शाळेंत दिवस कंठण्याची पाळी येते, ती हिंदू लोकांस विशेष बाधत नाहीं. कारण आपल्या आचरणांत वामनपंडिताची ही उक्ती व्यक्त होत असतेः—

दिवसरजनी येती येक येक क्रमानें
सुख असुख तशींही या जगीं त्याप्रमाणें!
नियमन कवणही येत नाहीं कराया,
निमुट ह्मणुनि स्वस्थ भोगावयाला!

ही मनःशांति जरी खरोखर स्तुत्य आहे, तरी तिचा अतिरेक मात्र हानिकारक आहे. सध्यांच्या झटापटीच्या काळांत हात जोडून स्वस्थ

बसणें हें सर्वथैव लांछनास्पद आहे. आपला उदय अशानें होणार नाहीं. आपणास उद्योगाची कास धरिली पाहिजे. आपणास प्रकर्ष-तत्पर झालें पाहिजे. कारण, भारवीनें ह्मटलें आहे कीं,

प्रकर्षतंत्राहि रणे जयश्रीः।

येथवर वेड ह्मणजे काय, त्याचे प्राच्यपाश्चात्य दृष्टीनें कोणते प्रकार आहेत, तें कोणत्या वर्षी लागतें, तें कोणत्या कारणांनीं लागतें, तें किती दिवस टिकतें, तें कसें घालवितां येतें, त्याचीं चमत्कारिक उदाहरणें कोणतीं आहेत, वेड ही सबब सांगतां येते काय? इत्यादि प्रश्नांचा विचार यथाशक्ति झाला. मनुष्यास बुद्धीसारखी अप्रतिम देणगी लाधली आहे, ह्मणूनच त्याची सारी शोभा आहे. नाहीं तर तो एखाद्या वन-पशूसारखा नग्न, शून्य, उग्र, क्रूर किंवा हीन, दीन, खिन्न असा प्राणी दिसूं लागतो. एक बुद्धि नष्ट झाली कीं, त्याच्यांत एकदम जमीन-अस्मानाचें अंतर कसें पडतें! व ती ताळ्यावर आणण्यास कोण यातायात पडते! त्यांतून यश आलें तर ठीक, नाहीं तर सारें मुसळ केरांत कसें जातें! इतका हा नाजूक व अवघड विषय आहे. इंजिनियरिंगमध्यें गंगेसारख्या मोठ्या नदीवर पूल बांधण्याचें किंवा खंडाळ्यासारख्या एखाद्या बिकट घाटांतून बोगदे काढण्याचें काम जसें चातुर्याचें व धाडसाचें असतें; तशींच मानसिकशास्त्रांत वेडाची बरोबर उपपत्ति बसविणें, वैद्यकशास्त्रांत त्याचें नेमकें निदान ठरवून तदनुरूप औषधयोजना करणें व धर्मशास्त्रांत त्यापासून सामाजिक व व्यक्तिविषयक हक्कांतील घोंटाळा मोडून टाकणें हीं कामें पण चातुर्याचीं व धाडसाचीं असतात. तेव्हां असल्या कामगिरीचें चित्र एवढ्याशा चौकटींत रेंखाटणें मजसारख्या चित्रकलानभिज्ञास अत्यंत दुष्कर आहे. तरी सच्चिदानंदकृपेनें मी तें कसेंबसें काढून वाचकांस सादर केलें आहे.

ग्रंथमाला मासिकपुस्तकांत छापलेलें

हिंदुधर्मशास्त्र.

हा निबंध

जगन्नाथ रावजी टुल्लू बी. ए.

यांनीं

अनेक प्राच्यपाश्चात्य ग्रंथांच्या आधारानें लिहिला,

तो

विष्णु गोविंद विजापुरकर एम्. ए.

यांनीं

कोल्हापुर 'श्रीसमर्थ' छा॰ छा॰

सन १९०२

किंमत ६४.

हिंदुधर्मशास्त्र.

* धर्मशास्त्रं पुरस्कृत्य प्राड्विवाकमते स्थितः ।
समाहितमतिः पश्येद् व्यवहाराननुक्रमात् ॥

नारदस्मृतिः

चार वेद, दोन वेद किंवा एक वेद तरी शिकून व कडकडीत ब्रह्मचर्य पाळून मग गृहस्थाश्रम घ्यावा अशी आपल्यांतील ' शिष्ट ' ह्मणवूं पाहणाऱ्यांस शास्त्राज्ञा आहे. असाच रोमन लोकांतही परिपाठ असे. प्रत्येकजणास धर्मशास्त्रा (Jurisprudence) चें ज्ञान असल्याशिवाय ' नागरिक ' ही पदवी व तत्संबंधीं हक्क प्राप्त करून घेण्यास तो योग्य नाहीं असें समजत. सध्यांच्या युगांत वकीलांचें व कोर्टाचें इतकें स्तोम माजलें आहे कीं, उठल्या बसल्या त्यांच्याशीं गांठ असते; व ' कोडत नि सोडत ' याचा बराच प्रत्यय येत असल्यामुळें कलकत्त्यांतील ' अमृत बझारपत्रिके ' सारख्या प्रख्यात व वजनदार पत्रास वेळोवेळीं असे उद्गार काढण्याची पाळी येते कीं, दारूबाजी व रंडीबाजी या घोर व्यसनांप्रमाणें कज्जेबाजीही दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर असल्यामुळें रयतेची दैना न कळत वाढत चालली आहे. यास उपाय हाच कीं, नागरिकानें कायद्याचें साधारण ज्ञान संपादन करून आपल्या अज्ञ जातिबांधवांतील तंटे पंचामार्फत मिटविण्याची पूर्वींची रूढि कायम राखावी, ह्मणजे कोर्टांत होणारी दिरंगाई, खर्च व द्वेषाग्नि हे नाहींसे होऊन प्रजेच्या सुखांत भर पडेल. ह्याच उद्देशानें आपल्या दयाळू इंग्रज सरकारानें ' लवाद कोर्टें ' ठिकठिकाणीं स्थापित केलीं आहेत; पण त्यांकडे जाणें न जाणें पक्षकारांच्या खुषीवर आहे. तेवढें सरकारनें त्यांस भाग पाडावें ह्मणजे इष्ट हेतु साध्य होण्यास फारसा वेळ लागणार नाहीं. असो. आज मी आपल्या कर्तव्यास जागून अशा समाजऋणांतून अंशतः तरी मुक्त व्हावें ह्मणून प्रस्तुत विषय हातीं घेतला आहे.

* " धर्मशास्त्राला पुढें करून, प्राड्विवाक [नामक आचार्य] यांच्या मताप्रमाणें, बुद्धिमान् मनुष्यानें अनुक्रमानें व्यवहारांचें (मुकादमा) परीक्षण करावें. " नारदस्मृति.

हिंदुधर्मशास्त्रासारखा कायद्याचा जबरदस्त विषय मी कां हातीं घ्यावा अशी माझ्या प्रिय वाचकांस जिज्ञासा उत्पन्न होणें साहजिक आहे. तेव्हां ती प्रथम तृप्त केली पाहिजे. दैवदुर्विपाकामुळें, जरी या लेखकास 'एल्एल्. बी.' परीक्षेंत यश आलें नाहीं, तरी त्याचा कायद्याचा अभ्यास आज सात वर्षें सतत चालू आहे; तेव्हां कायद्यांतील मर्म कळण्यास त्यास थोडी बहुत तरी सवड मिळाली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तथापि पदवीधर कायदेपंडितांच्या नजरेखालून हा लेख गेल्यास वाचकांचें मन साशंक रहाणार नाहीं असें वाटून मित्रवर्य रा. गोविंद चिंतामण वाटवे बी. ए. हायकोर्ट प्लीडर (अलाहाबाद) यांकडून तेवढा कार्यभाग उरकवून गेल्या दोन महिन्यांतील माझ्या जिवावरच्या दुखण्यानंतरच्या फुरसतीचा फायदा ग्रंथमालाभक्तांत यथाशक्ति अत्यादरानें करून देण्याचें योजून ह्या मोठ्या विषयास हात घातला आहे.

रा. सा. मंडलिक, मिस्तर मेन, डॉक्टर शिरोमणि, मेसर्स वेस्ट व बूलर इत्यादि विद्वद्वर्यांचे हिंदुधर्मशास्त्रावर इंग्रेजींत मान्य ग्रंथ आहेत. त्यांच्या धर्तीवर लहान प्रमाणावर मराठींतही पण ग्रंथ झाले आहेत. पण ते साधारण सुशिक्षित वाचकांस पाल्हाळिक वाटतात. त्यांचा मथितार्थ यथामति या निबंधांत देण्याचें योजिलें आहे.

आतां आपण प्रस्तुत विषयाकडे वळूं. हिंदुधर्मशास्त्राचीं ठळक अंगें कोणतीं! तर तीं दहा आहेत:—

(१) शास्त्राची उत्पत्ति.
(२) रूढि.
(३) लग्न.
(४) दत्तविधान.
(५) अविभक्त कुटुंब.
(६) वांटणी.
(७) वारसा.
(८) स्त्रीधन.
(९) दानधर्म.
(१०) बिनामी व्यवहार.

(१) प्रोफेसर हॉलंड साहेबांनीं आपल्या 'धर्मशास्त्रां' (Jurispendence) त, धर्मशास्त्राची उत्पत्ति पांच कारणांनीं होते असें ह्मटलें आहे. तीं कारणें हीं होत:—

(अ) रूढि; (ई) नियमस्थापना;
(आ) धर्म; (उ) न्यायपुरवणी.
(इ) कोर्टाचे ठराव;

यांपैकीं पहिलें, दुसरें व पांचवें हीं आपल्या धर्मशास्त्राचीं प्रमुख कारणें आहेत. मनूनें असें ह्मटलें आहे कीं, राजानें आपल्या प्रजेंत पूर्वापार, अबाधित व वाजवी अशा कोणत्या चालीरीती आहेत त्यांची नीट चौकशी करून, तदनुसार नियमस्थापना करावी. यांत कायद्याचें धोरण हें आहे कीं, 'शास्त्राद्रूढिर्बलीयसी.' दुसरें कारण ह्मणजे धर्म याचा धर्मशास्त्राशीं इतका निकट संबंध आहे कीं, 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' शिवाय आपल्यांतील कोणत्याहि कृत्यास सुरुवात होत नाहीं. चौथें कारण असें कीं, राजानें मंत्रिमंडळाचे साह्यानें प्रजेस नियम घालून द्यावेत व त्याप्रमाणें प्रजेनें चालावें; व ह्मणूनच 'राजानः प्रजा धर्मेण शिष्युः' असें शास्त्रवचनच झालें आहे. पांचवें कारण ह्मणजे न्यायपुरवणी. ही पाश्चात्य देशांत जशी धर्मशास्त्रानंतर प्रसिद्धीस आली, तशी ती आपल्याकडे वेदानंतर 'स्मृति' ह्मणून जे ग्रंथ झाले, त्यांत ती प्रगट होऊं लागली. स्मृतिकारांनीं जुन्या प्रघाताचा मान राखण्याच्या मिषानें, देशकालवर्तमानाकडे लक्ष्य ठेवून न्यायाचे नवे प्रघात पाडले, व आपल्या धर्मशास्त्रास बरीच स्थितिस्थापकता आणून देऊन, त्यास तत्कालीन समाजस्थितीस अनुकूल करून ठेविलें. पण सध्यां सरकार विधर्मी असल्यामुळें, आपल्यांतील विद्वान् सुधारकांनीं धर्मशास्त्रांत अमूक सुधारणा अवश्य केल्या पाहिजेत, असे वर्षानुवर्ष ऊहापोह करून समाजापुढें आणिलें तरी त्याचा विशेषसा फायदा होत नाहीं. श्रीशंकराचार्यास तसें विदित करावें, तर ती संन्यासिमूर्ति आंग्लभाषानभिज्ञ असल्यामुळें, आपल्या शिष्यवृंदास कोणत्या नवीन नवीन अडचणींनीं गांजिलें आहे, त्यांचा प्राच्यपाश्चात्य ज्ञानदृष्टीनें व्यापक विचार करण्याचा तिचे अंगीं अधिकार नाहीं. बरें, स्वामी विवेकानंदासारख्यांस जरी तसा विचार करण्याचें सामर्थ्य आहे, तरी त्यास सामान्यजनसमूहावर पूर्वापार धर्मसंबंधीं बाबतींत सत्ता नसल्यामुळें, त्यांच्या खटपटीस यावें

तसें यश तात्काळ येत नाहीं. मिळून काय कीं, ' दांत आहेत तर चणे नाहींत व चणे आहेत तर दांत नाहींत ' अशी सांप्रत आपल्या समाजाची स्थिति असल्यामुळें आपलें धर्मशास्त्रही तटस्थ भासत चाललें आहे.

असो, उरलेलें तिसरें कारण ह्मणजे ' कोर्टाचे ठराव ' हें होत. हें गौण आहे असें वर ह्मटलें आहे. कारण, आपल्या धर्मशास्त्राच्या भरभराटींत सध्यां निजधामास जाऊं पाहणारी आपली सोयस्कर व स्वल्प पंचायतीची पद्धत सर्वत्र प्रचलित होती.

(२) हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या रूढी आहेत. तदनुसार शास्त्राधार असे जे ग्रंथ आहेत, ते भिन्न भिन्न आहेत. त्यांत प्रमुख असे दोन आहेत :—(१) याज्ञवल्क्य स्मृतीवरील विज्ञानेश्वराची ' मिताक्षरा ' नामक टीका व (२) जगन्नाथाचा ' दायभाग '. पहिला ग्रंथ हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत चालतो. दुसरा ग्रंथ फक्त बंगल्यांत चालतो.

जंगम जिनगी ह्मणजे डागडागिणें, भांडींकुंडीं इत्यादि कोठेंही असलीं, तरी त्यांचा मालक जेथला असेल, तेथल्या कायद्याप्रमाणें त्यांची व्यवस्था होते, व स्थावर जिनगी ह्मणजे घरदार, शेतवाडी इत्यादि जेथें असेल, तेथल्या कायद्याप्रमाणें तिची व्यवस्था होते. हा इंग्रेजी कायद्याचा नियम आपल्या धर्मशास्त्रास लागू नाहीं. एका मुंबईकर हिंदु गृहस्थानें कलकत्त्यांत इस्टेट केली. तर तिची व्यवस्था मिताक्षरेप्रमाणेंच चालेल; पण सदरहु मुंबईकर जर दायभाग ग्रंथ मानील, तर त्याप्रमाणें त्याच्या जिनगीची व्यवस्था चालेल.

ज्यांनीं धर्मांतर केलें आहे, असे खोजे, बाट्ये इत्यादिकांच्या जिनगीवरील वारसा व वारसांचा क्रम यासंबंधीं नियम त्यांच्या पूर्वधर्मांतलेच लागू असतात. पण तशी रूढि नसेल, तर निराळी गोष्ट आहे, ह्मणजे त्या बाबतींतही त्यास नवीन धर्मांतले नियम लागू असतात.

(३) लग्न--प्राचीनकाळीं लग्नाचे बाबतींत कांहींएक निर्बंध नसे. पण समाजाचें पाऊल जसजसें पुढें पडत चाललें, तसतसे ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस व पैशाच्य हे आठ प्रकार उलट क्रमानें उदयास आले. यांपैकीं पहिले चार प्रकार ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन उच्च वर्णांत व बाकीचे चार शूद्र वर्गांत प्रचलित असत.

सध्यां काय तो ' ब्राह्मविवाह ' [ह्मणजे कन्यादान]च चालू आहे. कोठें कोठें गरिबीमुळें मुलीचे आईबाप किंवा पालक मुलीबद्दल पैसा [शुल्क] घेतात; पण तो राजरोस रीतीनें नव्हे, तर चोरून मारूनच घेतात.

ब्राह्मविवाह घडून येण्यास जे नियम पाळण्याची आवश्यकता अजून थोडीबहुत प्रत्येक धर्मशास्त्रांत दिसून येते, तो हा :—

पंचमात्सप्तमादूर्ध्वं मातृतः पितृतस्तथा ।

" आईपासून पांच पिढ्यांच्या आंतला व बापाकडून सात पिढ्यांच्या आंतला असा वर असतां कामा नये. " ह्मणजे तो वधूशीं 'सपिंड' असतां कामा नये. याचा भावार्थ इतकाच कीं, वधूवरें जितकीं दूरचीं असतील, तितका त्यांच्यांत आनुवंशिक रोग होण्याचा संभव कमी. याच धोरणानें आपल्या धर्मशास्त्रांत दुसरा एक नियम घालून दिला आहे. त्याप्रमाणें वधूवर एका ' गोत्रां ' [कुळां] तले असूं नयेत; ह्मणजे ते ' सगोत्र ' असूं नयेत. हे दोन्ही नियम उच्च वर्णांस लागू आहेत. या नियमाविरुद्ध कोठें कोठें चाली आहेत. उदाहरणार्थ मारवाडांत चुलत भावाबहिणींचीं लग्नें होतात. महाराष्ट्रांत सोडमुंजीचे वेळीं मामा आपल्या भाच्यास मुलगी देण्यास उभा राहून, त्यास काशीच्या वाटेवरून परतवितो. यावरून असें दिसतें कीं, आपल्यांत मामेबहीण चालत असे. देशस्थ, कर्नाटकी लोकांत मामेबहीण किंवा बहिणीची लेकदेखील चालते. मद्रास इलाख्यांत तर अद्याप मामेबहीण चालते.

सगोत्र मुलीशीं चुकून लग्न झालें, तर नवऱ्यानें तिला आईप्रमाणें पाळली पाहिजे. या शास्त्राज्ञेवर एकानें अशी शंका काढिली कीं, लग्न

जुळवून देणाऱ्या तिऱ्हाइतांच्या चुकीबद्दल किंवा कपटाबद्दल त्या बिचाऱ्या वधूचें पतिसुख कां नाहींसें व्हावें? बरें, तुमच्या ह्मणण्याप्रमाणें, तिला संसारसुख त्याबरोबर भोगितां येत नाहीं, तर तिला इतराबरोबर तें भोगूं देण्यास कोणती हरकत आहे? ह्मणजे, तिचा पुनर्विवाह कां होऊं नये? यावर वे. शा. सं. गोपाळाचार्य गजेंद्रगडकरासारख्या विद्वद्रत्नांनीं असा जबाब दिला कीं, धर्मशास्त्रासंबंधीं गैरसमज किंवा चूक अक्षम्य आहे; ती क्षम्य असती, तर समाजास धर्मशास्त्राचें बंधन नाममात्र राहिलें असतें. हिंदी दंडनीतीवर टीका लिहितांना मेनसाहेबांनींही असेच उद्गार काढिले आहेत. व साधारण धर्मशास्त्राचेंही असेंच सूत्र आहे.—

Ignorentia legis non excusat. (Ignorance of Law is no excuse.)

" कायद्याचें अज्ञान ही सबब चालत नाहीं. "

मुलीचें लग्न योग्यकाळीं करून देण्याचा हक्क बापाचा आहे, व तो आपल्या समाजस्थितीकडे लक्ष दिलें ह्मणजे उजू आहे असें दिसून येईल. कारण, आपल्यांत लग्नाचे बाबतींत कोणकोणाचें कसकसें धोरण असतें तें नेमकें पुढील श्लोकांत दाखविलें आहे:—

रूपं वरयते कन्या माता वित्तं पिता श्रुतं ।
बांधवाः कुलमिच्छन्ति मिष्टान्नमितरे जनाः ॥

" मुलीला नवरा रूपवान् हवा असतो; आईचें लक्ष्य त्याच्या संपत्तीवर असतें; बापाला तो विद्वान् असावा असें वाटतें; नातेवाईकांना त्याचें कुळ पहावेसें वाटतें; व इतर लोकांची नजर मिष्टान्नावर असते. "

वधूचें लग्न योग्य काळीं ह्मणजे ' अष्टवर्षा भवेत्कन्या ' या नियमाप्रमाणें व्हावें असें वर आलें आहे. व वरपक्षी योग्य लग्नकाळ ह्मणजे प्रस्तुत निबंधाच्या आरंभीं सुचविल्याप्रमाणें

वेदानधीत्य वेदौ वा वेदं वापि यथाक्रमं ।
अविप्लुतब्रह्मचर्यो गृहस्थाश्रममाविशेत् ॥

विशीपासून पंचविशीच्या आंतबाहेर असावा असें दिसतें. सध्यां वराचा लग्नकाळ बेतावर येत चालला आहे. तसाच शिक्षणप्रसार जारीनें सुरू होत असल्यामुळें, वधूच्या वयाची मर्यादाहि पुढें सरसावत आहे. बालविवाहाचे जागीं प्रौढविवाह शास्त्रीय पद्धतीवर स्थापित करून, तो सुरू करण्याकडे विद्यालंकृत समाजाचा ओढा आहे. व मुंबई येथील विश्वविद्यालयांत तर एका सद्गृहस्थानें अशा शर्तीवर एक शिष्यवेतन ठेविलें आहे कीं, तें मिळविणारा किंवा मिळविणारीण पदवीधर होईपर्यंत ब्रह्मचर्याश्रम पाळीत असली पाहिजे.

असो. पण बायको विचारी असेल, तर तिला आपल्या मुलीच्या लग्नसंबंधांत नवऱ्यास सल्ला देण्याची चाल आहे. व कविकुलगुरु कालिदासानें उमेच्या विवाहांत, हिमालयाचे तोंडून असें वदविलें आहे.

प्रायेणैवंविधे कार्ये पुरंध्रीणां प्रगल्भता ।

अलीकडील कोर्टांची धांव याहिपलीकडे गेली आहे. वेंकटाचालु वि० रंगाचालू या मुकदम्यांत मद्रास हायकोर्टानें न्यायपुरवणीच्या तत्त्वावर असा ठराव केला आहे कीं, मुलीचा बाप असतां, जर आई मुलीचें जन्माचें कल्याण व्हावें या हेतूनें तिला चांगला वर पाहील, तर तिला त्या वराशीं तिचें लग्न करूं देतां येतें; कारण अशा स्थितींत, जरी बापाच्या हक्काची पायमल्ली आईनें केली, तरी तशानें तिनें आपल्या मुलीचें अकल्याण केलें असें होत नाहीं.

आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें लग्न हा सोळा संस्कारांतील प्रमुख व अभेद्य असा संस्कार आहे. तो नुसता 'धर्मेचार्थे च कामे च नातिचरामि' असा शपथविधि नाहीं. तर त्यामुळें जन्माचें साफल्य होतें; तें कसें तें पुढें येईलच. तसेंच एकदां लग्न लागलें ह्मणजे तें मग मोडतां येत नाहीं; ह्मणूनच, लग्नास पर्यायवाचक प्रचारांतला शब्दसमूह ह्मणजे 'जन्माच्या गांठी' असा आहे. आणखीही एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे कीं, ज्याचे तीळतांदूळ खाल्ले असतील, त्या वराकरतां वधू माळ घेऊन उभी असते ह्मणजे मागील जन्मांत जिचा लागाबांधा असतो,

तीच आपणास बायको मिळते; व चालू जन्मांत जो प्रेमळ नवरा आपणास प्राप्त झालेला आहे, तोच पुढील जन्मीं प्राप्त व्हावा ह्मणून बायका 'कोकिळाव्रतां' सारखीं व्रतें करीत असतात, व त्या 'Matches are made in heaven' (ब्रह्मदेवाच्या घरीं गांठी बांधल्या जातात) याचा सूक्ष्मदृष्टीनें विचार करीत असतात!

लग्नासारख्या प्रमुख संस्कारास स्थितिस्थापकता आणून त्यास साधारण कराराच्या तोडीस आणून बसविण्याची खटपट कोठें कोठें चालू आहे; व तिच्या जोरावर इतरांस मृगजलवत् भासणारें आपलें गृहसुख द्विगुणी करण्याचा प्रयत्न सफल होईल असें धोरण धरून घरोंघर

'सा नित्यमंगलमयी गृहदेवता मे'

अशा आनंद-घंटा वाजतील ह्या कल्पनांचा प्रसार होत आहे!

नवराबायकोचा संबंध अभेद्य आहे व एका म्यानांत दोन सुऱ्या राहत नाहींत हेंही जरी उघड आहे, तरी स्त्री कन्याप्रसू असल्यास, पुत्रप्राप्ती-साठीं एक असतां दुसरी करितां येते. आतां ही जी फट शास्त्रानें ठेविली आहे, तिचा बरीच मंडळी दुरुपयोग करीत आहेत; पण शिक्षण-प्रसाराबरोबर असला घोर प्रकार नष्ट होईल असें वाटतें.

दुसरें असें कीं, बायको जारिणी बनेल, तर नवऱ्यास तिला सोडून देतां येतें; पण जर ती शुद्धीवर येईल, तर त्यानें तिला अन्नवस्त्र द्यावें. उलटपक्षीं, जर नवरा बाटेल किंवा तो तिला विचारल्याशिवाय संन्यास घेईल, किंवा तो वेश्या घरांत ठेवील, किंवा तो क्षयरोग, रक्तपित्ति इत्यादि महाव्याधींनीं ग्रस्त असेल किंवा तो आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ असेल, किंवा तो नपुंसक असेल, किंवा तसेंच दुसरें एखादें कारण असेल, तर बायकोनें नवऱ्यास सोडलें तरी तें उजू आहे. पण शूद्रांत काडी मोडून देण्याची चाल आहे.

पुनर्विवाह उच्चवर्णांत प्रचलित नाहीं. तो शूद्रांत प्रचलित आहे. त्यास महाराष्ट्रांत 'पाट' ह्मणतात, गुजराथेंत 'नात्रा' ह्मणतात व उत्तर हिंदुस्थानांत 'घरीचा' ह्मणतात. लोकप्रिय अकबर बादशहा-

प्रमाणें उदार इंग्रेज सरकारनें हिंदु विधवांचा पुनर्विवाह ज्यांच्यांत संमत असेल, त्या लोकांत तो कायदेशीर आहे, व त्यापासून उत्पन्न होणारी प्रजा औरस आहे असें कायद्यानें ठरविलें आहे. सुधारलेल्या एतद्देशीय संस्थानांनींही यासंबंधीं चळवळ सुरू केली आहे. म्हैसूरांत व बडोद्यांत याविषयीं कायदे झळकत आहेत. पुण्यांत हिंदु विधवांचा पुनर्विवाह शास्त्रीय रीतीनें घडवून देणारी मंडळी निघाली आहे. दर वर्षी राष्ट्रीय सभेनंतर भरणाऱ्या सामाजिक परिषदेंत या विषयाचा खल सुरू आहे. व 'अबलोन्नतिलेखमालाकारा'सारख्या विद्वान् गृहस्थासहि असें वाटत आहे कीं, अक्षतयोनींचा पुनर्विवाह करणें हें सशास्त्र आहे.

बायकोवर नवऱ्याची पूर्ण सत्ता असते, एवढेंच नाहीं, तर ती त्याची अर्धांगी असते, तिला त्यानें, वाटेल तशी वांकवावी, असें जरी आहे, तरी त्यानें तिला अन्नवस्त्रालंकारादिकांनीं प्रसन्न ठेवावी अशी पूर्वापार समजूत आहे. मनूनें तर तशी शास्त्राज्ञाच करून टाकिली आहे. तो आपल्या प्रख्यात 'स्मृतीं'त ह्मणतो :—

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।

या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे बायको नवऱ्याच्या विश्वासास पात्र आहे. मात्र तिला नवऱ्याच्या नांवावर पैसे उसने काढण्याची मुभा आहे. मात्र अन्नवस्त्र, श्राद्धसंस्कार इत्यादि अवश्य कामाकरतांच ते काढितां येतात. ती अस्थानीं कर्ज करील तर त्याबद्दल तिची तीच जबाबदार असते व तसलें कर्ज तिला आपल्या पुंजीं (स्त्रीधनां) तून फेडावें लागतें. नवऱ्यास मात्र बायकोच्या स्त्रीधनावर मालकी सांगतां येत नाहीं; पण अडीअडचणींत तिनें त्यास त्यांतून मदत केली पाहिजे. पण नवऱ्याचें डोकें वर झालें कीं, त्यानें तिची फेड केली पाहिजे.

(४) दत्तविधान—"पुत्रप्रयोजना दाराः" [पुत्रप्राप्तीस्तव बायको असते.] हा लग्न करण्याचा उद्देश आहे. तो सफल झाला ह्मणजे आपणास पुत्र झाला कीं आपल्या जन्माचें सार्थक होतें. कारण,

"पुन्नाम्नो नरकाद्यस्मात्त्रायते पितरं सुतः"

इत्यादि वचनांवरून असें निष्पन्न होतें कीं मनुष्यास 'पुत्' नामक नरकापासून रक्षण करणारा 'पुत्र' होय. पुत्र आपल्या पितृत्रयीस पिंडदानानें संतुष्ट ठेवतो; तो आपल्या वंशाची वृद्धी करतो; व आपल्या जिनगीचें रक्षण व वर्द्धन करतो. असा पुत्र--ठेवा प्राप्त न झाल्यास, त्या निपुत्रिकास आपल्या शास्त्रानें एक तोड सांगितली आहे. त्यानें मुलगा दत्तक घ्यावा. ज्यास **दत्तक** घ्यावयाचें, तो सगोत्र असून अगदीं जवळचा नातेवाईक असावा; पण जिच्याशीं **लग्न** करावयाचें, ती असगोत्र असून अगदीं दूरची असावी लागते. ज्यास दत्तक घ्यावयाचें, तो मुलगा शोभेल असा (लहान) असावा; व जीस बायको करावयाची, तीही वरास शोभेल अशी (लहान) असावी. आणखी, दत्तकमीमांसाकार नंदपंडित यांणीं असा एक निर्बंध घातला आहे कीं,

"यन्मातरि नियोगः संभवति तादृशः पुत्रः कार्यः"

"ज्या मुलाच्या आईशीं (दत्तक घेणाऱ्या) गृहस्थाला नियोग करतां येईल, तिचा मुलगा दत्तक घेण्यास योग्य असतो."

[रावसाहेब मंडलिक यांणीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, मनूनें देखील नियोगास जारकर्माच्या तोडीस आणून ठेविलें होतें; व तें लग्नासारख्या जगन्मान्य पवित्र संस्काराच्या पासंगास येत नव्हतें असें ह्मटलें आहे.]

ह्मणून, भाचा, मावसभाऊ किंवा आतेभाऊ यांस दत्तक घेतां येत नाहीं. हा नियोगासंबंधीं निर्बंध सार्वत्रिक नाहीं. अलाहाबाद हायकोर्टांतील न्यायमूर्ति बॅानर्जी यांचें नंदपंडितास अनुकूल असें मत असतांही, फुलबेंचनें त्याविरुद्ध ठराव दिला (भगवान्‌सिंग वि. भगवान्‌सिंग).

सवतीचा मुलगा असला, तर दत्तक घेण्याची गरज नाहीं; कारण, तोच दत्तकासारखा असतो. तसेंच, सख्ख्या भावांपैकीं एकास मुलगा असेल, तर इतर भावांस दत्तक घेण्याची गरज नाहीं; कारण, तो त्या भावांपैकीं प्रत्येकाचा मुलगा आहे असें धरतात. ह्मणून असें ह्मणतात कीं,

भ्रातृणामेकजातानां यद्येकः पुत्रवान् भवेत् ।
सर्वे ते तेन पुत्रेण पुत्रिणो मनुरब्रवीत् ॥

आतां नवऱ्याचे मागें बायकोस मुलगा दत्तक घेणें असेल, किंवा तिला दुसऱ्यास मुलगा दत्तक देणें असेल, तर त्या कामीं तिला नवऱ्याची संमति पाहिजे. वसिष्ठानीं असें ह्मटलें आहे कीं,

" न स्त्री पुत्रं दद्यात्प्रतिगृह्णीयाद्वान्यत्रानुज्ञाद्भर्तुः । "

या वचनाचा निरनिराळ्या प्रांतांत निरानिराळा अर्थ करण्याची चाल आहे. मिथिल देशांतील दत्तविधानांत, संमति देणारा पति हजर पाहिजे; यामुळें, तिकडे विधवेस दत्तक देतांहि येत नाहीं व घेतांहि येत नाहीं. काशी व बंगाल या प्रांतीं विधवेनें अगोदर संमति घेऊन ठेवलेली असली तर, चालते. मुंबईकडे तिनें नवऱ्याची संमति घेतली पाहिजे असें नाहीं; कारण, दत्तविधानासारख्या ज्या कृत्यांनीं नवऱ्याच्या मृतआत्म्यास शांति व उत्तम गति मिळेल, त्या करण्याकरतांच तिचे हातीं त्याची जिनगी आलेली असते. (पण सुवासिनीस दत्तक घेणें झाल्यास, तिला मात्र आपल्या नवऱ्याचा सल्ला घ्यावा लागतो.) मद्रासेकडे तिला तशी संमति न मिळेल, तर तिनें आपल्या नवऱ्याच्या सपिंडांची संमति घेतली ह्मणजे झालें. (रामनाद येथील प्रख्यात मुकदमा.)

नवऱ्याचे मागें मोठ्या सवतीला मुलगा दत्तक घेणें असेल, तर तिला धाकटीचा विचार घ्यावा लागत नाहीं (रखमाबाई वि० राधाबाई). पण धाकटीला मात्र मोठीच्या विचाराशिवाय तसें करतां येत नाहीं. यासंबंधीं कलकत्ता हायकोर्टाचें विरुद्ध मत आहे. पण, प्रत्येकीला नवऱ्यानें दत्तक घेण्याचा अधिकार देऊन ठेवला असेल, तर सर्वजणींस पृथक् पृथक् दत्तक घेतां येतो.

अविभक्त कुटुंबांत, विधवेस मुलगा दत्तक घेणें असेल, तर तिनें आपल्या नवऱ्याच्या भाऊबंदांच्या विचारानें तसें करावें; कारण, दत्तक न घेतल्यास, तिच्या नवऱ्याची जिनगी त्या भाऊबंदांस मिळते

व तिला त्यांजवळून काय तें अन्नवस्त्र मिळतें. [त्रावणकोर येथील प्रख्यात मुकद्दमा.]

विधवेनें नवऱ्याच्या सपिंडांच्या विचारानें दत्तविधान केलेलें असलें ह्मणजे तें योग्य उद्देशानें केलेलें आहे असें धरतात. (गंटूर येथील प्रख्यात खटला.) मेन साहेबांनीं आपल्या हिंदुधर्मशास्त्रांत असें ह्मटलें आहे कीं, लग्नाचे बाबतींत, पक्षकाराचा लग्न करण्याचा काय उद्देश आहे हें पहात बसण्याची जशी गरज नाहीं तशी दत्तविधानाचे बाबतींतही नाहीं.

मुलगा दत्तक घेतल्यानें ज्या तिऱ्हाइत इसमांचें नुकसान होण्यासारखें असेल, त्यांचा विचार दत्तक घेणाऱ्या विधवेनें घेतला पाहिजे. (रूपचंद, वि० रखमाबाई.)

पंजाब, काश्मीर व तिरहूत या प्रांतीं दत्तक घेण्याचा जो प्रकार आहे, त्यास ' कृत्रिम ' ह्मणतात. या प्रकारांत, आईबापांनीं मुलगा कोणास दिलेला नसतो ; तर त्यास आपला मुलगा ह्मणून कोणी मानतात, असा मुलगा विधवेनें घेतल्यास तो तिच्याच जिनगीचा वारस होतो ; त्यास आपल्या नवीन बापाच्या जिनगीवर वारसा सांगतां येत नाहीं.

मद्रास इलाख्यांतील बल्लारी व तिचे आसपासचे प्रांतांत रड्डी लोकांत जांवयास दत्तक घेण्याचा प्रघात आहे. त्यास ' इलेतम ' ह्मणतात.

मुली दत्तक घेण्याची चाल प्राचीन काळीं असे व हल्लींही कांहीं ठिकाणीं आहे. विश्वयोषितांमध्यें मुली दत्तक घेतात. आईचा धंदा चालू ठेवण्याकरतांच जर असलें दत्तविधान केलेलें असेल, तर तें रद्द होय (मथुरा, वि० येसू). पण आईच्या जिनगीवर वारसा सांगण्याकरितां तें केलेलें असेल, तर तें रद्द नव्हे, (तारानायकीण, वि० नाना).

एखाद्याच्या जिनगीवरील हक्क बुडविण्याचे हेतूनें, त्यास न विचारतां कोणीं दत्तविधान केलें, तर तें सहा वर्षांत रद्द करवून घेतां येतें ; पण

लग्न चुकीनें किंवा कपटानें सगोत्र मुलीशीं झालें, तर त्या बिचाऱ्या पोरीस कायदेशीर रीतीनें दाद मागतां येत नाहीं.

दत्तविधान शिरस्त्याप्रमाणें झालें नसेल, तर तें रद्द करवून त्या दत्तकाच्या हातांतील जिनगी बारा वर्षांचे आंत परत घेतां येते.

पार्वतीबाई, वि० राम; या मुकदम्यांत मद्रास हायकोर्टानें असा निवाडा दिला कीं, जरी वादीनें प्रतिवादीस दत्तक घेऊन त्याच्या जिनगीची अठरा महिने व्यवस्था पाहिली आहे, तरी तेवढ्यानें तिला त्याचें दत्तविधान रद्द ठरवून घेण्यास तोंड नाहीं असें नाहीं. कारण, दरम्यानचा अठरा महिन्यांचा काळ फार थोडा आहे.

दत्तकाशीं पटत नाहीं एवढ्यावरून विधवेस त्याचें दत्तविधान रद्द करून टाकतां येत नाहीं.

मुलगा दत्तक घेतल्यावर, दत्तक घेणाऱ्या गृहस्थास औरस मुलगा झाला तर औरस व दत्तक.

	औ०.	द०.
बंगाल्यांत	२/३	१/३
काशींत	३/४	१/४
मुंबई व मद्रास येथें	४/५	१/५


असे वांटेकरी होतात.

आतां, दत्तविधानासारख्या उपयुक्त संस्थेच्या सांप्रत स्थितीकडे वळूं. दत्तक कसा निघेल; तो मोठा झाल्यावर त्यास शिंगें फुटतील कीं काय; तो कोणाच्या नादीं लागून, आपल्यावर उलटून सर्वांचें वाटोळें करील कीं काय; तो छंदीफंदी निघून, आपल्या कुळाचा नांवलौकिक वाढविण्याऐवजीं, त्यास बट्टा लावील कीं काय; असे हजार तऱ्हेचे हजार विचार मनांत येऊन, पुष्कळ दूरदर्शी लोकांना असें वाटत असतें कीं, आपलें सर्वस्व एखाद्या मुलाच्या हातीं देण्याऐवजीं, तें एखाद्या देशहिताचे कामाकडे लावलेलें पुरवलें.

(९) अविभक्त कुटुंब—कलकत्ता हायकोर्टाचे माजी चीफ जस्टिस सर कोमर पेथरॅम यांनीं विलायतेंत नुकतेंच असें बोलून दाखविलें कीं, आजपर्यंत हिंदु लोक पृथ्वीच्या पाठीवर जे दिसत आहेत, त्याचें कारण ह्मटलें ह्मणजे त्यांच्यांतील एकत्र राहण्याची चाल हें होय. कारण ह्या चालींत अर्थशास्त्रांतील 'संभूय समुत्थानम्' (cooperation) हें तत्व व्यक्त होतें. पण या सोयस्कर चालीस घातक अशा कांहीं समजुती आहेत. त्यांतील प्रमुख समजूत मनूनें अशी दिली आहे 'पृथग्विवर्धते धर्मः' (वेगळें राहिल्यानें धर्म वाढतो). दुसरी वेडगळ अहंकाराची समजूत आहे. तीमुळें कोणतीच संस्था चिरकालिक होणें संभवत नाहीं.

बहवो यत्र नेतारः सर्वे पंडितमानिनः ।
सर्वे महत्वमिच्छन्ति तद्वृंदमवसीदति ॥

'ज्या संस्थेंत पुष्कळ पुढारी असतात, सर्वच डौली असतात, सर्वच मोठेपणाची इच्छा करतात, त्या संस्थेचा नाश होतो.'



वर दिलेल्या आकृतींतील पहिल्या धाकट्या चौकांत ज्यांचीं नांवें दिलीं आहेत, ते वडिलोपार्जित अविभक्त जिनगीचे बरोबरीचे हिस्सेदार असतात. मधल्या व बाहेरच्या चौकांत ज्यांचीं नांवें आहेत, ते त्या अविभक्त जिनगींतून अन्नवस्त्राचेच अधिकारी आहेत. आतां, 'आई' च्या पोटीं 'आजी' येते; ह्मणजे 'आई' जशी अन्नवस्त्राची अधिकारीण आहे तशी आजी आहे. तद्वत् 'भावजई' च्या पोटीं 'चुलती' येते. इत्यादि.

हिस्सेदारांस पुढील हक्क असतातः—

(१) अविभक्त जिनगीचा हिशेब पाहणें.
(२) अविभक्त जिनगीवर आपल्या कर्जाचा बोजा लादणें.
(३) अविभक्त जिनगीचा समाइक उपभोग घेणें.
(४) अविभक्त जिनगीची वांटणी मागणें.

हिस्सेदार जननानें, दत्तविधानानें किंवा लग्नानें होतात; व मरणानें दत्तविधानानें किंवा लग्नानें नाहींसे होतात. उ० जननानें 'औरस पुत्र' होतो. दत्तविधानानें 'दत्तक पुत्र' होतो. लग्नानें पति किंवा पत्नी होते. उलट, तोच औरस मेला कीं, त्याचा हिस्सा लुप्त होतो. तसेंच औरसास दुसऱ्याचे मांडीवर दिल्यानें त्याचा मूळ घरांतील संबंध सुटतो. व कन्या, लग्न झाल्यावर, कांहीं विशेष प्रसंगीं दायाद होत नाहीं.

अविभक्त कुटुंब हें बऱ्याच अंशीं व्यापारी पेढीसारखें असतें. (सोमेश्वर, वि. सामळभाई). तरी, त्या दोहोंत पुढें दिल्याप्रमाणें भेद आहे.

अविभक्त कुटुंब.	पेढी.
१. प्रत्येक इसमास कुटुंबाची व्यवस्था पहावी लागत नाहीं. तर कर्त्या पुरुषाकडे ती व्यवस्था असते.	१. प्रत्येक पातीदारास पेढीची व्यवस्था पहावी लागते.

२. प्रत्येक इसमास कुटुंबास होणारा नफातोटा सारखा सोसावा लागत नाहीं; फक्त हिस्सेदारांना सारखा सोसावा लागतो.	२. पेढीस होणारें नफानुकसान प्रत्येक पातीदारास सारखें सोसावें लागतें.
३. प्रत्येक इसमास अन्नवस्त्र मागण्याचा हक्क असतो.	३. प्रत्येक पातीदारास बरोबरीचा हिस्सामागण्यास हक्क असतो.
४. कुटुंबांतील एखादा इसम नाहींसा झाल्यानें त्याच्या व्यवस्थेस कांहीं बाध येत नाहीं.	४. पेढींतील एखादा पातीदार नाहींसा झाल्यानें, ती मोडते.
५. कुटुंबांतील परस्परांचें नातें संस्कारानें उत्पन्न झालेलें असतें.	५. पेढींतील पातीदारांचें नातें करारानें उत्पन्न झालेलें असतें.

मिताक्षरेंत ‘ जन्मनैव स्वत्वम् ’ [जन्मल्यानेंच मालकी येते]. या नियमानुसार, मुलगा जन्मापासून व दत्तक दत्तविधानापासून वडिलोपार्जित अविभक्त जिनगीवर बापाच्या बरोबरीचा वारस असतो. तसेच, नातू व पणतू हे जन्मतः तशा जिनगीवर आज्याच्या व पणज्याच्या बरोबरीचे वारस असतात; परंतु दायभागाप्रमाणें, बाप हा आपले हयातींत वडिलोपार्जित जिनगीचा पूर्ण मालक असतो.

दुसरी गोष्ट अशी कीं, मिताक्षरेप्रमाणें चालणाऱ्या अविभक्त कुटुंबांत एक भाऊ निपुत्रिक होऊन मरण पावला तर त्याची जिनगी त्याच्या विधवेस न मिळतां, त्याच्या मागें राहिलेल्या भावास मिळते. पण दायभागाप्रमाणें ती त्याचे विधवेस मिळते.

आतां, बापाचें नैतिक व कायदेशीर कर्ज मुलानें कां फेडावें तें आपण पाहूं. ऋण फेडल्याशिवाय जे मरण पावतात, ते अधोगतीस जातात. त्यास तेथून सोडवून स्वर्गस्थ करणें यास उपाय ह्मणजे त्यांचें कर्ज फेडणें हा होय, व बापाचे पश्चात् त्यांची जिनगी मुलास जी मिळते, ती केवळ त्याचे आत्म्यास श्राद्धादि क्रियांनीं स्वर्गसुख मिळवून देण्याकरतांच

मिळालेली असते. ह्मणून बापाचे पश्चात् मुलानें त्याचें कर्ज फेडलें पाहिजे, व सध्यांच्या इंग्रेजी कायद्याप्रमाणें बापाच्या जेवढ्या जायदादी असतील, तेवढ्याच कर्जाबद्दल मुलगा जबाबदार धरला जातो. (गिरिधारीलाल, वि० कंटूलाल).

बापाच्या हयातींत, सावकारानें त्यावर डिक्री मिळविली; तर तिच्या बजावणींत वडिलोपार्जित जिनगींतील मुलाचा वांटाही वाटेल तर घ्यावा. (दीनदयाळ, वि० जगदीप नारायण).

खंडूभाई गुलाबभाई, वि. बळवंतराव खंडूभाई देसाई; या अलीकडील महत्वाचे मुकदम्यांत मुंबई हायकोर्टांतील सर्व न्यायाधीशांचें एकमत होऊन, न्यायमूर्ति रानडे यांनीं जो ठराव वाचून दाखविला, त्यांत असें आहे कीं, अविभक्त कुटुंबांत मुलास आपल्या अविभक्त वांट्यांची विक्री किंवा गहाण, इतर हक्कदारांचा विचार घेतल्याशिवाय, करून देतां येतें. सदरहू मुकदम्यांत, बळवंतरावानें विलायतेंत ब्यारिस्टरीचा अभ्यास करण्यास जाण्याचे हेतूनें आपले वडील खंडूभाई यांजकडून त्यांच्या स्वकष्टार्जित धनांतून कर्ज घेतलें व आपल्या इतर भावांना न कळवितां आपला अविभक्त वांटा वडिलांकडे गहाण लावून दिला. त्यानंतर त्या भावांनीं आपल्या वडिलांबरोबर वांटणी करण्याचा विचार केला. त्यांत हायकोर्टानें बळवंतरावानें केलेला व्यवहार उर्जू आहे असें ठरविलेलें वर आलेंच आहे. या निकालाचे समर्थनार्थ कोर्टानें ' मुत्तुस्वामी, वि० सुब्रह्मण्यम् ' या मुकदम्यांतील मद्रास हायकोर्टाचें मत पसंत केलें.

पण वायव्य प्रांतांत व बंगाल्यांत मात्र असें चालत नाहीं. तेथें ' दीनदयाळ, वि० जगदीप नारायण ' यांत ठरल्याप्रमाणें रूढि आहे.

बापास स्थावर जिनगीची विक्री, गहाण, खंडचिठ्ठी किंवा बक्षीसपत्र करावयाचें असेल, तर त्यास त्या बाबतींत आपल्या मुलाची संमति व सही घ्यावी लागते (भाईशेट, वि० शंकर). पण जंगम जिनगीच्या विल्हेवाटींत तशी भानगड नसते. कारण त्यांत असें धरलें जातें कीं, ती विल्हेवाट त्यानें कुटुंबाच्या हिताकरतांच केलेली असावी. तशीच स्वक-

ष्टार्जित जिनगीच्या विल्हेवाटींतही भानगड नसते. (पुरुषोत्तम शेणवी, वि० वासुदेव शेणवी); कारण, तशा जिनगीचा ज्याचा तो पूर्ण मालक असतो.

आतां स्वकष्टार्जित धन (जिनगी) कशास ह्मणतात तें आपण पाहूं. याज्ञवल्क्यस्मृतींत, स्वकष्टार्जित धनाविषयीं असें ह्मटलें आहे :—

पितृद्रव्याविरोधेन यदन्यत्स्वयमर्जितं ।
मैत्रमौद्वाहिकं चैव दायादानां न तद्भवेत् ॥

(१) पितृद्रव्या (वडिलोपार्जित धना)स हात न लावतां जी आपल्या निढळत्या घामानें मिळविलेली असते ती. (२) जी मित्रापासून मिळालेली असते ती. (३) जी लग्नांत मिळालेली असते ती; अशी जिनगी दायादां (हिस्सेदारां)ना घेतां येत नाहीं.

' विद्याधन ' हें एका प्रकारचें स्वकष्टार्जित धन आहे. तेव्हां त्यावर ज्याची त्यास पूर्ण मालकी आहे. आईबापांनीं नुसतें लिहणें-वाचणें करून दिलें; पण पुढें मुलानें तें वाढवून, आपल्या करामतीवर एखादा धंदा उभारून त्यावर पैसा कमाविला, तर तें त्याचें ' विद्याधन ' होय. अत एव, त्यावर त्याचीच पूर्ण मालकी होय.

बापाचें स्वकष्टार्जित धन त्याच्यामागें मुलास मिळालें ह्मणजे तें ' वडिलोपार्जित धन ' होतें, व त्यांतून मुलांना आपल्या विधवा भावजयीच्या अन्नवस्त्राची सोय केली पाहिजे. (जानकी, वि० नंदराम; अ०).

जरी बापापासून कांहीं वडिलोपार्जित धन मिळालें नाहीं, तरी मुलांनीं आपल्या आईचें पालनपोषण केलें पाहिजे. (सुब्रह्मण्यम्; वि० सुवाका, म०) यावरून असें उघड दिसतें कीं, ज्या स्त्रीस मुलगा आहे, तीस पतिनिधनानंतर सर्वस्वी दुसऱ्याचे तोंडाकडे पहात बसावयाला नको. तिचा आशांकुर अजिबात तुटलेला नसतो. तिला वाटत असतें कीं, ' असतील बाळ, तर फेडतील काळ! '

बायकोचें वांकडें पाऊल पडेल, तर नवऱ्यानें तिला घरांतून घालवून द्यावें असें मागें आलेंच आहे. पण तीच जर वाटेवर येईल, तर त्यानें

किंवा तिच्या आईबापांनीं किंवा भाऊबंदांनीं, तिला घांसभर अन्न व नेसायास धडोत्रीं दिलीं पाहिजेत. [वालू, वि० गंगा ; मुं०].

अन्नवस्त्राची बाकी थकेल, तर विधवेनें भाऊबंदांना कायदेशीर नोटीस देऊन १२ वर्षांच्या आंत त्यांवर फिर्याद ठोकून, ती रकम वसूल करून घ्यावी. मुंबई, मद्रास व कलकत्ता या इलाख्यांचे राजधान्यांतून सॉलिसिटरमार्फत नोटीस द्यावी लागते, व बाहेरगांवीं साध्या वकिलामार्फत दिलेली चालते.

ज्या जिनगींतून विधवेचें अन्नवस्त्र द्यावयाचें असतें, ती त्या विधवेस बुडविण्याचे उद्देशानें, भाऊबंदांनीं विकली व तें कपट खरेदीदारास माहीत असलें तर, त्या विधवेस त्या खरेदीदाराजवळ अन्नवस्त्र मागतां येतें. कारण, तिचें अन्नवस्त्र ह्मणजे त्या जिनगीवरील मोघम जडजोखीमासारखें असतें. [लक्ष्मण, वि० सत्यभामाबाई].

ज्या घराचे उत्पन्नांतून विधवेचें अन्नवस्त्र दिलें जातें, तें भाऊबंदांनीं विकलें, तर खरेदीदारास तिला त्या तिच्या राहत्या घरांतून घालवून देतां येत नाहीं. तसें करणें असेल तर भाऊबंदांनीं समजुतीनें त्या खरेदीखतावर तिची सही घ्यावी.

(६) वांटणी—अविभक्त कुटुंबांत बाप हा कर्तापुरुष असतो, व मुलगे साधारणतः त्याच्या आज्ञेंत असतात. ‘ आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया ’ ही कालिदासोक्ति थोडीबहुत प्रत्येक घरीं प्रत्ययास येते. त्यामुळें असें कुटुंब एखाद्या राजसत्ताक राज्याप्रमाणें असतें. त्यांत बाप हा राजा व [समजूतदार] मुलगे हे प्रधान होत ; पण तेंच बाप वारल्यावर त्या कुटुंबरूपी राज्याचें रूपांतर होतें. त्याचें प्रजासत्ताक राज्य बनतें. बापामागें, वडील मुलगा कर्तासवरता झालेला असल्यामुळें, तो त्यांतील अध्यक्ष होतो व इतर धाकटे भाऊ हे त्यास जरी सल्लामसलत देणारे असतात, तरी ते त्यास बापाइतके वचकत नाहींत. ते त्यास आपल्यांतीलच एक असें लेखतात.

पण ' कलौ कृत्या गृहे गृहे ' असा जेथें प्रकार असतो, तेथें मुलास बायको मिळाली कीं, ती आपला प्रभाव त्यास दाखवूं लागते. ' नवीना मीनाक्षी व्यथयति मुनीनामपि मनः ' मग तीपुढें त्याचा तो काय पाड! ती वांकवील, तसा तो वांकतो. तिला, त्याच्याशिवाय, घरांतलें इतर कोणीही नकोसें होतें. ' बंधून् दारयतीति दाराः ' [भाऊबंदांत दुही माजविते ती बायको.] हें अक्षरशः खरें होऊं लागतें व आपल्यांतील एकत्र राहण्याच्या चालींत जी कांहीं गोडी आहे, ती सारी नाहींशी होते. असें झालें ह्मणजे वांटणीवर पाळी येते.

पूर्वीं आईबाप असत, तोंपर्यंत तरी असला अनिष्ट प्रसंग येत नसे. पण आतां तर धडधडीत आईबाप असतां, तसें करण्याचा मुलास हक्क आहे असें सर्वत्र ठरलें आहे. [आप्पाजी. वि० रामचंद्र मु०]. आईस मात्र वांटणी करा असें ह्मणतां येत नाहीं. मुलांनीं होऊन वांटणी केली, तर आईस एक वांटा मिळतो.

एखादा भाऊ अज्ञान असेल, तर त्याचा वांटा काढून पंचाचे हवालीं करावा लागतो.


वांटणी झाल्यावर, एखादा भाऊ होईल, तर त्याकरितां वांटणी फिरून केली जाईल. पण बापानें हिस्सा ठेऊन घेतला असेल तर वांटणी पुन्हा करण्याचें कारण नाहीं.

कुटुंबांतील कर्ता पुरुष जिनगीची धुळधाण करीत असेल किंवा ती कपटानें आपल्या घरांत घालीत असेल किंवा इतर कारणामुळें अज्ञान मुलाचें नुकसान होत असेल, व वांटणीमुळें त्याचा फायदा होण्याचा रंग असेल, तर वांटणीची फिर्याद करावी. (दामोदर, वि०उत्तमराम ; महादेव, वि० लक्ष्मण, मुं०.)

वांटणी झाल्यावर, जेवणखाण जरी एकत्र होत असलें तरी हरकत नाहीं ; पैशाचा हिशेब वेगवेगळा होत असला ह्मणजे पुरे. तसें नसेल तर भाऊभाऊ एकत्र आहेत असें धरतात. जसजसें नातें दूरचें असतें, तसतशी ही एकत्रपणाविषयींची समजूत कमी कमी होत जाते.

वांटणी झाली, तरी माऊभाऊ पुन्हा एकत्र होण्याचा संभव असतो. याच कारणास्तव अगदीं कांटेतोल न्याय झाला नसला ह्मणजे पंच आपल्या पक्षकारांची अशी समजूत घालीत असतात कीं, ‘ताटांत सांडलें काय आणि वाटींत सांडलें काय—एकूण एकच!’

(७) वारसा—जिनगीवरील मालकी, विक्री व बक्षीस या मुख्य ३ प्रकारांपैकीं कोणत्याहि एका प्रकारानें वारसा प्राप्त होते. विक्री व बक्षीस याविषयीं मागें आलेंच आहे. आतां, वारसाविषयीं विचार करूं. मिताक्षरेप्रमाणें चाळणाऱ्या प्रांतांत वारसांचा क्रम पुढील नकाशांत दिल्याप्रमाणें आहे:—



मिताक्षरेप्रमाणें जो जवळचा असतो—ह्मणजे ज्याचें नातें किंवा रक्तसंबंध जवळचा असतो—तो दूरच्यास वारसाचे बाबतींत मागें हटवितो. उदाहरणार्थ, ‘अ’ या गृहस्थास मरतेसमयीं ‘आ’ हा भाऊ व ‘इ’ हा मुलगा असे दोन वारस आहेत. तर वर दिलेल्या नकाशाप्रमाणें ‘अ’ची जिनगी ‘इ’ स मिळेल. तसेंच ‘क’ या निपुत्रिक गृहस्थामागें

'ख' ही त्याची बायको व 'ग' ही त्याची आई आहे. आतां सदरहू नकाशाप्रमाणें 'क'ची जिनगी त्याची बायको 'ख' हीस मिळेल.

गुजराथमध्यें व्यवहारमयूख नामक ग्रंथ मान्य आहे. त्याप्रमाणें आईनंतर बहिणी वारसदार होतात.

बंगाल प्रांतीं दायभाग ग्रंथ चालतो. त्याअन्वयें, जो मृतास अधिक पिंड देण्यास अधिकारी असतो, त्यास त्याची जिनगी मिळते व पुरुषास स्त्रीपेक्षां अधिक पिंड मृतास देण्याचा अधिकार असतो. उदाहरण :— 'क' या मृत गृहस्थामागें त्याचे कायते 'ख' व 'ग' हे आईबाप आहेत. आतां बंगालच्या धर्मशास्त्राप्रमाणें 'क'ची जिनगी 'ग'स मिळेल.

(८) स्त्रीधन—ह्मणजे स्त्रीस प्राप्त झालेली किंवा तिनें निढळत्या घामानें मिळविलेली जिनगी. स्त्रीधनाची व्याख्या याज्ञवल्क्यस्मृतींत अशी दिली आहे—

पितृमातृपतिभ्रातृदत्तमध्यग्न्युपागतं
आधिवेदनिकाद्यं च स्त्रीधनं परिकीर्तितम् ॥

" बापानें, आईनें, नवऱ्यानें किंवा भावानें दिलेली; विवाहहोमाजवळ असतांना मिळालेली; दुसरी सवत करतांना (नवऱ्यापासून) प्राप्त झालेली; इत्यादि जिनगीस 'स्त्रीधन' ह्मणतात. "

यावर मिताक्षराकार विज्ञानेश्वर ह्मणतात कीं 'आद्यं' या पदानें स्त्रीस वारसानें मिळालेल्या जिनगीचाहि बोध होतो. पण तसें शक्य नाहीं. कारण, वारसानें मिळालेल्या जिनगीवर स्त्रीची कायती तहाहयात मालकी असते. विशेष प्रसंगीं तिला ती विकतां येते. आतां, नवऱ्याचे घरीं, किंवा बापाचे घरीं, किंवा नवऱ्यापासून किंवा बापापासून कोंवारपणीं लग्न झाल्यावर प्राप्त झालेल्या जिनगीस " सौदायिक स्त्रीधन " ह्मणतात. या अर्थाचा याज्ञवल्क्याचा श्लोक असा आहे.

ऊढया कन्यया वापि पत्युःपितृगृहेपि वा ।
भर्तुःसकाशात्पित्रोर्वा लब्धं सौदायिकं स्मृतम् ॥

' सौदायिक स्थावर स्त्रीधन ' नवऱ्यापासून बायकोस मिळालेलें असेल, तर त्यास विचारल्याशिवाय तिला त्याची विल्हेवाट करतां येत नाहीं. इतरांपासून प्राप्त झालेल्या स्त्रीधनावर तिची पूर्ण सत्ता असते. तसेंच, मैत्रिणीपासून मिळालेल्या धनावर व स्वताच्या कलाकौशल्याच्या कामानें मिळविलेल्या (विद्या) धनावर तिची पूर्ण सत्ता असते.

आतां, स्त्रीधन कोणाकोणा वारसास कोणकोणत्या क्रमानें मिळतें तें पाहूं. डॉक्टर शिरोमणि एम्. ए., एल्‌एल्. डी. (कलकत्ता) यांनीं हिंदुधर्मशास्त्रावरील आपल्या जगन्मान्य ग्रंथांत असा वारसक्रम दिला आहे:—

जिची ती अथवा ' मयत '

|

(१) अविवाहित मुलगी.

|

(२) गरीब विवाहित मुलगी.

|

(३) श्रीमंत विवाहित मुलगी.

|

(४) मुलीचा मुलगा (दौहितृ).

|

(५) मुलीचा नातू.

|

(६) स्वताचा मुलगा (औरस किंवा दत्तक).

|

(७) सवतीची अविवाहित मुलगी.

|

(८) (लग्न पहिल्या चार ब्राह्मादि शिष्ट प्रकारांपैकीं कोणत्या हि एका प्रकारानें झालेलें असेल तर) नवरा. नाहींतर (इतर चारांपैकीं कोणत्याहि एकानें झालेलें असेल, तर) बाप.

बंगालकडे, या क्रमांत कांहीं फेरफार आहेत. ते स्थलावकाश नसल्यामुळें, येथें देतां येत नाहींत.

आपल्यांत स्त्रीधन हा विषय जसा आपल्या दूरदर्शीपणाचा द्योतक आहे, तसा इतर सुशिक्षित लोकांतहि तो आहे. इंग्रज लोकांत मुलीकडील आप्त तिच्या जन्माची सोय, तिचें लग्न होण्यापूर्वींच करून ठेवतात. त्यास ते 'ठरावपत्र' (Marriage Settlement) ह्मणतात. त्याप्रमाणें त्या धनाची व्यवस्था पाहणें हें नवऱ्याचें काम असतें. ह्मणजे नवरा हा त्या धनाचा पंच असतो. हें एक प्रकारचें इंग्रज लोकांतलें स्त्रीधन होय. दुसरा प्रकार ह्मणजे विवाहित स्त्रीच्या अंगावरील ऐवज (Paraphernalia) हा होय. व तिसरा प्रकार असा असतो कीं, लग्नानंतर नवरा बायकोस चोळी बांगडी व इतर अशाच हातखर्चाकारितां दर वर्षास एक रकम ठरवून देतो, या स्त्रीधनास इंग्रेज लोक Pin-money ह्मणतात.

मुसलमान लोकांत साहेब लोकांप्रमाणेंच गर्भाधान लग्नाबरोबर होतें; व तेव्हांपासून बायकोस आपल्या माहेरच्या कुलशीलाप्रमाणें अमूक एक रकम मागतां येते. तिला ते 'महर्' ह्मणतात. महंमदी धर्मशास्त्राप्रमाणें प्रत्येकास वाटेल तर एकदम चार बायका करतां येतात. या बहुपत्नीकरणाच्या चालीस प्रतिबंध व्हावा या उद्देशानेंच कीं काय बायकोस नवऱ्याजवळून 'महर्' मागण्याचा हक्क आहे.

(९) दानधर्म—इंग्रेज लोकांत, मठांस देणग्या, अनाथगृहें, रुग्णालयें, देवालयें, रात्रींच्या शाळा इत्यादींत पैसे खर्च करण्याचा परिपाठ आहे, तरी ज्यास असा धर्म करणें असेल, व पुतणे, भाऊ, भाचे असे जवळचे नातेवाईक असतील, त्यास आपल्या मृत्यूपूर्वीं एक वर्ष अगोदर तसें मृत्युपत्र करून, मृत्युतिथीचे अगोदर सहा महिने तें रजिस्टर करून घेतलें पाहिजे. पण न्यायपुरवणींत या बाबतींमध्यें इतकी सवलत आहे कीं, मृत्युपत्नचालकाचें नांव मृत्युपत्रांत कळविलेलें नसेल, तर कोर्टच तें काम करतें. दुसरी अशी गोष्ट आहे कीं, ज्या दानधर्माकरतां मृत्युपत्र-

कर्ता पंचां (मृत्युपत्रचालकां) चे हातीं पैसे देऊन ठेवितो, तो होऊन त्या रकमेपैकीं कांहीं उरेल, तर तें तशाच प्रकारच्या दुसऱ्या दानधर्माकडे लावलें जातें.

वरील तिन्ही नियम हिंदुधर्मशास्त्रास व मुसलमानी धर्मशास्त्रास सारखेच लागू आहेत.

मुंबईतील नामांकित वकील कै० आपटे यांस जवळचे नातलग ह्मणजे पुतणे असतांना 'आनंदाश्रमा' कडे आपली जिनगी लावून देतांना सदरहू पहिल्या नियमांत दिल्याप्रमाणें व्यवस्था करून ठेवावी लागली.

मुंबईतील बाबुलनाथाचे देवळाची व्यवस्था पंचांकडे असून, त्यांच्यांतील घोंटाळा मोडण्याकरितां हायकोर्टाचे ॲडव्होकेट-जनरल (मुख्य सरकारी वकील) यांस त्यांवर फिर्याद ठोकावी लागली. हेंच जर बाबुलनाथाचें देऊळ बाहेरगांवीं असतें, तर तसलें काम तेथील कलेक्टरास करावें लागतें.

अखेरच्या बाजीराव पेशव्यानें रमण्यांत दक्षिणा वांटण्याची जी रक्कम सांगून ठेविली होती; तींतून विद्वान् ब्राह्मणांस दरवर्षास सनदेप्रमाणें दक्षिणा वांटून, उरलेली बाकी आपले न्यायी इंग्रेज सरकार महाराष्ट्रांतील विद्याभिवृद्ध्यर्थ 'दक्षिणा प्राईझ् कमिटी' व 'दक्षिणा फेलोज्' नांवांच्या संस्थांस देत आहे.

(१७) बिनामी व्यवहार—बिनामी व्यवहार ही एका प्रकारची मोघम ठेव (Implied Trust) च होय. या व्यवहारांत ज्याचे पैसे असतात, तो मागें राहून, कांहीं इष्ट हेतूस्तव दुसऱ्याचें नांव पुढें करतो.

बिनामी व्यवहार करण्याचा साधारण उद्देश असा असतो कीं, आपले पैसे लोकांचे नजरेस येऊं नयेत; त्यावर सावकाराची धाड पडूं नये व कोर्टाचें शुष्ककाष्ठ पाठीस लागूं नये.

बिनामी व्यवहार सावकारास बुडविण्याचे हेतूनें केलेला असेल, तर तो हिंदी दंडनीतीप्रमाणें गुन्हा होय.

ह्या व्यवहारांत, ज्याच्या खिशांतले पैसे असतात तो मालक व ज्याच्या नांवानें ते ठेवलेले असतात तो त्याचा पंच असतो; अशी सर्व साधारण समजूत असते.

येथवर आपलें हिंदुधर्मशास्त्र कसें आहे याचा ठोकळ मानानें विचार झाला. आपल्यांत रूढीचें प्राबल्य कसें आहे; समाजास गरज वाटल्यास त्यास तिला हळू हळू कसें मागें हटवितां येते व स्वतास किती स्थितिस्थापकता आणतां येते; आपले लग्नविचार कसकसे पालटत चालले आहेत व त्यामुळें गृहसुखाची कल्पना कशी फिरत चालली आहे; आपली कुटुंबव्यवस्था अर्थशास्त्रदृष्ट्या किती फायदेशीर आहे व सांप्रतच्या कलिमाहात्म्यानें तिची कशी धुळधाण उडत आहे; इत्यादि गोष्टींचा विचार 'नागरिक' ह्मणविणाऱ्या प्रत्येक महाराष्ट्रीयानें करावा; हा या लहानशा निबंधाचा उद्देश आहे. तद्वत् एखाद्याची जरी समजूत होईल तरी माझे श्रम सफळ झाले असें मी समजेन.

पुरवणी

लग्नः—वधू एकाच जातीची, गुणी, असपिण्ड व असगोत्र असावी; अशाविषयीं मनूनें असा उल्लेख केला आहे.

गुरुणानुमतः स्नात्वा समावृत्तो यथाविधि ।
उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् ॥
असपिण्डा च या मातुरसगोत्रा च या पितुः ।
सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने ॥

मनुस्मृतिः ३–४–५.

वधू वराच्या आईबापाशीं सपिण्ड किंवा सगोत्र असतां कामा नये; मनूचा नियम याज्ञवल्क्यस्मृतींतील नियमाशीं जुळत नाहीं. त्यांत असें ह्मटलें आहे कीं, मुलगी वराच्या आईच्या सहा पिढ्यांतली नव्हे, तर चार पिढ्यांतली असूं नये. मनू, कुलूक, व बृहत पराशर यांनीं प्रवराची गोष्ट काढिलेली नाहीं. गौतम व वसिष्ठ यांनीं गोत्राचाहि निर्देश केलेला

नाहीं. यावरून, हें उघड होतें कीं, ऋषीमध्यें असा मतभेद असला कीं, रूढीस धरून चालणेंच ठीक असतें; कारण, चतुर्विंशतिमतानें असें ह्मटलें कीं—

यस्मिन्देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः ।
वर्णानां किल सर्वेषां स सदाचार उच्यते ॥

" ज्या देशांत जो आचार परंपरेनें चालू असतो, तो सर्व जातींत सदाचार गणला जातो. " अशा दृष्टीनें पाहिलें असतां, सध्यां वधू वराच्या गोत्रांतील नसली ह्मणजे आटोपलें.

रूढीचें प्राबल्य दर्शविणारें आणखी एक असें उदाहरण आहे कीं, बदलवाण किंवा समोरासमोर नवरीस देणें हें शास्त्रसंमत नाहीं, तरी अशी चाल आहे. पहा नारदानें ' प्रत्युद्वाह ' [बदलवाण] याविषयीं असें ह्मटलें आहे--

प्रत्युद्वाहो नैव कार्यो नैकस्मिन्दुहितृद्वयम् ।
न चैकजन्ययोः पुंसोरेकजन्ये तु कन्यके ॥

प्रत्युद्वाह कधींही करूं नये, दोन मुली एका गृहस्थास देऊं नयेत; तसेंच एका घरांतील भावाबहिणींचीं लग्नें दुसऱ्या घरांतील बहीणभावंडांशीं करूं नयेत. असें असूनही याच्या उलट प्रकार सध्यां रूढीचे बळावर शिष्ट मानला जातो.

तसेंच धर्मशास्त्रांत असें सांगितलें आहे कीं,

क्लीबोऽथ पतितस्तज्जः पंगुरुन्मत्तको जडः ।
अन्धोऽचिकित्सरोगाद्या भर्तव्याः स्युर्निरंशकाः ॥
याज्ञवल्क्य.

ह्मणजे नपुंसक, भ्रष्ट व त्याचा मुलगा, पांगळा, मस्त, मंद, अंधळा, महारोगी यांना वारसा सांगतां येत नाहीं, (ह्मणून) यास अन्नवस्त्र मागण्याचा हक्क आहे. या मंडळींना पूर्वी लग्न करतां येत नसे. पण वरील याज्ञवल्क्यस्मृतींतील ' तज्जः ' सारख्या पदावरून, त्यांनादेखील लग्न करण्यास हरकत नाहीं. कारण, जे मंत्र वरानें ह्मटले पाहिजेत, ते उपाध्यानें ह्मटलेले चालतात असा प्रघात पडला आहे.

उच्चवर्णांत उपनयन अवश्य आहे, कारण अमुक एका मुदतींत तें न झालें, तर मुक्तीकरितां 'व्रात्यस्तोम' नांवाचा यज्ञ करावा लागतो. पण लग्नाची तशी गोष्ट नाहीं. तें करणें न करणें ज्याच्या त्याच्या खुषीवर आहे एवढेंच नाहीं, तर नैष्ठिक ब्रह्मचर्य ह्मणजे मरेपर्यंत ब्रह्मचारी राहणें हें इष्ट असें भागवत पुराणांत चकचकित सांगितलें आहे. (स्कंध ११, अध्याय ९ पहा.)

दत्तविधान—लग्न हा 'काम्य' विधी आहे असें वर आलें आहे. तद्वत् दत्तविधानही 'काम्य'च आहे; ह्मणजे मुलगा दत्तक घेण्याची इच्छा असेल तर घ्यावा, नाहीं तर तो घेतलाच पाहिजे अशी धर्मशास्त्राची सक्ति नाहीं; पण तशीच जर सक्ति असती, तर नवऱ्यास आपल्या बायकोस दत्तक घेऊं नकोस असें ह्मणतां आलें असतें. पण बयाबाई, वि० बाळा ऊर्फ व्यंकटेश, या मुकदम्यांत मुंबई हायकोर्टानें असा ठराव केला आहे कीं, नवऱ्यास तसें करतां येत नाहीं. हें जरी सारें खरें आहे, तरी मुलगा दत्तक घेतल्यानें मुक्ति मिळते; ह्मणून दत्तविधानास हरकत करणें हें धर्माविरुद्ध अतएव वेडगळपणाचें आचरण आहे.

आतां दत्तक कोणी घ्यावा यासंबंधीं मूळ निबंधांत आलेंच आहे, तरी त्यांत ब्रह्मचाऱ्याच्या तशा अधिकाराविषयीं आलें नाहीं. ब्रह्मचाऱ्यालाही तसा अधिकार आहे. कारण, निपुत्रिक गृहस्थास आपल्या अंत्यविधीस व पिंडदानास जशी दत्तकाची गरज लागते, तशी ब्रह्मचाऱ्यासही लागते. तद्वत् संन्याशासही अधिकार आहे.

दत्तविधानाच्या स्वरूपाकडे पाहिलें असतां, एखाद्या अज्ञान मुलाचेही मांडीवर मुलगा देण्यास हरकत नाहीं. कारण, जरी दत्तविधानानें ऐहिक फायदा होतो, तरी तेवढ्यावरून, तो दिवाणी करार आहे असें धरतां येत नाहीं. तो लग्नासारखा विधी आहे व त्यापासून ऐहिक व पारमार्थिक फायदे होतात.

वडील भावानें धाकट्या भावास वाटेल तर दत्तक घ्यावें, व विज्ञानेश्वराचे मतें, तो स्वयंदत्त किंवा कृत्रिम पुत्रहि होऊं शकतो.

पण वडील मुलास दत्तक देतां येतें काय? मनु, विज्ञानेश्वर इत्यादिकांच्या मताप्रमाणें त्यास दत्तक देतां येत नाहीं. कारण, ते असें शास्त्रवचन सांगतात कीं, ' न ज्येष्ठं पुत्रं दद्यात् ' पण व्यवहारमयूखाचा कर्ता नीलकंठ यास हें ह्मणणें पसंत नाहीं. तसेंच, ज्यास एकुलता एक मुलगा आहे, त्यानें तो दुसऱ्याचे मांडीवर द्यावा काय? शौनकानें ' देऊं नये ' असें ह्मटलें आहे. यासंबंधीं त्याचें असें ह्मणणें आहे :—

नैकपुत्रेण कर्तव्यं पुत्रदानं कदाचन ।
बहुपुत्रेण कर्तव्यं पुत्रदानं प्रयत्नतः ॥

पण कै० रा० सा० मंडलिकांच्या मतें या वचनांत कांहीं तथ्यांश नाहीं. त्यांनीं आपली भिस्त कुबेर, नंदपंडित, नीलकंठ, विज्ञानेश्वर व जगन्नाथ या टीकाकारांवर ठेविलेली आहे. कुबेर व नंदपंडित यांच्या दृष्टीनें एकुलता एक मुलगा " द्व्यामुष्यायण " (दोन्ही बापांचा एकच मुलगा) ह्मणून त्याच्या चुलत्याच्या मांडीवर देतां येतो. कारण अशानें मुलगा देणाऱ्याचा कुलक्षय होण्याची भीति नसते. नीलकंठ, विज्ञानेश्वर व जगन्नाथ यांच्या मतें सदरहू निषेध केवळ दत्तविधान करणाऱ्यास आहे. खुद्द दत्तविधानास नाहीं. ह्मणजे असलें दत्तविधान घडलें, तर तें अशास्त्र नाहीं.

आतां दत्तविधानांत कोणते विधी अवश्य आहेत ते पाहूं. ह्यांत ज्याप्रमाणें, सप्तपदी व विवाहहोम होणें अवश्य आहे, त्याप्रमाणें दत्तविधानांत दत्तकहोम होणें अवश्य नाहीं, फक्त दान व प्रतिग्रह हीं झालीं ह्मणजे उरकलें.

वांटणी—पुढील जिनगी अविभाज्य आहे:—

(१) धर्मादायार्थ लावून दिलेली जिनगी. जसें तळीं, विहिरी, धर्मशाळा इत्यादि.

(२) जहागिरी—शौर्याबद्दल बक्षिसी ह्मणून मिळविलेली. (ध्वजाहृत.)

(३) पेन्शनें—इमानेंइतबारें केलेल्या चाकरीबद्दल चालू असणारी रक्कम.

(४) अंगावर असलेले डागडागिने, कपडे इत्यादि.

(५) विद्याधन.

(६) वतनवृत्ति.

(७) पाणी घेण्याचा हक्क, जाण्यायेण्याचा हक्क इ. (Easements)

(८) जी जिनगी स्वभावतःच वांटणी करण्यासारखी नसते ती; जसें, भांडींकुंडीं, गाडीघोडा, स्त्रिया, (गुलाम किंवा बापानें ठेवलेल्या विश्वयोषिता).

(९) वैवाहिक किंवा वधूबरोबर मिळालेली जिनगी.

(१०) सोडविलेल्या वंशपरंपरागत जिनगीचा चवथा हिस्सा.

(११) पूर्वींच्या वांटणींत भाऊबंदापासून प्राप्त झालेला ऐवज.

स्त्रीधन व अन्नवस्त्र---विधवेस आपल्या नवऱ्यानें दिलेल्या स्त्रीधनाचे उत्पन्नांतून किंवा त्यानें दिलेल्या स्वकष्टार्जितधनाचे उत्पन्नांतून आपला चरितार्थ यथास्थित चालवितां येत नसेल, तर तिला त्याचे वडिलोपार्जित धनाचे उत्पन्नांतून अन्नवस्त्र मागण्याचा हक्क असतो.

ज्या विधवेस सरकाराकडून पेन्शन मिळत असेल, तिला आपल्या नवऱ्याचे भाऊबंदाजवळ अन्नवस्त्र मागण्याचा हक्क नाहीं.

ग्रंथमाला

मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेला,

मरण.

हा निबंध

जगन्नाथ रावजी टुल्लू बी.ए.

यांनीं लिहिला.

तो

विष्णु गोविंद विजापुरकर एम्. ए.

यांनीं

कोल्हापुर 'श्रीसमर्थप्रसाद' छा. छा.

सन १९०२

किंमत तीन आणे.

मरण.

मरणं प्रकृतिः शरीरिणां । विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ॥
क्षणमप्यवतिष्ठते श्वसन् । यदि जन्तुर्ननु लाभवानसौ ॥
—रघुवंशम्

(" मरण हें मनुष्यमात्रांस स्वाभाविक आहे. विद्वान् लोक आयुष्य ही एक विकृति आहे असें ह्मणतात. जर प्राणी क्षणभर देखील थक्कून राहील, तर तो खरोखर भाग्यवान् होय! ")

चिनी युद्धांत शीक, पुरभय्ये इत्यादिकांच्या पलटणींत कांहींजणांस धारातीर्थीं देह ठेवण्याची पाळी आली; मुंबईंत एका तरुण पारशी डाक्टरास आपले बापानें बंगल्यांतून निघून जाण्याची चोवीस तासांची नोटीस देऊन, त्यास प्रसिक ॲसिड् घेऊन आपला अंत करण्याची बुद्धि झाली; एका वयातीत सद्गृहस्थास आपल्या तृतीय संबंधाच्या झॅन्टिपीची कटकट सोसेना ह्मणून त्यास मध्यरात्रीं एका विहिरींत जलसमाधि घ्यावी लागली; एका तरुण व मानी युवतीस आपल्या पतीचे शब्दप्रहर सहन न होऊन तिला अफूच्या गोळ्यावर हात मारावा लागला; एका अब्रूदार गृहस्थास आपल्या सावकाराचें कर्ज डोईजड होऊन स्वतः गळफांस घ्यावा लागला; इत्यादि हजार तऱ्हेच्या हजार गोष्टी आपण हरहमेश ऐकतों, त्या ऐकून आपल्या अंगावर शहारे येतात. आपल्याला त्या मृताबद्दल राहून राहून खेद व विस्मय वाटतो. हें सर्व ठीकच आहे. पण पुष्कळांना मरण ह्मणजे काय वस्तु आहे हें नीट समजत नाहीं. व हा विषय साहजिक रीतीनें भयप्रद आहे ह्मणूनच कीं काय कोणी त्याकडे व्यापक दृष्टीनें पहात नाहीं असें दिसतें. मात्र जे विचारी पुरुष असतात, ते त्याविषयीं फार सावध असतात. त्यांना त्यांतले डावपेंच ओळखून राहण्याची

आवश्यकता वाटते. तेव्हां तत्संबंधी माहिती एकत्र करण्याचें या निबंधांत योजिलें आहे.

आतां प्रस्तुत विषयांत कोणत्या प्रश्नांचा विचार करावयाचा आहे तें आपण पाहूं :—

(१) वैद्यशास्त्रांत मरण कशास ह्मणतात?

(२) नीतिशास्त्रांत त्याचा कसा अर्थ धरितात?

(३) तत्वज्ञानदृष्टीनें त्यांत कोणत्या कल्पनांचा समावेश होतो?

(३) सुखानें मरण कसें येतें? (अ) कर्तव्यतत्परता, (ब) भावी वैराग्याचे अगोदर वैराग्यवृत्ति, (क) ईश्वरावर विश्वास व (ड) दान.

(५) मरणानंतर आपणांस कोणती गति आहे?

१. प्रथम, वैद्यशास्त्रांत मरण ह्मणजे काय धरलें आहे ह्याचा आपण विचार करूं. आर्यवैद्यकांत एका किंवा अनेक कारणांमुळें रोग्यास त्रिदोष झाला ह्मणजे वात, पित्त व कफ या तिहींचा प्रकोप त्याचे शरीरांत झाला कीं त्यानें दुखणें असाध्य होतें; मात्र वैद्यानें त्यास बाह्योपचारार्थ कायती मात्रा देत असावें. युरोपियन वैद्यकांत मरणाविषयीं कसा काय सूक्ष्म विचार केला आहे तें पाहूं. प्रोफेसर हक्स्ले या इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्त्यानें मरण दोन प्रकारचें असतें असें ह्मटलें आहे. एक स्थानिक मरण; व दुसरें सर्वसाधारण मरण. स्थानिक मरण ह्मणजे जें आपल्या शरीराच्या प्रत्येक भागांत क्षणोक्षणीं होत असतें, तें. जसें, कातडी एखादे ठिकाणीं भाजली कीं ती मरते ह्मणजे नाहींशी होते, पण तिचे जागीं नवी येते. तसेंच रक्तांतील कणांचें व इतर तंतूंचें आहे. हें मरण आपणांस मुळींच कळत नाहीं. ह्याचा आणखी एक असा प्रकार आहे कीं, आपलें अंग थोडेसें कोठें जळलें कीं, कातडी, हाडें इत्यादिकांस विकार होतो. कधींकधीं तर त्यामुळें सर्व अवयवचे अवयव नाहींसे होतात. पण ते असे लुप्तप्राय झाले, तरी ते पुन्हा जीव धरतात. ते स्फीनिक्स् पक्षीच असतात कीं काय!

आणि स्थानिक मरणावर तर आपलें जीवित अवलंबून असतें. आतां, सर्वसाधारण मरणाकडे वळूं. तें दोन प्रकारचें असतें. एक शरीराचें, व दुसरें तंतूचें. शरीराचें सर्वसाधारण मरण ह्मणजे जेव्हां त्याचे सर्व व्यापार बंद होतात, तेव्हां जें त्यास येतें तें. पण शरीर मृत झालें, तरी ज्ञानतंतू व स्नायु हे बराच वेळपर्यंत जिवंत असतात. आतां मरण कसें येतें याचा विचार करूं. तें येण्यास निरनिराळीं कारणें असतात. त्यांपैकीं मुख्य तीन आहेत. पहिलें ह्मटलें ह्मणजे ज्ञानतंतूंचें मंडळ जो मेंदू त्याच्या तंतूंचें तुटणें हें होय. दुसरें हें कीं, फुफ्फुसाचा व्यापार अस्खलित न चालणें. तिसरें व अखेरचें हें कीं, छातींत विकार होणें. ह्मणून या तीन मुख्य अवयवांस इंग्रजींत Tripod of Life (आयुष्याची तिवई) असें ह्मणतात. जीव जातांच देहाची अशी अवस्था होते कीं, प्रथम प्राणवायूचा शरीरावर व्यापार घडूं लागतो व तें कुजूं लागतें. त्यांतले जे कोमल भाग असतात त्यांतून ॲमोनिया, कार्बानिक ॲसिड् गॅस, पाणी व क्षार बाहेर येऊं लागतात. व कालांतरानें पुरलेल्या शरीराचे कठीण भाग हवा व पाणी यांनीं झिजून अखेर तन्मय होतात. व आपल्या कृतीवरून विचारी मनास असा बोध करितात कीं Dust thou art, aud unto dust shalt thou return, इस तनधनकी कोन बढाई, इत्यादि!

२. दुसरा प्रश्न असा कीं, नीतिशास्त्रदृष्टीनें मरण कशास ह्मणावें. आपले पुराणग्रंथ ह्मणजे नीतिशास्त्राचे हिमालयच आहेत! त्यांतील गौरीशंकरादिकांसारख्या उच्च शिखरावरून या विषयाचा उदात्त व हृदयंगम देखावा कसा दिसतो तो पाहूं. महाभारतासारख्या महाकाव्यांत एके ठिकाणी असें ह्मटलें आहे कीं-

मृतो दरिद्रः पुरुषो मृतं राष्ट्रमराजकम् ।
मृतमश्रोत्रियं श्राद्धं मृतो यज्ञस्त्वदक्षिणः ॥

(दरिद्री मनुष्य, राजाशिवाय राष्ट्र, उपाध्यायाशिवाय श्राद्ध व दक्षिणेशिवाय यज्ञ हे मृत ह्मणजे व्यर्थ होत.

आतां, दरिद्री मनुष्याची परिस्थिति त्यास अनुकूल नसल्यामुळें त्याचे बेत जेथल्या तेथेंच विरून जातात; ह्मणून तो जिवंत असून मृतवत् असतो हें सर्वश्रुत आहे. आपल्यांतील " सर्वारम्भास्तण्डुलप्रस्थमूलाः " ह्या ह्मणीचें महत्व लक्षांत आणिलें ह्मणजे ग्रे कवीच्या पुढील रसभरीत ओळींची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं. त्या ओळी मी मराठींत अशा आणिल्या आहेतः--

साकी.

घोर दरिद्रावस्था त्यांच्या अडविल उत्साहास!
मनिंचे हेतू जिथल्या तेथें! व्यर्थ सर्व आयास!

दुसरें असें कीं, राजाशिवाय राष्ट्र ह्मणजे सुकाण्याशिवाय होडी यासारखेंच जवळ जवळ आहे. तसली होडी एखाद्या खडकावर केव्हां आपटेल याचा नियम नसतो; तद्वत् लोकनायक असल्याशिवाय सामान्यजनसमूहास नीट वळण न मिळाल्यामुळें, राष्ट्रांत जिकडे तिकडे झोटिंगबादशाही माजेल; व तें लवकरच नाश पावेल.

अखेरच्या दोन गोष्टींविषयीं विशेष भानगड नाहीं.

याशिवाय आणखी कोणकोण मृत आहेत त्यांचा कृष्ण शास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या प्रश्नोत्तरावलींत उल्लेख केला आहे. तो असाः-

असुनि जिवंतहि मेला कोण? असे जो सदा निरुद्योगी।
उत्साहरहित ज्याचें मन किंवा जो असे सदा रोगी॥

निरुद्योगी मनुष्य मृत आहे एवढेंच समजून चालावयाचें नाहीं. तर मधमाशीप्रमाणें समाजानें त्यानें उच्चाटन केलें पाहिजे. एकाच्या निढळत्या घामाचें फळ दुसऱ्यानें हातावर हात व पायावर पाय ठेवून खुशाल सेवन करावें हें सध्याच्या मनूंत तरी मनुष्यास शोभत नाहीं. सध्यां प्रत्येकानें कंबर कसून दोन हात असे दाखविले पाहिजेत कीं हिम्मतबहाद्दरास पण वाटावें कीं आपलें बदन तन्दुरस्त आहे! रोगी मनुष्यास पूर्वी मृत मानलें होतें तरी त्याचें पालनपोषण केलें पाहिजे. असें याज्ञवल्क्यस्मृतींत सांगितलें आहेः-

क्लीबोऽथ पतितस्तज्जः पंगुरुन्मत्तको जडः ।
अंधोऽचिकित्सरोगाद्या भर्तव्याः स्युर्निरंशकः ॥

(नपुंसक, धर्मभ्रष्ट, त्याची प्रजा, पांगळा, वेड लागलेला, जन्मापासून अक्कलशून्य, अंधळा, असाध्यरोगी इत्यादि वारस नसल्यामुळें अन्नवस्त्राचेच अधिकारी आहेत.)

आणखी कोण मृत गणला आहे तें पाहूं. सभ्य गृहस्थाचा पाणउतारा त्याचे प्रतिस्पर्ध्याकडून झाला ह्मणजे तो मरणप्राय होतो. कारण, त्यास अब्रूची चाड मोठी असते. या उदात्त नैतिक नियमास अनुसरून गीताकारांनीं जें ह्मटलें आहे तें यथार्थ आहे. तें काय? तर ' संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते । '

३. तिसरा प्रश्न असा कीं, तत्वज्ञानदृष्टीनें मरण कशास ह्मणावें ? याविषयीं गीतेंत असें ह्मटलें आहे कीं, आपण जुने कपडे टाकून नवे अंगांत घालतों, तसें जुना देह टाकून नवा देह धारण करणें या विक्रीस मरण असें ह्मणतात. यासंबंधीं गीतेंतील श्लोक येणेंप्रमाणें आहे:—

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरो ऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥

भर्तृहरि राजानें मनुष्यास नटाची उपमा देऊन त्याचें मरण ह्मणजे पडद्यांत जाणें असें लेखिलें आहे तें किती सार्थ आहे! तेव्हां ती अमोल कल्पना जशीच्या तशीच येथें देणें गैर नाहीं. ती अशी:—

क्षणं बालो भूत्वा क्षणमपि युवा कामरसिकः
क्षणं वित्तैर्हीनः क्षणमपि च संपूर्णविभवः ।
जराजीर्णैरङ्गैर्नट इव वलीमंडिततनु-
र्नरः संसारान्ते विशति यमधानीजवनिकाम् ॥

आश्चर्याची गोष्ट ही कीं, आंग्ल महाकवि शेक्सपियर यासही अशीच कल्पना आली होती. त्यानें आपल्या As you like it (' तुझ्या मर्जीस येईल तसें ! ') नामक नाटकांत जो कथाभाग आणिला आहे, त्याची मराठींत प्रतिकृति मीं अशी केली आहेः—

पृथ्वी.

विशाळ जग हें असें खचित रंगभूमी पहा।
तयांत नरनारि या विलसती नटासारिख्या।
प्रवेश करिती किती ! कितिक आंत जाती अहा।
मनुष्य जगतामधीं कितिक रंग दावी अहा ! ॥ १ ॥

गीति.

आईच्या कुशिमध्यें क्यंहा करूनी स्तनासि तो झोंबे।
नंतर गुरगुरणारा विद्यार्थी तो कसा अहा शोभे ! ॥ २ ॥
नंतर नादीं लागे मीनाक्षींच्या बनूनि तो रसिक।
असनीं, शयनीं, भोजनिं जाळी खुळि ती व्यथाचि मानसिक ॥ ३ ॥
नंतर शिपाइ बनुनि, मानी अब्रूस फार तो थोर—
तोफेजवळहि ठाकुनि जीवाविषयीं बनेचि बेफिकिर ॥ ४ ॥
नंतर गंभीराकृति न्यायाधिश तो बने किती शांत।
उपदेश हा परोपरि सांगे सर्वांसि तोचि अश्रांत ॥ ५ ॥
नंतर अखेर त्याचीं अंगें गळतीं ! खुळेंहि त्या जडतीं ॥
तेव्हां विवेक कोठुनि ? बोबडी वळते कितिक ती अंतीं ॥ ६ ॥

कोणी कोणी तर मरण ह्मणजे ईश्वराच्या घरचें चुकवितां न येणारें असें (बोलावणें) वारंट आहे असें ह्मणतात. याचें कारण ते असें सांगतात कीं, जन्मास येणें ही गोष्ट जशी प्राण्याचे हातची नाहीं, तशीं हें जग सोडून जाणें ही गोष्ट पण त्याचे आधीन नाहीं. तेव्हां ज्यानें आपणास जन्मास घातलें, त्याचे हातून आपला बरावाईट शेवट होणें आहे, ही समजूत वाजवी आहे असें तें मानितात. गीतेंतहि असेंच एके ठिकाणीं ह्मटलें आहे ' जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च '

एका नामांकित इंग्रेजी तत्ववेत्त्यानें अशाच अर्थाचे उद्गार काढिले आहेत. पण त्याचे दाखले मोठे खुबीदार आहेत. तो ह्मणतो कीं, ही पृथ्वी ह्मणजे एक लिहावयाची पाटी आहे व मनुष्यें ह्मणजे तीवर उतरलेल्या टिपा आहेत. पहिल्या टिपांनीं ही पाटी भरली कीं त्या पुसून, दुसऱ्या घ्याव्या. जे आपल्या अगोदर गेले आहेत, त्यांनीं आपल्याकरतां येथें जागा मोकळी करून दिली आहे, व आपल्या मागून जे येतील, त्यांना तशी जागा आपण मोकळी करून देण्यांत कां खेद मानावा? पुराणसंग्रहालयांतील वस्तू पाहिल्यावर पडदा पडतो, व ज्या प्रेक्षकाची पाळी झाली असेल, त्यांना आंबट तोंड करून, मागाहून येणाऱ्यांकरतां जागा कां खाली करावी लागते? तसेंच, सृष्टिकर्त्या परमेश्वरानें आपणास 'बहुरत्ना वसुंधरा' दाखविल्यावर आपला नियमित काळ सरतांच, ती सोडून जातांना आपलें मन कां दुखावतें? या आंग्लदेशीय तत्ववेत्त्याच्या प्रश्नावलीस आपल्याकडील एका महाराष्ट्र कवीनें सुरेख उत्तर दिलें आहे—खरा तत्ववेत्ता व खरा कवी यांत विशेष फरक नसतो, कारण, दोघांचाहि मुख्य उद्देश एकच असतो, तो एवढाच कीं, सृष्टींतील धीरोदात्त व रमणीय वस्तूंचा शोध करून त्यांचें यथार्थ वर्णन करणें. तुकाराम बोवा ह्मणतात कीं, प्राणाची देहावर माया बसलेली असते; ह्मणून या जड देहास सोडून जातांना प्राण्यास वाईट वाटतें. त्यांचा अभंग असा आहे:—

धेनु चरे वनांतरीं। चित्त बाळकाचे घरीं ॥ १ ॥
तैसें करी वो माझे आई। ठाव देउनि राखे पायीं ॥ २ ॥
काढितां तळमळी। जीवनाबाहेर मासोळी ॥ ३ ॥
तुका ह्मणे कुडी। जीव प्राणाची आवडी ॥ ४ ॥

आतां मरण कोणास व कोठें चुकलें आहे काय? काशीस जा कीं रामेश्वरास जा; मक्केस जा कीं मदिन्यास जा; जरूसलेमास जा कीं रोमास जा; तुह्मांला अमरपट्टा मिळालेला मनुष्य सांपडेल काय? नाहीं. एवढा सद्गुणी व कीर्तिमान् नळ राजा; पण त्यास या गोष्टीनें

भान न राहून व आपणास अमरपट्टा असें समजूनच कीं काय, तो त्या हंसास मारूं लागला! त्यानें त्या बिचाऱ्या पक्ष्याच्या गळयास फांस घालण्याचा बेत केला! तेव्हां काय चमत्कार पहा कीं, त्या यःकश्चित् पांखरास मनुष्यवाणी फुटली. व त्यानें त्याच्या अज्ञानावृत बुद्धीस ताळ्यावर आणिलें. तो भाग रघुनाथ पंडितांनीं यथार्थ वठविण्यांत आपलें बुद्धिसर्वस्व खर्चिलें आहे. तो येणेंप्रमाणें:—

बघुनि माझी हे कनक रूप काया।
कटक-मुकुटादिक भूषणें कराया।
कशी आशा उपजली तूज राया।
काय नाहीं तूजला दया माया।

म्हातारी उडतां नयेचि तिजला माता मदीया अशी।
कांता काय वदों नव-प्रसव ते साता दिसांची तशी।
पाता त्या उभयांस मी, मज विधी घातास योजीतसे।
हातांमाजिं नृपा, तुझ्या गवसलों आतां करावें कसें।

यावरून एवढेंच ध्यावयाचें कीं मनुष्यानें ताठ्यानें न वागतां, आपल्या परिस्थितीकडे लक्ष्य ठेविलें पाहिजे. आपण ज्या जमिनीवरून चाललों आहों, ती जर बुळबुळित असेल, तर अंमळ सावकाश व विशेष सावधगिरीनें रहावें. ही पृथ्वी म्हणजे आपलें कायमचें ठाणें नाहीं, आपण येथें केवळ यात्रेकरूं आहोंत हें मनांत वागवून, तदनुरूप वर्तन ठेवावें. व

मना, पाहतां सत्य हे मृत्यु–भूमि,
जिता बोलती सर्वही जीव मी मी।
चिरंजीव हे सर्वही मानिताती।
अकस्मात् सोडोनिया सर्व जाती।

हें रामदास स्वामींचें तत्व सदा हृत्पटलावर प्रत्येकानें कोरून ठेवावें! आपल्या देवताशंकरासारखे तपस्वी, एवढ्याच करतां, स्मशानवास

अंगीकारीत असत. नरदेहाची स्थिति मनुष्याच्या रात्रंदिवस चाललेल्या घडामोडी, आत्मोन्नति व परग्लानि या राजधोरणांचा उत्कर्ष, इत्यादि गोष्टींचा प्रत्यय मानसिक दृष्टीस येथेंच चांगलाच येतो. इंग्रजींतील महाकवि शेक्सपीयर तर जगास इतका विटला होता कीं, त्यानें आपल्या 'मृत्यु--विजय' नामक कवितेंत जे उद्गार काढिले आहेत, ते मी मराठींत असे आणिले आहेतः—

गीति.

माझ्या मृत्यूनंतर, नका करूं शोक, हो, वृथा माझा ।
नीच जगांतुनि काया जाइल खातील तिस किडे समजा !

शेक्सपीयरच्या पाठीस पाठ लावून येणारें कवितादेवीचें दुसरें पुत्ररत्न जो मिल्टन्, त्यानेंदेखील आपल्या स्वाभाविक धीरोदात्त वाणीनें मृत्यूस उद्देशून असें ह्मटलें आहे कीं, 'कुठें आहे, मृत्यो, प्रखर तुझि नांगी तरि सख्या?' ग्रे कवीनें अशाच चिंतनांत सात वर्षें घालवून, आपलें जगद्विख्यात शोकगीत (Elegy) स्मशानांतच रचिलें. 'हार्वे' यानें तर 'शवगर्तेचें चिंतन' ह्मणून एक मोठा ग्रंथ रचिला आहे. व 'शेले' नामक कवीनें 'उच्चनीचभावनाशक मृत्यु' या कवितेंत जे कांहीं उद्गार काढिले आहेत, त्यांतला सारांश तर अत्यंत हृदयंगम आहे. तो मी मराठींत आणण्याचा असा यत्न केला आहे-

शिखरिणी.

खडाजंगी नंगी कितिक समशेरीस धरुनी,
करीती शत्रुला चित, धरिति ही हावचि मनीं ।
अशा वीरांनाही मरण चुकलें नाहिं बरवें ।
अकालीं वा कालीं धरुनि गिळि त्या हें न बघवें ॥ १ ॥
फुलांच्या माळा या खुलति जरि देहावरि तुझ्या,
अहा कोमेजूनी न कधिं कथिती कीर्तिस तुझ्या ।
पहा मोठा कैसा नर, धरणिचें रत्न, बळि हा ।
पडे मृत्यू-तोंडीं! घम घम सुटे वास अहहा ॥ २ ॥ —

सत्कर्म–योगें वय घालवूनी । तो देतसे हाचि धडा अजूनी ॥
पिढी तयाची गिरवूनि तो रिझे । कृती, फुलांच्या सम, ही शिरीं वसे ॥३

मराठी भाषेची भगिनी जी हिंदी भाषा तिचा प्रियपुत्र तुलसीदास यानें पण असाच खासा दोहरा ठोकून दिला आहे. तो येणेंप्रमाणें.

सूरतसे कीरत बडी । बिन पंख उड जाय ।
सुरत तो जाती रही । कीरत कबू न जाय ॥

माझे गुजराथी गुरु व व्यवसायबंधु रा० गोविंद विष्णु वर्तक यांनीं मला एका गुजराथी कवीचा सुंदर उतारा दिला आहे. तो झाडून, मग ही कविवृत्ति सोंपवितों :—

कुंभकाचो काय जावरी । जोइने करो ने जतन ।
वणसतां वार लगे नहि । राखो रूडु रतन ॥
भूल्यो मन भ्रमरा ॥ ध्रु ॥
माणसनी आशा डुंगर जेवडी । मरण परालगी हेर ॥
मोठे मोठे मरी चालिया । लाखों लखपति शेट ॥
भूल्यो मन भ्रमरा ॥ १ ॥
केना छोरू केना वा छरू । केना माय ने बाप ॥
अंतकाळे जवूं एकला । साथे पुण्यने पाप ॥
भूल्यो मन भ्रमरा ॥ २ ॥

जसें कांचेचें भांडें (ठिसूळ) असतें, तशी ही काया आहे. हिची जतन काळजीनें करा. हिचा नाश होण्यास वेळ लागत नाहीं. चांगलें वर्तन ठेवा. हे मनरूपी भ्रमरा तूं भुलला आहेस!

माणसाची आशा डोंगराएवढी असते! मरण तर आपल्या पायांखालीं ठेवलेलें असतें! मोठेमोठे लाखों लक्षपति शेटसावकार मरत आहेत! हे मनरूपी भ्रमरा तूं भुलला आहेस!

कोणाचीं मुलेंबाळें? आणि कोणाची आई आणि बाप? अंतकाळीं एकटेंच जावयाचें आहे! बरोबर कायतें पुण्य आणि पाप हेंच यावयाचें आहे! हे मनरूपी भ्रमरा तूं भुलला आहेस!

असे असंख्य महात्म्यांचें असंख्य उद्गार आहेत. ते कोणी एके ठिकाणीं देऊं ह्मणेल तर तो फसेल; कारण, पूर्वींच्या ' शतायुर्वै पुरुषः ' या नियमाप्रमाणें जरी मनुष्याचें आयुष्य शंभर वर्षें धरलें, तरी ज्ञानोदधि मुळीं अनंत आहे. तेव्हां वर आलेलीं उदाहरणें तूर्त पुरीं आहेत.

एकंदरींत, मनुष्यास मरणाचें भय आहे, तरी कीर्ति अमर आहे, असें जाणून तो ती मिळविण्याची उत्कट इच्छा बाळगतो. व आपल्याकडे तर तिचा इतका अतिरेक अलीकडे झालेला दिसत आहे कीं, आपल्यांतल्या विद्वद्रत्नांस व्यायाम, ब्रह्मचर्य इत्यादि सोन्यासारख्या संवयीवर लाथ मारून अल्पायुषी होण्याची पाळी आलेली आहे; ही गोष्ट कै० न्यायमूर्ति रानडे यांसारख्या समाजधुरंधराच्या ध्यानांत आली आहे. एवढी दुःखांत सुखाची गोष्ट आहे!

४. चौथा प्रश्न असा कीं, मरण सुखानें कसें येतें? मरण कोणास चुकवितां येणारें नाहीं, मरणासमयीं मानसिक व शारीरिक वेदना असह्य असतात, व जिवाची जी काय धांदल उडते ती ज्याची त्यास ठाऊक; या गोष्टी जरी खऱ्या आहेत, तरी त्यामुळें मरणास डगमगून न जातां इतर सामान्य गोष्टींप्रमाणें तें लेखण्याचें मनास शिक्षण मिळाल्यानें, तें शांत व कार्यक्षम होतें. तेव्हां, असल्या मानसिक शिक्षणाचीं काय अंगें आहेत, त्यांचा विचार करूं. तीं अंगें येणेंप्रमाणें :—

(अ) कर्तव्यतत्परता.

(ब) भावी वार्धक्याचे अगोदर वैराग्यवृत्ति.

(क) ईश्वरावर विश्वास.

(ड) दान.

(अ) आतां पहिलें अंग जी कर्तव्यतत्परता, त्याकडे वळूं. मनुष्य जर वेळच्या वेळीं आपलें कामकाज चोख करील, तर या शहाजोग वर्तनानें त्याच्या मनास कोणत्याहि प्रकारची हुरहूर न लागतां, तें सदा सुप्रसन्न राहील; व त्यास कशाची धास्ती वाटणार नाहीं. या ह्मणण्याचा प्रत्यय आपणास लष्करी पेशाच्या लोकांत व साधुसंतांचे मेळ्यांत सहज

येतो. दोन सैन्यें एकदां एकमेकाशीं झुंजू लागली कीं, तीं आपल्या जागा कायम ठेवतात, मग दाणा, पाणी, व रसद हीं तितक्यापुरतीं बंद झालीं, तरी त्यांना त्यांची विशेष फिकीर वाटत नाहीं. युद्ध मातबर चाललें, तरी कोणी एकांडा किंवा पायदळ माघार घ्यावयाचा नाहीं; उलट, सर्व मरून फौज बुडेपर्यंत तो हुशारीनें लढतच राहील! या गोष्टीचें आपणास कौतुक वाटतें खरें; पण जर एखाद्यानें गोटांत चाकरीच पत्करली, तर बरोबरीच्या शिपाईमंडळीच्या संगतीनें त्यांच्याहि अंगीं एका प्रकारचें कृत्रिम शौर्य व धैर्य येतें. तो असें पाहतों कीं, आपल्या देखत देखत आपल्यांपैकीं कित्येकजण कामास येत आहेत; कित्येकजणांनीं सती-वाण घेतलें आहे; त्यांत कित्येकजणास लढाईंत सफाईनें फत्तेहि मिळत आहे; व अशा रणरंगधीर वीरांच्या संगतीनें आज आपण जसें बचावलों आहों, तसें उद्यांच्या लढाईंतहि बचावलें जाऊं असा त्याचा धीर चेपत जाऊन, त्यास वेळोवेळीं नवीन उमेद येत असते. शिवाय, असें असतें कीं, लढवय्ये शिपायांस खुशालचंदींतहि काळाचा व्यय यथास्थित करावयास सांपडतो, व हें तर बहुधा सर्वांस आवडतें. आतां जे खरे रणपटु असतात, त्यांची मात्र अशी गोष्ट नसते. ते असा विचार करीत असतात कीं, पुष्कळ दिवस वांचण्यांपेक्षां पुष्कळांचें कल्याण करणें बरें; आपल्या मनाप्रमाणें आपणास यश मिळेल न मिळेल, तरी लढेल तो पडेल यांत कांहीं विशेष नाहीं; व कर्तव्यकर्म बजावीत असतांना कामास येणें, हें स्वतास व स्वदेशास श्रेयस्कर आहे:—

चुके यमाची न कधींहि हांक ।
कीर्ति तरी कां मळवूं नहाक ॥

बा० अ० भिडेकृत ‘ पद्मिनी ’

लष्करी खात्यांतील लोकांपेक्षांहि विशेष कर्तव्यतत्परता साधुसंतमंडळींत दिसून येते. जसे पदार्थविज्ञानशास्त्री मूर्तसृष्टीमधील नवे नवे चमत्कार शोधून काढतात, तसे अध्यात्मिकशास्त्री अमूर्तसृष्टींमधील नवे नवे चमत्कार शोधून काढतात. या अलीकडल्या शोधांची योग्यता

कांहीं वेगळीच आहे. त्यांचा संबंध मानसिक उन्नतीशीं विशेष असतो. तिचा सारांश एके ठिकाणीं असा दिला आहे:—

अहिंसा प्रथमं पुष्पं पुष्पमिंद्रियनिग्रहः ।
सर्वभूतदया पुष्पं क्षमा पुष्पं विशेषतः ॥
ज्ञानपुष्पं तपःपुष्पं ध्यानपुष्पं तथैव च ।
सत्यमष्टाविधं पुष्पं विष्णोः प्रीतिकरं भवेत् ॥

(अहिंसा हें पहिलें फूल; इंद्रियनिग्रह हें दुसरें; सर्व प्राणिमात्रांवरील दया हें तिसरें; क्षमा हें चौथें; ज्ञान हें पांचवें; तप हें सहावें; ध्यान हें सातवें; व सत्य हें आठवें; यांनींच विष्णु प्रसन्न होतो.)

अशी ज्यांची वृत्ति बनली आहे, ते मग आर्य, ग्रीक, रोमन, यहुदी, ख्रिस्ती, मुसलमान, पारशी, बौद्ध किंवा कोणीहि असोत, त्यांच्या तोंडून मरणाची बेअदबी झाली, तरी त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. कारण, ते आपलें घडोघडीचें कर्तव्यकर्म करून बसलेले असतात. तेव्हां मृत्यु आपली लांडगेतोड केव्हां करील याची त्यांस काळजी नसते. उलट, जो तो साधु आपल्या मनांत ह्मणत असतो कीं,

विशुद्धस्य हि मे मृत्युः पुत्रजन्मसमः किल ।

(ब) दुसरें अंग ह्मणजे भावी वार्द्धक्याचे अगोदर वैराग्यवृत्ति धारण करणें हें होय. आपल्यांत बालविवाहाची चाल जशी समाजघातक आहे, तशीच किंबहुना त्याहूनहि अधिक नुकसानकारक चाल ह्मटली ह्मणजे जरठोद्वाह ही होय. या विषयावर बरीच चर्चा आजवर झालेली आहे व अजून चालूहि आहे. तरी पण आश्चर्य हें कीं या दिशेनें आपल्या समाजाचें पाऊल पुढें पडावें तसें अद्यापि पडलें नाहीं; आणि ह्मणूनच रा. देवलांसारख्या अलीकडील लोकप्रिय नाटककारास आपल्या ‘ शारदे ’ च्या द्वारें याविषयासंबंधी लोकांची कानउघाडणी करावी लागत आहे! एखाद्या वयोवृद्ध मनुष्यानें नवरदेव बनून, शिकस्त झाली तर, बारा तेरा वर्षांच्या नवीन मीनाक्षी वधूबरोबर विषयसेवनांत आपलें आयुष्यक्रमण करण्याची उत्कट इच्छा बाळगणें

ह्मणजे खरोखर अत्यंत अशक्य व निंद्य आहे! त्यानें कितीहि वाजीकरणोपचार केले, तरी तशानें आपणास तारुण्यांतील शक्ति पुन्हा येईल असें समजणें ह्मणजे, एखाद्या बाळंभट्टानें, तुकारामानें, कैकंडासिंगानें, किंवा हैमजीखानानें ऑस्ट्रेलियन घोड्यास किंवा अमेरिकन गव्यास हटविण्याची हाव धरण्याप्रमाणेंच आहे! जी विषयवासना तारुण्यांत अनावर असते, व जी बरीच पुरविण्याची त्यावेळीं अंगीं ताकद असते, ती वार्द्धक्यांत जरी उसळ्या मारूं लागली, तरी ती शमविण्याचें सामर्थ्य अंगीं राहिलेलें नसतें; उलट, उतारवयांत विषयवासनेस दाबून टाकण्यापुरती विवेकबुद्धि प्रबल असते. तेव्हां, तसला ह्मातारचळ सर्वथैव वर्ज्य आहे. महाराष्ट्र-कवि-शिरोमणि मोरोपंत यांस ही नड ढळढळीत दिसत होती; ह्मणूनच आपणास ह्मातारपण येण्यापूर्वींच वैराग्यवृत्ति धारण करण्यास ते जे उतावळे झाले होते, तें त्यांचें वर्तन किती अनुकरणीय व अतएव वंद्य आहे! यासंबंधीं त्यांची प्रख्यात केका अशी आहे.—

कृतान्त—कटकामल—ध्वज—जरा दिसों लागली ।
पुरःसर-गदां—सवें झगडतां, तनू भागली ।
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा ।
न हों जरि उताविळा, स्व-रिपु कापितो हा गळा ।

---

१. ग्वाल्हेर संस्थानांत ब्राह्मणज्ञातींतील या पेहेलवानीचा अशी अद्याप ख्याति आहे कीं, तो मोठ्या मस्त बैलाचे चार पाय धरून त्यास जमिनीवरून उंच उचलून दूरवर नेत असे!

२. या अतुल मराठी मल्लाची अजब कृति पाहण्याचा प्रसंग मला गेल्या वर्षी आला होता. तो दूर अंतरावरून धांवत धांवत येऊन एका मस्त एडक्याशीं टक्कर खेळला व दुसरेहि असेच अद्भुत शक्तीचे खेळ सहज दाखवून सर्वांचे तोंडून शाबासकी मिळविता झाला!

३. हा पंजाबी पेहेलवान् लाहोर शहरींच नव्हे, तर सर्व उत्तर हिंदुस्थानांत भीमाचा अवतार ह्मणून प्रख्यात आहे!

४. ही पुण्यांतील लंगोटबंद असामी सर्व महाराष्ट्रांत विश्रुत आहे.

(क) तिसरें अंग म्हणजे ईश्वरावर विश्वास ठेवणें हें होय. माझे वयोवृद्ध व सामान्य धर्माधिकारी वेदमूर्ति बाळकृष्ण शामभट वर्तक हे म्हणतात कीं,

यमो निहन्ता पितृधर्मराजो वैवस्वतो दंडधरश्च कालः ।
भूताधिपो दत्तकृतानुसारी कृतान्तमेतं दशभिर्जपन्ति ॥

(यम. मारणारा. पितृराज. धर्मराज. सूर्यवंशी. दंड करणारा. काल. प्राणिमात्रांचा प्रभु. दान व कर्म हीं पाहून न्याय देणारा. अन्त करणारा. अशा दहा नांवानीं यास जपतात.)

हा मंत्र नुसता श्रावणींतच जपावा असें नाहीं; तर तो, गायत्रीमंत्राप्रमाणें, नित्यांतल्या ब्रह्मकर्मांतहि ओढण्यासारखा आहे; पण आजकाल असें आहे कीं, ' क्षणं वित्तं क्षणं चित्तम् ' म्हणून, त्याचें माहात्म्य पण तितकेंच उरलें आहे. अशा नियमाची अवश्यकता जशी आपल्या मान्य पूर्वजांस वाटली, तशी इतर धर्मबंधूंसहि ती वाटली आहे. १८९२ च्या राष्ट्रीयसभेंतील भाषणांत मुनशी उमराव मिर्झा हैरात यांनीं असेच उद्गार काढिले आहेत. इतकी दूरची भरारी मारणें नसेल, तर Father William (विल्यिम्बाबा) ही कविता, सेलसाहेबांचें कुराण, डा० काण्यांचें गौतमबुद्ध, इत्यादि पुस्तकें पहावींत म्हणजे वरील म्हणण्याचा प्रत्यय येईल. आतां आपला मृत्यु कधीं व कसा येणार हें जरी प्रत्येकास अवगत नसतें, तरी प्रत्येकानें त्याबद्दल विशेष आतुर असावें असें माझें म्हणणें नाहीं. कारण होणारी गोष्ट प्रत्येकास माहीत नसते, तरी सर्वज्ञ परमेश्वरास ती माहीत असते; व मरणसमयीं त्यानें आपणास धीर देण्याविषयीं आपण त्याची करुणा निरंतर भाकणें अत्यंत अवश्य आहे. एतदर्थ वामनपंडितांनीं असें म्हटलें आहे कीं,

अहो देतां, घेतां, बसत, उठतां, कार्य करितां ।
अहो जातां, येतां, वदनिं वदतां, ग्रास गिळतां ॥
घरीं, दारीं, शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं ।
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करी ॥

(ड) वरील तिन्हीं अंगें ह्मणजे कर्तव्यतत्परता, वार्द्धक्याचे अगोदर वैराग्य, व ईश्वरावर विश्वास हीं ज्यानें संपादिलीं आहेत, त्यास चौथें अंग जें दान, त्याची मोठीशी मातबरी आहे असें नाहीं. तरी पण अंतकाळीं मनुष्याचे हातून अन्नदान, वस्त्रदान, गोदान किंवा किंचित् व्यावहारिकद्रव्यदान तरी व्हावें; अशी बहुतेक धर्मांतील लोकांची समजूत आहे. आपण असें समजतों कीं, 'दानं मित्रं मरिष्यतः' (मरणाऱ्या मनुष्याचें दान हा एक कोणी मित्रच आहे). पारशी लोकांची तर, दानधर्मानें प्रसन्न होणारी एक उपदेवता आहे. मुसलमानांत खैरातीचे माहात्म्य असेंच जबर आहे. ख्रिस्ती लोकांतही मठांस जामिनी, देणग्या वगैरे देतात, त्या याच उद्देशानें होत.

९. आतां, पांचवा व अखेरचा प्रश्न ह्मणजे मरणानंतर आपलें काय होतें तें पहाणें उरलें आहे. आपलीं उपनिषदें, शांकरभाष्य इत्यादि महान् महान् पूज्य प्राचीन ग्रंथांतून या महत्वाच्या प्रश्नाचा विचार जितका खोल केलेला आहे, तितका फार थोड्याच ग्रंथांतून आढळतो. एवढेंच नाहीं, तर बऱ्याच मोठमोठाल्या ग्रंथकारांची येथें पांचावर धारण बसून, त्यांना जमिनींवर हात टेंकण्याची पाळी आलेली आहे!

असो. मरणोत्तर आपलें काय होतें या प्रश्नाचा विचार करणें ह्मणजे 'कर्म-मत' काय आहे हा प्रश्न सोडविण्यासारखें आहे. तेव्हां आपण आतां कर्म-मताकडे वळूं. पदार्थविज्ञानशास्त्राचा असा नियम आहे कीं, पदार्थ जितके जितके हलके असतात, तितका तितका त्यांवर गुरुत्वाकर्षणशक्तीचा परिणाम कमी होतो. हाच नियम आध्यात्मिकशास्त्रासही लागू आहे. आपल्या ओढाळ मनांत जितके जितके ऐहिक विचार कमी, तितका तितका त्याचा या मर्त्य लोकांकडे ओढाही कमी, हेंच तत्व. 'अन्ते मतिः सा गतिः' [मरणकालीं (मनुष्याची) जशी मति असते, तशी (त्यास पुढें) गति मिळते] या सिद्धान्तांत प्रतिपादन केलें आहे. व गीतेंत पण अशाच अर्थाचा श्लोक आहे कीं,

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ।
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥
—अध्याय ८—६

दररोज रात्रीं निजण्यापूर्वीं, एकदोन तास पारमार्थिक विचारांत घालविल्यानें मोठा लाभ होतो. दिवसांतील संसाराच्या गोष्टींचें विस्मरण पडून, आपण तेवढा वेळपर्यंत अगदीं नवीन व उदात्त मनःसृष्टींत संचार करतों. व या गोष्टीचा असा परिणाम होतो कीं आपलें मन पुढें झोंपेंत विषयवासनेसारख्या तुच्छ विषयाकडे उड्डाण करीत नाहीं! आपण सुखें निद्रा करतों! व ' मनीं असे, तें स्वप्नीं दिसे, या प्रचारांतल्या ह्मणींत बराच तथ्यांश आहे असें प्रत्ययास येतें. हेंच तत्व लक्ष्यांत आणून, आपल्यांतले महामुनी असा नियम पाळीत असत.

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥
गीता २-६९.

(सर्व प्राणिमात्रांची जी रात्र असते, तींत इंद्रियनिग्रह करणारा पुरुष जागा असतो. जेव्हां प्राणिमात्र जागे असतात, तेव्हां (त्या) विचारी मुनीची ती रात्र असते.) हेंच तत्व अजून थोडेंबहुत दृष्टोत्पत्तीस येतें. वयोवृद्ध मनुष्यें अद्याप निजण्यापूर्वीं भजन करतात; आयाबाया मनांतल्या मनांत व कांहीं अर्धेंमुर्धें बाहेर येईल असें पुटपुटतात!

पड पड कुडीं
गंगाभागिरथीं!
अयागीं मरणं
प्रयागीं जाणं
(काशीविश्वेश्वरा) तुज नित्य दर्शन!

शास्त्री गंभीर स्वरानें असा एखादा दुसरा श्लोक ह्मणतात.

दुराराध्यः स्वामी तुरगचलचित्ताः क्षितिभुजः
वयं तु स्थूलेच्छा महति च पदे बद्धमनसः ।

जरा देहं मृत्युर्हरति सकलं जीवितमिदं
सखे नान्यच्छ्रेयो जगति विदुषोऽन्यत्र तपसः ॥

असो. आतां रोजच्या झोंपेकरतां जर अशी तजवीज, तर मरण ह्मणजे जी कुंभकर्णी झोंप तिच्याकरतां केवढी तजवीज पाहिजे. ह्मणून साधारण समाजांत एक रूढीचा भाग होऊन राहिला आहे कीं, मनुष्य मरणास टेंकला, ह्मणजे त्याचे तोंडून ईश्वराचें नामस्मरण होण्याची शक्ति बहुतेक नसते; तर जवळ संचार करणारे आप्तइष्ट प्रसंगावधान ठेवून, त्यास ऐकूं जावें या उद्देशानें 'राम! राम!' ह्मणतात! कोणी त्याचे तोंडांत गंगाजळी ओततात; ती अशास्तव कीं गंगेच्या जलानें तरी तो अंतीं शुद्धांतःकरण व्हावा. हे सर्व प्रकार आपापल्या परीनें मनास तितक्यापुरते बाह्य दृष्टीनें तरी धीरोदात्त शिक्षण देणारे आहेत व अतएव स्तुत्य आहेत. तसेंच, मुलगा जवळ असल्यास, त्यानें मरणाऱ्या बापास मांडी देणें किंवा सतीनें आपल्या मरणाऱ्या पतीचे पदकमल सेवीत राहणें, इत्यादि सद्गुणदर्शक पद्धती समाधानकारक आहेत!

इहलोकीं जसा कार्यकारणभाव असतो, तसा तो परलोकीं पण आहे. या जन्मीं आपण जीं कार्यें करीत आहों, त्यांचीं बरीं वाईट फळें आपणास पुढील जन्मीं भोगावीं लागतील, व मागील जन्मांतल्या कार्यांचे परिणाम आपण या जन्मांत भोगीत आहों. तेव्हां, ज्यास आपली देहयात्रा सुलभ व्हावी असें वाटत असेल, त्यानें या तत्वाचे अनुरोधानें सद्गुणी व्हावें ह्मणजे नीतीनें वागावें, सर्वांवर बंधुप्रेम ठेवावें, व दीनांवर दया करावी.

हें उदात्त कर्म-मत ग्रीक, रोमन, पारशी, मुसलमान, इत्यादि अवांतर धर्मांसहि मान्य आहे व सध्यांच्या Theosophy (ईश्वरज्ञाना) चें तर हें आद्य व अग्रगण्य तत्व आहे. कांहीं सर्वमान्य युरोपियन तत्ववेत्त्यांनाहि त्याची महती कळून त्यांनीं तें स्थापित करण्यास मदत केली आहे. बिशप बटलर यानें प्रस्तुत प्रश्नाच्या आस्तिक व नास्तिक या दोन्ही अंगांचा पूर्णपणें विचार केला आहे. त्यांचें असें ह्मणणें आहे

कीं, मरण व मरणाच्या आनुषंगिक गोष्टी यांवरून आपणास असें धरतां येत नाहीं कीं, मरणानेंच आपल्या आत्म्याची इतिश्री होते. कारण, मरणानें आपल्या अंगीं कांहीं स्थित्यंतर होत असेल, तर जिवंत असतांनाहि अशीं स्थित्यंतरें होत असतात. मरणानें जेवढें मोठें स्थित्यंतर होतें, तेवढें मोठें गर्भावस्थेंतून पणांत येईपर्यंत मनुष्यांत होत असतें. जोंपर्यंत मरणाचें स्थित्यंतर जीविताचे स्थित्यंतराहून अधिक मोठें आहे असें स्थापित झालें नाहीं, तोंपर्यंत मरणानंतर आत्मा राहतो किंवा त्यास अमरत्व आहे असें सिद्ध आहे. दुसरें असें कीं, इंद्रियव्यापार बंद असतांना ह्मणजे झोंपेंत, आपणांस स्वप्नें पडतात; यावरून असें निष्पन्न होतें कीं, मरणानें आत्म्याचा अंत होत नाहीं. तिसरें असें कीं, कांहीं असाध्य रोगांत रोगी अखेरच्या घडीपर्यंत चक्क शुद्धीवर असतो; तेव्हां त्या अखेरच्या घडींत ह्मणजे मरणक्रियेंतहि त्याची शुद्धि जाण्याचा संभव नाहीं. आतां आत्मा असतो, यावरून तो राहत असतो हें समजणें साहजिक आहे. दुसरें असें कीं, मूर्च्छा येऊन गेल्यावर, मनुष्य पूर्ववत् शुद्धीवर येतो; तेव्हां, जीवनशक्तीचे व्यापार बंद असतांहि, ती सजीव असते.

जसा आपल्या कृत्यांचा परिणाम आपल्या स्वभावावर घडला व घडत आहे तसा तो घडेलही. मरणानें ह्मणजे त्यांत तूट पडेल अशांतली गोष्ट नाहीं. ह्या आयुष्यांत जसे विचारशक्तीचे ठराविक नियम आहेत, तसेच ते मरणोत्तर असतात असें धरण्यास काडीइतकी हरकत नाहीं. अशा अर्थाचा उल्लेख जॉन् स्टुअर्ट मिल्सारख्या बाणेदार इंग्रेजी तत्त्ववेत्त्यानें आपल्या 'अमरत्व' नामक ग्रंथांत काढले आहेत.

येणेंप्रमाणें, मरणोत्तर आपणास जी बरी वाईट गति मिळणार, ती आपल्या कर्मधर्मानुसार असते आणि ह्मणूनच आपण ह्मणत असतो कीं,

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे भार्या गृहद्वारि जनः श्मशाने ॥
देहश्चितायां परलोकमार्गे धर्मानुगो गच्छति जीव एकः ॥

(धन जमिनींत राहतें. गुरेंढोरें गोठ्यांत राहतात. बायको घराच्या दारांत राहते, इष्टमित्र स्मशानांत राहतात, देह परलोकीं जाण्याकरतां चितेवर राहतो. व जीव हा कायतो एकटा कर्मानुसार निघून जातो.)

चार्लस् वुल्फ या नामांकित कवीसही अशीच कांहींशी कल्पना त्याच्या एकुलत्या एका कवितेंत आलेली आहे; ती मी मराठींत अशी आणिली आहे.

किति दुःखानें शांत मनानें, ठेवियलें त्यां खालीं ।
रक्ताच्या या नद्या वाहती । कीर्ति मिळालि या स्थलीं ।
समाधि त्यांची नाहिं बांधिली । सेना दुःखें जळली ।
वैभव-शेला घालुनि त्यांवरि ठेवियलें त्यां खालीं ।

आपला व तसाच ग्रीक व रोमन लोकांचा प्रेतदहनविधि सुधारलेल्या राष्ट्रांतूनही, प्रेतें पुरण्यापेक्षां किंवा तीं वनेचरांकडून खावविण्यापेक्षां शास्त्रीय दृष्टीनें अधिक चांगला आहे, असें हळू हळू ठरत आहे. आतां या स्तुत्य अंत्यविधींत मृताची बोळवण सुंदर वेदमंत्रांत कशी केलेली आहे तें पाहून, हा विषय संपवूं. प्रेतास क्रव्याद् अग्नि दिल्यावर वस्त्रपल्लवानें चितेस वारा घालून, असें म्हणतात.

वातास्ते वान्तु पथि पुण्यगंधा:
मन: सुखा गात्रसुखानुलोमा: ॥
त्वच: सुखा मांससुखा अस्थिसौख्या
वहन्तु त्वां मरुत: सुकृतां यत्र लोका: ॥
इमा आपो मधुमत्योऽस्मिन्स्ते
लोक उपदुह्यंतामक्षीयमाणा: स्वधा नम: ॥

*　　　*　　　*

प्रेहि प्रेहि पथिभि: पूर्व्येभिर्यत्रा न: पूर्वे पितर: परेयु: ।
उभा राजाना स्वधया मदंता यमं पश्यासि वरुणं च देवम् ।

संगच्छस्व पितृभिः संयमेनेष्टापूर्तेन परमे व्योमन् ।

हित्वा यावद्य पुनरस्तमेहि संगच्छस्व तन्वासुवर्चाः ।

* * *

येभ्यो मधु प्रधावति तांश्चिदेवाभि गच्छतात् ।

तपसा ये अनाधृष्यास्तपसा ये स्वर्ययुः ।

तपो ये चक्रिरे महस्तांश्चिदेवाधिगच्छतात् ।

ये युध्यन्ते अधुनेषु शूरासो ये तनूत्यजः ।

हे सुगंधी वारे तुला वाटेनें लागोत! त्यांमुळें तुझ्या अवयवांना, केसांना, त्वचांना, मांसांना, अस्थींना सुख होवो! हे वारे पुण्यवान् लोकांच्या स्वर्गास तुला नेवोत! हें अमृततुल्य पाणी त्या तुझ्या स्थलीं तुला सतत शांत करो!

जा, जा! ज्या पूर्वीच्या मार्गांनीं आपले वाडवडील गेले आहेत, त्या मार्गांनीं तूं त्या स्थलीं जा! आपल्या पूर्वजांना भेट! यमराजास भेट! वरुणास भेट! आपले दोष टाकून घरीं जा! दुसरें शरीर धारण कर! तेजःपुंज रूप धारण कर!

* * *

ज्यांच्याकरितां अमृताच्या नद्या वाहत आहेत, त्यांकडे हा जावो! जे तपोबलानें उत्तम गती मिळवितात, त्यांकडे हा जावो! जे लढाईंत बलाढ्य असतात, जे दुसऱ्याकरितां आपला देह रणांगणांत ठेवतात, जे गरीबांकरितां आपलें सर्वस्व खर्चितात, त्यांकडे हा जावो!)

अथर्वण वेदांत पुनर्जन्माची कल्पना प्रगट झालेली असून, शिवाय अशींच आशीर्वचनें आहेत.

" तूं आह्मांस स्वर्गास ने! आह्मांला आपल्या बायकामुलांजवळ असूं दे! स्वर्गांत, आमचे मित्र सुखानें राहतात! आमचें शरीर निर्दोष होतें! त्यांतील पंगुत्व नाहींसें होतें! त्यांतील वक्रत्व जातें! तेथें आह्मांला आमचे वाडवडील व मुलें पाहूं द्या! "

" वरुण तुला थंड करो! व तुजवर दंव शिंपडीत तुला दवांतून जलद नेवो!"

" न्या, त्याला न्या! सकलगुणसंपन्न अशा त्याला सद्गुणी लोकांच्या स्वर्गास न्या! त्याच्या आसपास असणाऱ्या अनंत अंधकारमय प्रदेशांतून जन्मास न आलेला असा त्याचा आत्मा स्वर्गास जावो! पापानें मलिन अशांचे पाय धुवा! हा स्वच्छ पायांनीं वर जावो! अंधारांतून निघून गेल्यावर इकडे तिकडे आश्चर्यचकित होऊन पाहणारा व जन्मास न आलेला असा ह्याचा आत्मा वर स्वर्गलोकीं जावो!"

जगन्नाथ रावजी टुल्लू, बी. ए.
